ग्रामीण मुलांची ज्ञानगंगोत्री


प. रा. हायस्कुल सोसायटीचे

## कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय

धरणगांव जि. जळगांव

# आविष्कार

वार्षिक अहवाल
२०२३-२४



# Mission

आविष्कार
2023 -24

**Shaping versatile personality with social and moral awareness through qualitative education**

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
• धरणगांव •

# अनुक्रमणिका


| क्र. | तपशील चे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १) | सन्माननीय व्यवस्थापन समिती | १ |
| २) | Misson / Values आमचे कुशल प्रशासन | २ |
| ३) | प्रकाशन व संपादन | ३ |
| ४) | माहिती विशेष | ५ |
| ५) | सेवापूर्ती समारंभ | ६ |
| ६) | भावपूर्ण श्रध्दांजली | ७ |
| ७) | Vision & Objectives | ८ |
| ८) | प्राचार्यांचे मनोगत | ९ |
| ९) | संपादकीय प्रा. आर.एम. केंद्रे | ११ |
| १०) | महाविद्यालयाचे प्राध्यापक वृंद २०२४-२५ यादी | १३ |
| ११) | शिक्षकेतर कर्मचारी वृंद २०२४-२५ यादी | १४ |
| १२) | सी.एच. बी. प्राध्यापक वृंद २०२४-२५ यादी | १५ |
| १३) | विद्यार्थी साहित्य विभाग | १६ |
| १४) | मराठी मोटीवेशनल - नाते मनाचे व. पु. काळे | १७ |
| १५) | कविता विभाग | १८ |
| १६) | विसरू नको | २३ |
| १७) | आईचे डोळे (विद्यार्थी साहित्य ) | २४ |
| १८) | श्री बालाजी वहन | २७ |
| १९) | मारुती वहन / नवरात्री उत्सव | २८ |
| २०) | वहनोत्सव व रथोत्सव | ३० |
| २१) | बालाजी मंदिर, धरणगांव | ३१ |
| २२) | माता कानबाई व रानबाई उत्सव | ३३ |
| २३) | बैलपोळा सण व उत्सव | ३६ |
| २४) | कमळाबाई मंगेशरावांची लेक | ३८ |
| २५) | Growing with community / A Collage Story | ४२ |
| २६) | अहवाल विभाग | ४३ |
| २७) | Department of Mathamatics | ४४ |

## अनुक्रमणिका


| क्र. | तपशील चे नांव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २८) | Department of Physics........................................... | ५१ |
| २९) | Department of chemistry........................................ | ५४ |
| ३०) | Department of Economy......................................... | ६३ |
| ३१) | मराठी विभाग अहवाल २०२४-२५................................. | ६८ |
| ३२) | मराठी भाषा गौरव दिन विशेष .................................... | ७९ |
| ३३) | राज्यशास्त्र विभाग अहवाल ...................................... | ८३ |
| ३४) | भुगोल व पर्यावरण विभाग अहवाल .............................. | ८७ |
| ३५) | राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम अहवाल ........................ | ९२ |
| ३६) | राष्ट्रीय सेवा योजना हिवाळी शिबीर कार्यक्रम ........................ | १०० |
| ३७) | वाणिज्य विभाग अहवाल ...................... ........................ | ११५ |
| ३८) | विद्यार्थी विकास अहवाल ........................................... | १२२ |
| ३९) | जिमखाना अहवाल.................................................. | १२५ |
| ४०) | राष्ट्रीय छात्रसेना अहवाल (एन.सी.सी.)........ ........................ | १३० |

## सन्माननीय व्यवस्थापन समिती

| | | |
|---|---|---|
| १. | डॉ. अरुण कृष्णाजी कुलकर्णी | अध्यक्ष |
| २. | श्री. वसंतराव त्र्यंबक गालापुरे | उपाध्यक्ष |
| ३. | डॉ. मिलींद शिशुपाल डहाळे | सचिव |
| ४. | डॉ. नारायण शंकर नारखेडे | संचालक |
| ५. | श्री. सतीषचंद्र योगराजसिंह परिहार | संचालक |
| ६. | श्री. अजय अमोलकचंद पगारिया | संचालक |
| ७. | श्री. कांतीलाल प्रेमजी डेडीया | संचालक |
| ८. | सौ. नीना ज्ञानेश्वर पाटील | संचालिका |
| ९. | श्री. राजेश बाबुलाल भाटीया | संचालक |
| १० | . प्राचार्य डॉ.ए.डी.वळवी | पदसिध्द |
| ११ | . डॉ.संजीवकुमार सोनवणे, मुख्याध्यापक | पदसिध्द |

## आमचे कुशल प्रशासन

• अध्यक्ष •



डॉ. अरुण कृष्णाजी कुलकर्णी

• उपाध्यक्ष •



श्री. वसंतराव त्र्यंबक गालापुरे

• सचिव •



डॉ. मिलींद शिशुपाल डहाळे

# आमचे कुशल प्रशासन



मा. भाऊसो.
अजयशेठ अमोलकचंद पगारीया



मा. नानासो.
सतिषचंद्र योगराजसिंह परिहार



मा. दादासो.
डॉ. नारायण शंकर नारखेडे



मा. कांतीलाल प्रेमजी डेडिया



मा. सौ. निनाताई ज्ञानेश्वर पाटील



मा. राजेश बाबुलाल भाटीया



मा. प्राचार्य डॉ.ए.डी.वळवी



मा. मुख्याध्यापकसो.
डॉ. संजीवकुमार सोनवणे

# प्रकाशन व संपादन

**• प्रकाशक •**



प्राचार्य डॉ.ए. डी. वळवी
(संरक्षणशास्त्र विभाग)

**• मुख्य संपादक •**



प्रा. आर. एम. केंद्रे
(भुगोल विभाग)

**• संपादक मंडळ •**



प्रा. एस. एस. पालखे
(रसायनशास्त्र विभाग)



प्रा. डॉ. गौरव महाजन
(वाणिज्य विभाग)



प्रा. डॉ. सुषमा तायडे
(मराठी विभाग)

टीप : या अंकात व्यक्त झालेल्या लेखांशी, विचारांशी संपादक मंडळ सहमती दर्शवतीलच असे नाही.

# आविष्कार ई-नियतकालीकासंबंधी केंद्रसरकारच्या नियमानुसार माहिती

प्रकाशन स्थळ:कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

प्रकाशन मुद्दत: वार्षिक

प्रकाशकाचे नाव : प्राचार्य- डॉ. ए. डी. वळवी

राष्ट्रीयत्व : भारतीय

संपादकाचे नांव: प्रा. आर. एम. केंद्रे

राष्ट्रीयत्व : भारतीय

पत्ता : कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

मालकाचे नांव : कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि. जळगांव

मी प्राचार्य डॉ. ए. डी. वळवी, प्रकाशक म्हणून असे प्रकट करतो की,
वर दिलेला तपशील माझ्या माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे बरोबर आहे.

**प्राचार्य डॉ. ए. डी. वळवी**
प्रकाशक, आविष्कार
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगांव

# सेवापूर्ती



**श्री. किसन वाघरे**
कार्यालयीन परिचर




नवे क्षितीज नवी पहाट फुलावी आयुष्यातील स्वप्नांची पहाट
हे स्मित हास्य तुमच्या चेहऱ्यावर दरवळत राहो
तुमच्या पाठिशी हजारो सूर्य तळपत राहो
तुम्हाला उदंड आयुष्य मिळत राहो
याच सेवा निवृत्तीच्या शुभेच्छा!...

श्री किसन वाघरे यांनी आयुष्यभर प्रामाणिक पणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, धरणगांव जि.जळगांव येथे कार्यालयीन परिचर (शिपाई) सेवा दिली व 2024 या साली ते सेवानिवृत्त झाले. त्याबद्दल संस्थेचे संचालक मंडळ व महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक वृंद व समस्त कर्मचाऱ्यांनी त्यांचे आभार मानले व सत्कार केला. सर्व विद्यार्थ्यांनी शुभेच्छा दिल्यात.

# भावपूर्ण श्रद्धांजली



कै.मा. दादासो. डॉ. नारायण शंकर नारखेडे

या शैक्षणिक वर्षात
साहित्य, कला, क्रीडा, चित्रपट, संगीत,
सांस्कृतिक, राजकीय, शैक्षणिक, सामाजिक व विज्ञान
यासारख्या विविध क्षेत्रात आपल्या असामान्य कर्तृत्वाचा
ठसा उमटवून दिवंगत झालेल्या व्यक्ती,
देशासाठी शहीद झालेले जवान,
तसेच संस्था पदाधिकारी, महाविद्यालयाचे प्राचार्य, प्राध्यापक
प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थीनी यांचे जे नातेवाईक
दिवंगत झाले अशा काळाच्या पडद्याआड झालेल्या
सर्व ज्ञात, अज्ञात व्यक्तींच्या स्मृतीस....
आमच्या महाविद्यालयाच्यावतीने

**भावपूर्ण श्रध्दांजली**



## Vision

*Our Institution is a hub to provide ample opportunities to rural students with the aim of facing the challenges of the changing world, new educational concepts and making all the stack holders competent to live with peace and harmony in the globalized village.*

## Objectives

*With the objective of promoting, spreading and advancing education in the region, the "P. R. High School Society" was registered in 1914 and the college was established in 1971.*

- *To impart qualitative education to the rural masses living in and around Dharangaon.*
- *To concentrate on the education for girls.*
- *To develop qualities of leadership among our students.*
- *To shape and enrich the moral character of our students.*



प्रा. ए. डी. वळवी
(प्राचार्य)





# मा. प्राचार्यांचे मनोगत...

## प्रिय विद्यार्थी मित्र मैत्रिणींनो...

शैक्षणिक वर्ष -२०२३-२४ चा महाविद्यालय नियतकालिक आविष्कार अंक महाविद्यालयाच्या संकेतस्थळावर ऑनलाईन पध्दतीने सादर करतांना मनस्वी आनंद होत आहे. महाविद्यालयाची ओळख ही त्यांच्या बाह्य रंगरुप आणि आकारामुळे जेवढी ठळकपणे लक्षात रहाते तितकीच किंवा त्यापेक्षा जास्त तिथे शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांमुळे, विद्यार्थी हे शैक्षणिक संस्थांचे केंद्रबिंदू आहेत असे मी मानतो. त्यांच्या सर्वांगीण विकासाचा ध्यास सतत डोळ्यासमोर ठेवून विद्यार्थ्यांचे व्यक्तीमत्त्व अधिकाधिक विकसित करण्याकरिता आमच्या महाविद्यालयातील प्रत्येक घटक कार्यरत आहे. त्यासाठी वेगवेगळे उपक्रम शासन आणि विद्यापीठाच्या निर्देशानुसार राबवण्याचा माझा आणि माझ्या सर्व सहकाऱ्यांचा नेहमीच प्रयत्न असतो. तारुण्यातील महाविद्यालयीन मुलांचे भावविश्व आणि जाणीवा समृध्द व्हाव्यात आणि त्या व्यक्त स्वरुपात मांडता याव्यात या उद्देशाने आविष्कार या नियतकालीकाचे प्रकाशन महाविद्यालयातर्फे दरवर्षी केले जाते.

अध्यापन, अध्ययन आणि मुल्यांकन ही एक नैसर्गिक आणि सतत सुरु राहणारी प्रक्रिया असावयास हवी असे मला वाटते. कुणी प्रथमच महाविद्यालयाची पायरी चढते तर कोणी पदवी हातात घेऊन पुढील जिवनाच्या प्रवासात निघून जाणार आहेत, या जीवनप्रवासात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासोबतच सामाजिक आणि राष्ट्रीय भावना देखील वाढीस लागाव्यात आणि ती जबाबदारी पार पाडण्याकरिता आवश्यक असलेले इतर उपक्रम, उदा. वरिष्ठ महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय विद्यार्थी छात्र-सेना युवती सभेच्या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना केंद्रस्थानी ठेवून अशा एकेका मार्फत केले जातात. या व्यतिरिक्त आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या मदतीने कमवा आणि शिका योजना देखील राबवण्यात येते. त्यातून विद्यार्थ्यांना शिक्षणासोबत स्वावलंबनाचे धडे देखील दिले जातात.

शासनाकडून देण्यात येणाऱ्या विविध शिष्यवृत्ती योजनांचा लाभ देखील पात्र विद्यार्थ्यांना देण्यात येतो.

आजच्या युगात विद्यार्थी जगतातील स्पर्धा परीक्षा हा एक अविभाज्य भाग म्हणावा लागेल. त्यासाठी सर्व विद्यार्थ्यांकरिता महाविद्यालयातील सुसज्ज व अद्ययावत ग्रंथालय नेहमीच उपलब्ध असते. विद्यापीठाकडून राबविण्यात येणाऱ्या अविष्कार, युवारंग आणि इतर उपक्रमात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांचा जास्तीत जास्त संख्येने सहभाग नोंदवावा यासाठी प्रोत्साहन देण्यात येते. महाविद्यालयाच्या जिमखाना विभागामार्फत विविध खेळ, स्पर्धा यासाठी वेगवेगळ्या स्तरावर पात्र विद्यार्थ्यांचे संघ पाठवले जातात. तर विविध मंडळ उदा. कला मंडळ, वादविवाद मंडळ, विज्ञान मंडळ, वाङ्मय मंडळ वैगरे यांच्या मार्फत विद्यार्थी हिताचे विविध उपक्रम राबविले जातात. जेणेकरुन त्यांच्या सुप्त कला गुणांना अधिकाधिक वाव मिळावा.

आविष्कार या नियतकालिकातून ज्या विद्यार्थ्यांनी आपले लेख, कविता आणि इतर साहित्य प्रदर्शित करुन आपला सहभाग नोंदवला त्यांचे कौतुक करतो आणि जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी या माध्यमातून आपले विचार आणि मतप्रदर्शन करावे, म्हणजे स्वतःला व्यक्त करावे असे आवाहन विद्यार्थ्यांना करतो, आणि पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देतो. आणि थांबतो...

धन्यवाद !

प्रा. ए. डी. वळवी
प्राचार्य
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय
धरणगांव, जि. जळगांव

प्रिय विद्यार्थी बंधू भगिनींनो ...

आविष्कार २०२३-२४ चा अंक आपल्या समोर सादर करतांना मनस्वी आनंद होतोय. आविष्कार म्हणजे तुम्हा विद्यार्थ्यांच्या कलागुणांचे, तसेच तुम्ही मिळविलेल्या यशाचे संगोपन करणारे समर्थ व्यासपीठ आहे. महाविद्यालयाचे वार्षिक नियतकालिक 'आविष्कार' हे केवळ नियतकालिक नसुन महाविद्यालयातील प्रत्येक घटकासाठी महत्वाचा दस्तऐवज म्हणून कार्य करित आले आणि कार्य करित राहिल.

महाविद्यालयाच्या स्थापनेपासून ते आजपर्यंत अंक प्रकाशन अखंड केले जात असून, प्रत्येक वर्षी अंक अधिक माहितीपूर्ण, सुंदर आणि आकर्षक व्हावा याकडे संपादक मंडळाचे जाणीवपूर्वक लक्ष असते. बदलत्या काळाच्या गरजा तसेच आवडी निवडी लक्षात घेऊन सन्माननीय संस्थाध्यक्ष, सर्व संचालक मंडळ आणि सन्माननीय प्राचार्य साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व सहकार्याने देखणा अंक आपण ऑनलाईन प्रकाशित करत आहोत.

विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हे आमच्या संस्थेचे ब्रीद, त्यासाठी कला, क्रीडा, साहित्य, याबरोबरच समग्र अध्ययन व अध्यापन यावर सातत्याने भर दिल्यामुळे आमचे विद्यार्थी आजच्या स्पर्धेच्या काळात विविध क्षेत्रात नैपुण्य मिळून संस्थेचा लौकीक वृध्दिंगत करत आहे. याची परिपुर्ण कल्पना देणारा अहवाल व छायाचित्रे आम्ही प्रकाशित केले आहेत. याचा सकारात्मक परिणाम म्हणजे नव्याने प्रवेशित विद्यार्थ्यांना प्रेरणा स्वरुप होण्यासही मदत होते व यशवंत विद्यार्थ्यांच्या प्रगतीची गती वाढण्यास मदत होते.

नियतकालीकाचे संपादन व प्रकाशन ही प्रक्रीया तशी क्लीष्ट असून कोणा एका व्यक्तीचे हे काम नाही याची जाणीव मला पूर्णपणे होती, म्हणूनच अंक सर्वार्थाने परिपुर्ण होण्याच्या दृष्टीने मला ज्यांनी ज्यांनी अमूल्य मार्गदर्शन केले त्यांच्या प्रती कृतज्ञता व्यक्त करणे मला या प्रसंगी आवश्यक वाटते. यामध्ये आमच्या प. रा. हायस्कूल सोसायटीचे सन्माननीय अध्यक्ष डॉ. अरुणजी कुलकर्णी, उपाध्यक्ष श्री. व्ही. टी. गालपुरे सर, सचिव डॉ. मिलींदजी डहाळे सन्माननीय संचालक श्री. अजयभाऊ पगारिया व सर्व संचालक मंडळ यांनी अंकाचे स्वरुप कसे असावे येथपासून तर अंक वेळेवर प्रकाशित करावा यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन करुन संपादक मंडळास मदत केली त्याबद्दल आम्ही सर्व संपादक त्यांचे ऋणी आहोत. त्याचप्रमाणे आमचे आदरणीय प्राचार्य डॉ.श्री.प्रा. ए. डी. वळवी, उपप्राचार्य प्रा.डॉ.एस.बी.शिंगाणे, व इतर सर्व सहकाऱ्यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. या सर्वांच्या अथक प्रयत्न, व सहकार्याने मदतीमुळे आम्ही अंक पूर्णत्वास नेऊ शकलो त्यासाठी या सर्वांचे मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

महाविद्यालयातील वरिष्ठ व कनिष्ठ विभागातील प्राध्यापकवृंद, शिक्षकेतर कर्मचारी, ग्रंथालयातील कर्मचारी, विद्यार्थी व विद्यार्थीनी लेखक, कवी, संकलक यांच्या लेखनामुळे अंक समृध्द झाला आहे. हे निश्चित नोंद घेण्याजोगे आहे. त्याप्रमाणे संपादक मंडळातील सर्व प्राध्यापक बंधू यांचे देखील मला अनमोल सहकार्य लाभले, तसेच आपल्या महाविद्यालयाचे विद्यार्थी श्री. उमेश लखीचंद अहिरे यांनी सध्याच्या परिस्थितीचे व्यवस्थित अवलोकन करुन अतिशय आकर्षक अन् सुंदर असे आपल्या अंकाचे मुखपृष्ठ तयार केले आणि या ऑनलाईन अंकाचे डिझाईनर श्री. गजानन एम. पिंगळे यांनी वेळेत सर्व पेजेस डिझाईन केले त्यांचे सुध्दा मी मन:पूर्वक आभार व्यक्त करतो.

शेवटी अंक प्रकाशित करणे हे एक दिव्यच असते पण त्यानंतरचा आनंद मात्र या शब्दांच्या पलीकडचा असतो, या आनंदपर्वणीत सारे सहभागी होऊ या. आमचे प्रयत्न पूर्ण निर्दोष असतील असा आमचा दावा नाही, पण चांगला करण्याचा प्रयत्न मात्र मनापासूनच आहे. एवढे लक्षात घेऊन राहिलेले दोष आमच्या मर्यादा आहेत हे समजून अभिप्राय मात्र नक्की द्यावा.

जय हिंद, जय भारत!

आपला स्नेहांकीत,
**प्रा.आर. एम. केंद्रे**
मुख्य संपादक

# वरिष्ठ महाविद्यालय प्राध्यापक वृंद

| अ नं | नांव | विषय | शिक्षण | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा.डॉ. ए. डी.वळवी | संरक्षण शास्त्र | एम. ए. पी.एच.डी. | प्राचार्य |
| २. | प्रा. डॉ. एस. बी. शिंगाणे | इतिहास | एम. ए.,बी.एड.,पी.एच.डी. | उपप्राचार्य |
| ३. | प्रा. आर. एम. केंद्रे | भुगोल | एम.ए., बी. एड.,नेट | सहा. प्राध्यापक |
| ४. | प्रा. डॉ. व्ही. ए. वारडे | अर्थशास्त्र | एम. ए., सेट, पीएच.डी | सह. प्राध्यापक |
| ५. | प्रा. पी. आर. देशमुख | ग्रंथापाल | एम. ए., एम फील., एम.लीब. | सह. प्राध्यापक |
| ६. | प्रा. डॉ. के. डी. महाजन | वनस्पतीशास्त्र | एम. एस्सी., बी.एड.,पीएच.डी. | सह. प्राध्यापिका |
| ७. | प्रा. डी. एन. पाटील | शारिरीक शिक्षण | एम. ए.,एम.पी.एड, एम.फील, नेट | सहा.प्राध्यापक |
| ८. | प्रा. एस. एस. पालखे | रसायनशास्त्र | एम. एस्सी.,सेट | —"— |
| ९. | प्रा. डॉ. एस. एम. उपासनी | प्राणीशास्त्र | एम. एस्सी., पीएच.डी. | सह. प्राध्यापक |
| १०. | प्रा. डॉ. डी. आर. बोन्डे | गणित | एम. एस्सी.,एम फील.,सेट,पीएच.डी. | सहा.प्राध्यापक |
| ११. | प्रा. डॉ. ए. ए. जोशी | भौतिकशास्त्र | एम. एस्सी., बी.एड, पीएच.डी. | सह. प्राध्यापक |
| १२. | प्रा. डॉ. पी. एस. बोरसे | इंग्रजी | एम. ए., पीएच.डी. | सह. प्राध्यापक |
| १३. | प्रा.व्ही. वाय. वळवी | रसायनशास्त्र | एम. एस्सी.,सेट | सहा.प्राध्यापक |
| १४. | प्रा. ए. ए. पाटील | रसायनशास्त्र | एम. एस्सी.,नेट | —"— |
| १५. | प्रा.डॉ. जी. जी. महाजन | वाणिज्य | एम. कॉम.,सेट-नेट, पीएच.डी. | —"— |
| १६. | प्रा. डॉ. एस. एम. खरे | वनस्पतीशास्त्र | एम. एस्सी., पीएच.डी. | —"— |
| १७. | प्रा. डॉ. जे. पी. महाजन | अर्थशास्त्र | एम. ए., बी.एड, एमफील., पी.एच.डी | सहा.प्राध्यापिका |
| १८. | प्रा. डॉ.जी. जी. जाधव | रसायनशास्त्र | एम. एस्सी.,एम.फील,बी.एड.,पी.एच.डी | सहा.प्राध्यापक |
| १९. | प्रा. डॉ. डी. के. गायकवाड | भौतिकशास्त्र | एम.एस्सी.,पीएच.डी | —"— |
| २०. | प्रा.डी. बी. चव्हाण | वनस्पतीशास्त्र | एम.एस्सी.,सेट, पी.जी.डी.एच.ई. | —"— |
| २१. | प्रा. डॉ. एस. एच. वाघमारे | प्राणीशास्त्र | एम.एस्सी.,पीएच.डी | —"— |
| २२. | प्रा. आर. पी. केदार | रसायनशास्त्र | एम.एस्सी.,सेट, नेट, गेट | —"— |
| २३. | प्रा. डॉ.एच. ए. भालेराव | वाणिज्य | एम.कॉम., बी.एड, सेट,पी.एच.डी. | —"— |

## शिक्षकेतर कर्मचारी वृंद 2023-24

| अ. नं. | नांव | पदनाम |
|---|---|---|
| १. | श्री. ए. डी. पारेख | लघुलेखक |
| २. | श्री. आर. एम. चौधरी | प्रयोग शाळा सहाय्यक |
| ३. | श्री. एन. जी. चव्हाण | ग्रंथालय लिपीक |
| ४. | श्री. आर. एस. साळुंखे | वरिष्ठ लिपीक |
| ५. | श्री. के. एस. सुतारे | प्रयोगशाळा सहाय्यक |
| ६. | श्री. आर. बी. चव्हाण | ग्रंथालय परिचर |
| ७. | श्री. पी. आर. पाटील | कनिष्ठ लिपीक |
| ८. | श्री. के. पी. पाटील | कनिष्ठ लिपीक |
| ९. | श्री. एस. यु. श्रावणे | प्रयोगशाळा परिचर |
| १०. | श्री. एस. डी. नेटके | प्रयोगशाळा परिचर |
| ११. | श्री. एस. बी. तोंडे | प्रयोगशाळा परिचर |
| १२. | श्री. के. वी. वाघरे | शिपाई |
| १३. | श्री. एस. डी. जैन | प्रयोगशाळा परिचर |
| १४. | श्री. जे. आर. परदेशी | कनिष्ठ लिपीक |
| १५. | श्री. एस. एस. पाटील | प्रयोगशाळा परिचर |
| १६. | श्री. एच. आर. सोनवणे | कनिष्ठ लिपीक |
| १७. | श्री. जी. जे. माळी | कनिष्ठ लिपीक |

## • सी.एच.बी. प्राध्यापक वृंद •

| अ नं | नांव | विषय | शिक्षण | पदनाम |
|---|---|---|---|---|
| १. | प्रा. डॉ. सुषमा व्ही. तायडे | मराठी | एम. ए. डी.एड. | सहा.प्राध्यापिका |
| २. | प्रा. तुषार पाटील | मराठी | एम. ए.नेट | सहा.प्राध्यापक |
| ३. | प्रा. सुलताना पटेल | मराठी | एम. ए. सेट | सहा.प्राध्यापिका |
| ४. | प्रा. पंकज पाटील | इंग्रजी | एम. ए. सेट-नेट | सहा.प्राध्यापक |
| ५. | प्रा. जगदीश चव्हाण | इंग्रजी | एम. ए. सेट | सहा.प्राध्यापक |
| ६. | प्रा. सुनीलकुमार पाटील | हिंदी | एम. ए. सेट-नेट | सहा.प्राध्यापक |
| ७. | प्रा. रफिक खाटीक | अर्थशास्त्र | एम. ए. सेट | सहा.प्राध्यापक |
| ८. | प्रा. योगेश पाटील | अर्थशास्त्र | एम. ए. | सहा.प्राध्यापक |
| ९. | प्रा. मोहन ल्हासे | राज्यशास्त्र | एम. ए. नेट | सहा.प्राध्यापक |
| १०. | प्रा. प्रशांत क्षत्रिय | वाणिज्य | एम.कॉम. सेट | सहा.प्राध्यापक |
| ११. | प्रा. पुर्वा कुलकर्णी | संगणकशास्त्र | एम.सी.ए. | सहा.प्राध्यापक |
| १२. | प्रा. श्रध्दा चौटे | संगणकशास्त्र | एम. एस्सी. | सहा.प्राध्यापक |
| १३. | प्रा. कल्पेश पाटील | रसायनशास्त्र | एम. एस्सी. सेट | सहा.प्राध्यापक |
| १४. | प्रा. प्राची पगारिया | रसायनशास्त्र | एम. एस्सी. सेट | सहा.प्राध्यापक |
| १५. | प्रा. मंचन जैन | संगणकशास्त्र | एम. एस्सी. | सहा.प्राध्यापक |

प. रा. हायस्कुल सोसायटीचे

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

धरणगांव, जि.जळगांव

# विद्यार्थी साहित्य विभाग

प. रा. हायस्कुल सोसायटीचे

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

धरणगांव, जि.जळगांव

# विद्यार्थी साहित्य विभाग

## मराठी मोटीवेशनल :: व. पु. काळे यांचा एक सुंदर लेख...



**एखादा माणूस माझ्या मनातून उतरला की, मी आयुष्यभर त्याच्याकडे ढुंकूनही बघणार नाही.ह्या अशा स्वत:च्या ग्रेट स्वभावाचा काही लोकांना प्रचंड गर्व असतो, म्हणूनच हा मेसेज मला सगळ्यां बरोबर शेअर करावासा वाटला.**



# नाते मनाचे – मराठी मोटिवेशनल

" तू सकाळी अंघोळ झाली की आधी काय करतोस... ?" अचानक तिने मला प्रश्न केला...मी तिला उत्तर दिलं,' सगळ्यात आधी देवाजवळ दिवा लावतो"...त्यावर तिने विचारलं "का ?"आपल्या घरात तर वीज आहे शिवाय दिवस ही आहे तरी देवाला वेगळा दिवा लावायची गरज का भासते... ? " माझ्याकडे ह्या प्रश्नाचं तसं बघायला गेलं तर उत्तरच नव्हतं..." साधा विचार तर करून बघ, भोवताली दिव्यांची आरास असतानाही समईच्या तेजापुढे नतमस्तक होतो आपण ते का ?.कारण त्या तेजाला सात्विकतेचा, आपुलकीचा स्पर्श असतो.. खरं सांगू ? असे निरागस, पवित्र आणि भावनाशील प्रेम लाभणं, ही आयुष्यातील सगळ्यात मोठी मिळकत असते, असं मला वाटतं...पण आजकाल असं प्रेम मिळणं ही गोष्ट अशक्य आहे, हे ही मी जाणतो. ही गोष्ट अशक्य आहे, हे ही मी जाणते...मी प्रेमाविषयी लिहिते म्हणून तुला सहज सांगितलं ?" त्यावर मी प्रसन्न हसलो ...! कारण प्रेमाची एक वेगळी व्याख्या वेगळ्या शब्दात आज मी अनुभवत होतो...

एखादा माणूस माझ्या मनातून उतरला की, मी आयुष्यभर त्याच्याकडे ढुंकूनही बघणार नाही.ह्या अशा स्वत:च्या ग्रेट स्वभावाचा काही लोकांना प्रचंड गर्व असतो, म्हणूनच हा मेसेज मला सगळ्यांनबरोबर शेअर करावासा वाटला. कधीतरी निवांत बसून आयुष्यात येऊन गेलेल्या आणि दुरावलेल्या नात्यांचा डोळसपणे अभ्यास केला की, लक्षात येतं की, असे अनेकजण ज्यांनी आपल्याला दुखावलं " म्हणून आपल्या आयुष्यातून आपण त्यांना वजा केलं होतं ते अनेकदा समर्थनीय नव्हतचं ! भावना दुखावल्या, असं म्हणत आपण आपल्या अहंकाराला विनाकारण जोपासत बसलो.. आणि सोन्यासारखी माणसं आपल्या प्रतिक्षेला कंटाळून आपापल्या मार्गानं निघूनही गेली. त्यांची एखादी कृती, चूक हा जणूकाही जन्म-मरणाचा प्रश्न बनवून ती हकनाक आपल्या अहंकाराची बळी कधी झाली, हे कळलचं नाही.

आपण जसे जसे परिपक्व होत जातो तस तसं लक्षात येत जातं की, भावना आणि अहंकार ह्यांच्यात असलेली सूक्ष्म रेषा योग्य वेळी जाणून वागायला हवं होतं त्या माणसांनी आपल्यासाठी केलेल्या चांगल्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्या होत्या. स्वत:च्या चुकासुध्दा आठवून निदान स्वत:शी तरी मान्य करायला हव्या होत्या...

आपण जसे जसे परिपक्व होत जातो तस तसं लक्षात येत जातं की, भावना आणि अहंकार ह्यांच्यात असलेली सूक्ष्म रेषा योग्य वेळी जाणून वागायला हवं होतं त्या माणसांनी आपल्यासाठी केलेल्या चांगल्या गोष्टी लक्षात ठेवायला हव्या होत्या. स्वत:च्या चुकासुध्दा आठवून निदान स्वत:शी तरी मान्य करायला हव्या होत्या...

लेखन - **व. पु. काळे.**
संकलन –
**गायत्री दिपक मंदागे**
M.Com II

भावना क्षमाशील असते तर अहंकार मात्र एक घाव दोन तुकडे करुन मोकळा होतो. भावना दुखावली, असं आपण म्हणतो तेव्हा खूप वेळा भावना नाही तर अहंकार दुखावलेला असतो!

अगदी एखादी आनंदाची बातमी जरी कुणी आपल्याला अगदी उशीराने दिली, तर त्या गोष्टीचं दु:ख आणि राग म्हणून त्याचं साधं अभिनंदन देखील केलेलं नसतं आणि हे अनेकदा आपल्या आजुबाजूला घडतं... जगणं म्हणजे फक्त श्वास घेणं नसतं, तर त्या जगण्यालाही स्वत:च असं वेगळं रुप आणि अस्तित्व असतं.. कुणांचंच कुणावाचून अडत नाही, पण आयुष्यात आलेली चांगली माणसं जेव्हा गैरसमजुतीमुळे दुरावतात.. तेव्हा मात्र जर ती माणसं आपल्या आयुष्यात राहिली असती तर जगणं अजून सुंदर आणि अर्थपूर्ण झालं असतं, असं मात्र नक्कीच वाटून जातं.

क्षणभंगूर आयुष्याचे लाड करतांना आपल्या जगण्याचा दर्जा आपण राखायला हवा, आणि ह्यासाठीच ते जगणं सुसंस्कृत आणि अर्थपूर्ण बनवणाऱ्या चांगल्या माणसांची ओळख आणि जोपासना करणं आणि अहंकारामुळे त्यांना न गमावणे हे जाणीवपूर्वक आपण करावं असं मनापासून वाटतं. बऱ्याचदा तर समोरच्या व्यक्तिच्या वागण्याचा आपण आपल्या मतानुसार अर्थ काढतो, तसा विचारही समोरच्याचा नसतो, तो सहज आपलं म्हणून वागत असतो. परंतु आपण चुकीचा अर्थ काढून समोरच्याला आयुष्यातून सहज काढून टाकतो, अन आपला अहंकार आपल्याला या गोष्टीची जाणीवही होऊ देत नाही. म्हणून....

कुणाची कितीही मोठी चूक असली तरी ती आयुष्यापेक्षा व नात्यापेक्षा मोठी नाहीचं...!

■ ■ ■

---

# बालपण...

कविता...

पिंपळाच्या फांदीला हिरवी हिरवी पानं
बालपणाच्या आठवणी असतात किती छानं

दु:ख विसरुन जिथे मन नेहमी हसत असतं
जिथे मन हे बेभानपणे हिंडत, नाचत.



बालपणाचे ते दिवस ते क्षण..
आठवले की त्यात रमते मन..



तु आणि मी चा जिथे भेद
नसुन एकत्र यायचे सर्वजण
अरे देवा कर ना आम्हाला परत लहान
देना परत तेच बालपण...
जिथे कोणताही विचार न करता, नेहमी गाणे,
नाचणे, मित्रासोबत हिंडणे,





शिक्षकांचे ते बोलणे, अभ्यास न केल्यावर रागवणे,
उत्तरे दिल्यावर कौतुक करणे, आईच्या कुशीत झोपणे,
खूप आठवतं रे... देवा ऐक कर ना आम्हाला परत लहान
देना आम्हाला परत तेच बालपण...

अंगणातील ती किलबील आता जणू हरवलीशी वाटते...
गेले ते दिवस राहिल्या त्या फक्त गोड आठवणी...
ज्या आठवल्यावर डोळ्यात साचुन येते पाणी
देवा ऐक ना करना परत लहान
देना परत आम्हाला तेच बालपण



नाव **अश्विनी गुलाब पाटील** स्वलिखित
वर्ग: टी.वाय.बी. कॉम.



## सांगू का आई ...

सांगू का आई
माझा घसा का बसला ?
स्वप्नात किनई मी
बर्फ खूप खाल्ला
बर्फाच्या डोंगरावर
केली झिम्मड मस्ती
आईस्क्रीमच आईस्क्रीम
धमाल नुसती.
सांगू का आई
खरी गोष्ट तुला ?
मी नाही तुला
केला हा बिछाना
आलो तुझ्यासाठी
घेऊन बर्फ गोळा
खिशात होता ठेवला
मला वाटत तोच
इथे वितळून गेला.



**- दिव्या संजय चौधरी**
एस.वाय. बी. ए.



## तुझ्या दारी

पाश सारे तोडुनी आलो तुझ्या दारी
मी मला झिडकारुनी आलो तुझ्या दारी

अंबराचे दार तू तेव्हा खुले केले
पंख जेव्हा कापूनी आलो तुझ्या दारी

**-मिनल सोनवणे**
एफ. वाय. बी. कॉम

## शहाणपण

इथे वाटतं प्रत्येकाला
आपणच फक्त शहाणे
झाल्या तरी हातून चुका
तरी करतात बहाने



वाईट नसतं
कोणालाही
मनापासून चाहणे
मात्र वाईट असतं
कोणालाही
पाण्यामध्ये पाहणे.

हा जरुरी असतं
प्रत्येकाने वाकूब
ओळखून राहणे

नशिबी येत नाही
तर प्रवाह पतित वहाणे

**कु. कोमल महेश कट्यारे**
एफ. वाय. बी. कॉम.





## फुलपाखरु

छान किती दिसते । फुलपाखरु
या वेलींवर । फुलपाखरु
गोड किती दिसते । फुलपाखरु
पंख चिमुकले । निळे जांभळे
हालवुनी झुलते । फुलपाखरु
डोळे बारीक । करिती लुकलुक
गोल मणी जणुं ते । फुलपाखरु
मी धरुं जाता। येई न हाता
दूरच ते उडते । फुलपाखरु



**- योगीता पंडीत महाले**
एस. वाय. बी. एस्सी.

## चांदणे

घेताच मी पहाटे कवळून चांदणे
लाजुन चुर झाले बहरून चांदणे...

हातास मोगऱ्याचा येतो सुगंध की...
गेले हळूच माझ्या जवळून चांदणे

नाहीस बोलली तू मीही न बोललो
मौनात आज गेले बरसुन चांदणे

डोळे मिटून दोघे स्वप्नात हिंडलो
गेले कधी न कळले उतरुन चांदणे

खिडकीतूनी उन्हाची चाहूल लागता
ह्रदयात ठेवले मी लपवून चांदणे.

**कु. देवयानी नितीन महाजन**
एस. वाय. बी. एस्सी. रोल नं. ४७



## मैत्री

मैत्री अशीच असावी,
भरकटलेल्या पाखराला
घराची वाट दाखवणारी ...
सुकलेल्या फुलांना
बहर आणणारी...
दु:खाच्या वाळवंटात
प्रेमाचा पाझर आणणारी...
एकटे पणात सहवासाचा
दिलासा देणारी...
शब्दाविणा सर्व काही
समजून घेणारी...
अन् न सांगताच
डोळ्यातील भाव ओळखणारी...

**-अक्षय किरण महाजन**
एस. वाय. बी. एस्सी. रोल नं. ६





## शेतकरी होणार नाही

सांग देवा मला तुझी
संपली का रे सत्ता
पावसाचा कुठे काही
दिसत नाही पत्ता

छातीला लावून माती
करुन टाकली पेरणी
पावसाचा प्रश्न अजुनही
तसाच आहे एरवी

आता खचलो तर पुन्हा
उभं राहतो येणार नाही
पुनर्जन्म दिला तर
शेतकरी मात्र होणार नाही.

सुरु झाला पावसाळा
संपला महीना जुन
तरी रोज पडत आहे
मे सारखे उन

दुबार पेरणीचे आता
बळ नाही अंगात
ये लवकर बांधावर
पाऊस घेऊन ढगात..

**-भाग्यश्री सुनिल पाटील**
एस.वाय. बी. ए.



## आई

आई तुझ्या असण्यामुळे
आहे मिळाला जन्म हा
शतदा जरी फेडू तरी
कमी पडेल माझा यत्न हा!

तु वेचिल्या कष्टाची
गायिली जरी महती
नाही कशासी होते
त्याची तरीही गणती !

हातासी धरुनी तु
शिकवलीस मम भाषा
संस्कार ही दिले तु
दाखवलीस मम दिशा!

सांभाळिले मला तु
जीवाच्या पलिकडे
फेडु कसे तुझे मी
हे पांग हेच कोडे!

तु एकमेव आहे
वात्सल्य – त्याग मुर्ती
हा जन्म पाहीला मी
तुझ्याच पावलांवरती!

**लोकेश रविंद्र लोहार**
एफ. वाय. बी.ए. /रोल नं. ७



## नशीब

जीवन हा एक प्रवास आहे
चालत रहाणे कर्तव्य आहे
काय आपणास मिळेल पुढे
हा तर नशिबाचा भाग आहे


कधी आनंद तर कधी दु:ख
हा उन सावलीचा खेळ आहे
आंबट गोड नात्यांची इथे
एक चविष्ट भेळ आहे.



आयुष्य खूप सुंदर आहे
जगता येण महत्त्वाचे आहे.
अडचणी सर्वांनाच आहेत.
'मात' करण महत्त्वाचे आहे.

आयुष्यास नको होऊ निराश
खरंच इतकं ते कठीण नाही
हे दिवस ही बदलून जातील
स्थिर जगात असे काहीच नाही.

**-नंदिनी खैरनार**
एफ.वाय.बी.कॉम



## व्यथा

संगती मी जगाच्या, काटेच वेचलेले
फुलांच्या घावाने, रक्त माझं सांचलेले

का आस मी धरावी, तुटलेल्या तारकांची
क्षणातच सारे ज्याचे, आयुष्य संपलेले

अश्रूंनाही आता, जाग येत नाही
यातना या साऱ्या डोळ्यात कोंडलेले

हा प्रश्न का पडावा व्यर्थ जीवनाचा
उत्तरही ज्याचे, सारे रक्तात सांडलेले

शब्दात मांडतो मी, व्यथा जीवनाच्या
शब्द शब्द माझे, सारे दु:खात माखलेले

**- जोगेश्वरी किशोर महाले**
एफ. वाय. बी.ए. - रोल नं. ११४

## कुंकू



बाप माझा देश सेवेसाठी
कार्यरत होता,
सुट्टीवर तसा तो घरी येत होता,
सुट्या संपताच परतीला निघायचा
दूर असतांनाही जवळ असल्याचा
सारखा वाटायचा कारण
बाप असल्याच ठसा
घरात माझ्या वास करायचा
तो ठसा म्हणजे माझ्या मातेच्या
कपाळावरचा कुंकू असायचा
बाप सुरक्षित असल्याचा दावा
तो कुंकू देऊन जायचा...
माझ्या मातेचा तो सावळा रंग
तो लाल कुंकूच तिला फार
सुंदर करुन जायचा...
साधं सुतक जरी असायचं न
जीव तिचा कासावीस व्हायचा
त्या तेरा दिवस तीन
घरातला आरसा लपवायचा
अशी वागायची माय माझी...
आठवतोय मला तो दिवस
दिवसा तिला अंधार दिसायचा
आणि त्याच दिवशी नियतीनं
तिच्या कपाळावरचा तो
लाल कुंकू पुसायचा..
कमी वयात मातेनं माझ्या
विधवा व्हायचं
कुंकूविना कपाळ तिच
भायाळच वाटायचं...
प्रश्न पडतात आता मला
चेहऱ्याचा तिचा तो नूर
क्षणार्धात झाला कसा रे दूर
का म्हणून नांदतोय हल्ली
घरात माझ्या आसवांचा पूर..

**कु.गायत्री पाटील**
एस. वाय. बी. कॉम

## कर्म

जो तो पाही स्वार्थ स्वतः चे
परवा कुणाची नाही कुणा
केलेल्या वाईट कर्माचा
धाक उरला नाही कुणा ।।
मर्यादित राहिला देव
मंदिरा पुरताच जना
सत्याची कास सोडूनी
भरकटला हा माणूस पुन्हा ।।धृ.।।



माणसांच्या गर्दीमध्ये
माणूसपण हरवले पुन्हा
आज भासू लागली संत
ग्रंथ संस्कृति ची गरज पुन्हाः ।।
दोन पैश्यासाठी माणूस
हरवून बसला माणूस पणा
नाही उरले भय पापा चे
नाही माणसातला साधेपणा
आता तरी पहा मानसा
ज्ञानेशा च्या पाऊल खूणा
देश धर्म आणि संस्कृतीशी
जोडुनि घे ही नाळ पुन्हा
जोडुनि घे हि नाळ पुन्हा ।।

**कवि : ह.भ.प. सागर पाटील**
एम. कॉम. ।।

## सैनिक...

हिंदू है हम, भारत के बिंदु है हम...
बहती सिंधू का जल है हम...
हम नही किसी से कम...

जिनके लिये ना...
परिवार होता है ना प्यार...
जिनका सिर्फ वतन ही है महबूब...
वतन ही है यार...

अपना सब कुछ देश पे
न्योछावर है जो करते...
देश के लिए हर पल है
जो मरते...

हमारे देश का हिरा है जो...
हमारे प्यारे सैनिक है वो...
देश के लिए देते है वो जान है...
वही हमारे देश की असली शान है...

सैनिक हमारे है कमाल...
दुश्मनो के लिए है...
जो मौत का मायाजाल...
आओ सारे मिलके करें उन्हे...
दिल से सलाम...

**- अश्विनी गुलाब पाटील**
टी.वाय. बी. कॉम.

## मां..



तेरे जैसा ना कोई मा...
ममता की मुरत है तु मां...
करुणा का आंचल..
प्रेम का सागर है तु मा..
तु है तो जन्नत सा लगे ये जहाँ
तेरे जैसा और कोई कहा..

ईश्वर का स्वरुप .. .है तु मां...
तेरे जैसा इस जहाँ मे और कोई ना...
ओ...मां..
तु है तो स्वर्ग लगे ये जहाँ

सारी दुनिया की खूशिया एक
तरफ...
और तेरे गोद में सर रख
के सोना एक तरफ ..मां
तु हैतो तो जन्नत सा लगे ये जहाँ...

रब का दिया हुआ...
एक खूबसुरत तोहफा...
है तु मा......
तेरे जैस इस संसार में और कोई ना
ओ मां ...

**- अश्विनी गुलाब पाटील**
टी. वाय. बी. कॉम.

## माय माझी मराठी

माय ही माझी मराठी
कुणा सारखी रंग तुझे किती ?
सखा जागचं उंच तुझे
मनासारखी गोष्ट छाया तुझी
माय ही माझी मराठी

नव्या जगाची नवी पहारी
नव्या जगाची आई सखाची
मान कुणा सारखा तुझा
विषवाई सारखी माया तुझी
नव्या जगाची आशा सारखी

उंच उंच मान तुझे
प्रमासारखी सावली तुझी
माय मराठी माझी
जीव प्राणा माझी सारखी
माय मराठी माझी

गुण तुझी वाणी
जगाची माय माझी मराठी
सर्वात मुळी छाया तुझी
माय मराठी माझी



**कु.दिव्या संजय चौधरी**
एस. वाय. बी. ए.




## युवक असावा तर असा





चेहऱ्यावर तेज आहे
देहा मध्ये शक्ती आहे
मनामध्ये उत्साह आहे

बुध्दीमध्ये विवेक आहे
ह्रदयामध्ये करुणा आहे
मातृभूमीवर प्रेम आहे

इंद्रियांवर संयम आहे
मन ज्याचं स्थिर आहे
आत्मविश्वास दृढ आहे

इच्छाशक्ती प्रबळ आहे
धाडसाचे बळ आहे
सिंहासारखा निर्भय आहे

ध्येय ज्याचे उच्च आहे
सत्य ज्याचा ईश्वर आहे
व्यसनापासून मुक्त आहे

जीवनामध्ये शिस्त आहे
प्रेमळ ज्याचा सूर आहे
मानवता हेच कुळ आहे.

दीन दुबळ्यांचा मित्र आहे.
सेवेसाठी तत्पर आहे
देवावरती भक्ती आहे

जीवनामध्ये नीती आहे
चारित्र्य ज्याचे शुध्द आहे
तोच आदर्श युवक आहे

मुळ काव्य रचना
- **स्वामी विवेकानंद**

**संकलन**
- **शुभम कैलास चौधरी**
एफ. वाय. बी. एस्सी
रोल नं. ५३

माणसाच्या आयुष्यातील संकट
ही यशाचा आनंद घेण्यासाठी
आवश्यक आहेत



नांव : पाटील अविनाश प्रतापसिंग
M.A. B.Ed. Marathi



आयुष्याच्या खाचखळग्यात अपयशाने खचून गेलेल्या अन् आयुष्य सुंदर आहे हे दर्शवण्यासाठी मार्गदर्शन करणारे आणि आनंदी आयुष्य जगण्यासाठी मनाला उभारी देणारे लेखन





# विसरू नको...

अपयश पदरी आलं म्हणून स्वप्नांचे शिखर गाठायला विसरू नको
एखादी शर्यत हरलास म्हणून संघर्ष सुरु ठेवायला विसरु नको,
गर्दीत मुखडे भेटले म्हणून स्वत:शी प्रामाणिक रहायला विसरू नको,
कुण्या वळणावर भरकटलास म्हणून सरळ वाट शोधायला विसरु नको,
कधी निर्णय चुकला म्हणून दृष्टीकोन सकारात्मक ठेवायला विसरु नको,
आयुष्यात आयुष्य एकदाच मिळतं प्रत्येक क्षणांचा आस्वाद घेत जगायला विसरु नको...!

आयुष्य सुंदर आहेच फक्त कुठे बोलायचं आणि कुठं थांबायचं हे समजायला हवं.आयुष्य सुंदर आहेच फक्त किती सांगायचं आणि किती ऐकायचं हे समजायला हवं.आयुष्य सुंदर आहेच फक्त कुठे आणायचं आणि कुठं सोडायचं हे समजायला हवं.आयुष्य सुंदर आहेच फक्त कुठे आणायचं आणि कुठं सोडायचं हे समजायला हवं.आयुष्य सुंदर आहेच फक्त किती किती आठवायचं अन् किती विसरायचं हे समजायला हवं, आयुष्य सुंदर आहेच फक्त कुठे असायचं आणि कुठं रुसायचं हे समजायला हवं आयुष्य सुंदर आहेच फक्त किती करायचं आणि कुणासाठी करायचं हे समजायला हवं.

हे दिवस सुध्दा जातील तू धीर सोडू नको अपयश पदरी पडलं म्हणून हार मानू नको मार्ग खडतर असेल तू माघार घेऊ नको ध्येय नक्की गाठशील फक्त आशा सोडू नको कुणी साथ देत नसेल तू खचून जाऊ नको वाटा सापडत नाहीत म्हणून थांबून राहू नको. संपले सगळ वाटेल तू निर्णय टोकाचे घेऊ नको. ध्येय नक्की गाठशील फक्त आशा सोडू नको




- यामिनी दिनेश पाटील
टी.वाय.बी.कॉम.

# विद्यार्थी साहित्य

**'सर माणसाची परिस्थिती दिसलीच पाहिजे का? आपले कष्ट, आपलं जगणं बघुन कुणी तरी 'अरेरे' करुन म्हणणं यानं काय सिध्द होतं? आता सुध्दा मला खूप बक्षिसं मिळालीत. पण ती कायम पुरणार आहेत का? पुढचं शिकायला कष्ट करावेच लागणार. टीव्हीवाले आले, निघून गेले. एका मोठ्या क्लब चे अध्यक्ष आणि आमदार खासदार गाडी आत येत नाही म्हणून उतरुन आतही आले नाहीत. सर परिस्थिती माणसाला आहे त्यापेक्षा मोठे करते."**

**'सर येवढं मोठं करु नका मला. असे काबाडकष्ट करुन शिकणारे माझ्यासारखे अनेक आहेत. मनातला वॉचमन जागा असला की कुणी सांगाव लागत नाही. आपण कुठल्या परिस्थितीत जगतो, आपले पालक रक्ताचं पाणी करून आपल्याला कसं शिकवतात. याची आठवण सतत जागी असेल ना, तर शाळेच्या वर्गातल्या अभ्यासानंही मार्क्स मिळतात. क्लासेस विसेसची चैन झोपाळू मुलांसाठी! "**

■ ■ ■



# आईचे डोळे....

मुळ कथा: प्रविण दवणे
संकलन : ज्ञानेश्वर महाजन

गुणवत्तायादीत चमकलेल्या रामकृष्णाच अभिनंदन करण्यासाठी मी फुलांचा गुच्छ घेऊन त्यांच घर शोधत गेलो. घर शोधता शोधता प्रश्न पडला अशा झोपडपट्टीत राहतो रामकृष्ण? पण राहतो किती नेटनेटका. त्याच्या व्यक्तिमत्वातील टापटीपीवरून त्याच्या घराचा अंदाज साफ कोसळला होता. गटारांची अनेक जाळी धडपडत ओलांडत एका फळकुटाच्या झोपडी जवळ गेलो. इथच तो राहतो, म्हणून कुणीतरी सांगितलं काळोखातून प्रकाश बाहेर यावा तसा तो माझ्या आवाजानेच बाहेर आला. 'सर!" आत गेलो, अभिनंदन गुच्छ देत म्हटलं. मला जायला तसा तीन चार दिवस उशीरच झाला होता. अभिनंदनाची पहिली वर्दळ थांबून आता रुटिन सुरु झालं होतं. गुणवत्ता यादीत आलेल्या मुलाचं हे असं घर ? रामकृष्ण ने अभ्यास कुठे केला असेल ? बाजुच्या रेल्वे आणि लाऊडस्पीकरच्या गदारोळात त्याने अभ्यास कसा केला असेल ? त्याचे पुनः पुन्हा अभिनंदन करतांना मनातल्या मनात ते काळोखे कोपरे पाहत स्वत:लाच विचारीत होतो.

'सर, खूप खूप बरं वाटलं, खरं तर तुम्ही घरी आलायत, हे खरंच वाटत नाहीये. सावरलेलो नाहीये मी अजून! तुमच्यासाठी चहा करतो" म्हणत तो स्टोव्हला पंप मारु लागला.' रामकृष्ण राहू दे! आपण बाहेर घेऊ "

'तुम्ही काळजी करु नका, मी उत्तम चहा करतो. कोळसेवाडीत कॅन्टीन चालवतो, फक्त चहाचं " चहाच्या वाफांनी वातावरण भारलं '

घरात दुसरं कुणी ?"

ताई आहे, टायपिंगच्या क्लासला गेलीय. वडील किराणा दुकानात हमाल आहेत."

आई ?"

आई नाही ?"

रेंगाळलेली स्तब्धता कशी प्रवाही करावी या विचारानं मी गोंधळलो. चहा त्यानं खरंच उत्कृष्ट केला होता. अगदी जीव ओतून!

'रामकृष्ण, तू मार्गदर्शन व्याख्यानमालेत येत होतास, भेटत होतास. उत्तरपत्रिका पुन:पुन्हा तपासून घेत होतास. पण तेव्हा तुझ्याकडे पाहून... "

'सर माणसाची परिस्थिती दिसलीच पाहिजे का? आपले कष्ट, आपलं जगणं बघुन कुणी तरी 'अरेरे' करुन म्हणणं यानं काय सिध्द होतं? आता सुध्दा मला खूप बक्षिसं मिळालीत. पण ती कायम पुरणार आहेत का? पुढचं शिकायला कष्ट करावेच लागणार. टीव्हीवाले आले, निघून गेले. एका मोठ्या क्लब चे अध्यक्ष आणि आमदार खासदार गाडी आत येत नाही म्हणून उतरुन आतही आले नाहीत. सर परिस्थिती माणसाला आहे त्यापेक्षा मोठे करते."

रामकृष्णाची चमक गुणवत्ता यादीपुरती उरली नव्हती. ती वाक्यातून, डोळ्यातून चमकत होती.

'कुठून शिकलास हे सगळं?"

'सभोवतीच्या मुलांकडून"

'म्हणजे?"

'ती नुसताच टाईमपास करतात. बहुतेक नापास होतात. मग रात्री जुगार, चोरी, लबाडी हा त्यांचा उत्पन्नाचा मार्ग. पितात, भांडतात! तेव्हा ठरवलं आपण तसं व्हायचं नाही. याच वर्षी नाही सातवीतच ठरवलं . सातवीतच माझी आई गेली. इथल्या सिव्हिल हॉस्पीटल मध्ये. साध्या न्यूमोनियानं"

"बदललं सारं"

'बदलतचं आहे, सर गरीबीचा विचार करायला वेळ कुठे आहे? तसे आपले डोळे क्वचितच भरुन येतात, काळजाशी दडलेले अश्रू क्वचितच पापणीच्या काठावर येतात."

माझ्या आणि अनेक कॉलेजांच्या भोवती चकाट्या पिटत वेळेचा कचरा करणारी असंख्य मुलं आठवली. रानगेंड्याप्रमाणे फटफट्या घेऊन उधळणारी, देणग्या फी देऊन प्रवेश घेणारी, तरीही वर्गात बसणं पाप मानणारी असंख्य मुलं! त्यांच्याच वयाचा रामकृष्ण!

असेही अनेक चेहरे झरकन् तरळून गेले. 'रामकृष्ण, एकदा माझ्या वर्गात ये, मुलांशी गप्पा मारायला."

'सर येवढं मोठं करु नका मला. असे काबाडकष्ट करुन शिकणारे माझ्यासारखे अनेक आहेत. मनातला वॉचमन जागा असला की कुणी सांगाव लागत नाही. आपण कुठल्या परिस्थितीत जगतो, आपले पालक रक्ताचं पाणी करून आपल्याला कसं शिकवतात. याची आठवण सतत जागी असेल ना, तर शाळेच्या वर्गातल्या अभ्यासानंही मार्क्स मिळतात. क्लासेस विसेसची चैन झोपाळू मुलांसाठी!"

रिक्षापर्यंत रामकृष्णा बरोबर आलो. तिथेही बोलत राहिलो बराच वेळ. बोलता बोलता तो चटकन बोलून गेला.

"सर!,भोवतीची मुलं पाहून केव्हांतरी मलाही थोडी झापड आल्यासारखं होतं."

"मग, अशावेळी? मी.

मी फक्त आईचे डोळे आठवतो"

"आई...?"

" राब राब राबायची ती. कागदाच्या पिशव्या करीत. गोंद कात्र्या घेऊन आम्ही तिच्यासोबत बसून तीला मदत करायचो. वडिलांची गिरणी संपानंतर बंदच पडली. त्यानंतर वनवास मागे लागला." शेवटी ती बोलायची, " मी काही आता जगत नाही; पण तुझ्याकडे माझे कायमचे डोळे कायमचे असतील. तू कसा शिकतोस, मोठा होतोस, ते पाहण्यासाठी. सर, ते डोळे आठवतात हो!"

रिक्षात बसलो तेव्हा सुध्दा हे आठवतच राहिलं, सतत कुणीतरी आपल्याला सांगावंच कां लागावं? अभ्यास करा, लवकर उठा!, पालक किती मरमर मरतात. आपल्यासाठी याची आतून जाण असणारा असेल एखाद दुसराचं!

परवा एक शिक्षिका असलेली पालक आई स्टाफरुम मध्ये विषण्ण चेहऱ्याने आली, ' मुलगा सकाळी उठतच नाही हो. सातचं लेक्चर नेहमी बुडवतो. ऐकतच नाही. आता म्हणतो, शिकायचं नाही. काही करायचं नाही. कुणाचं मुळी कुणाचचं ऐकत नाही." फक्त रडायची बाकी होती ती बाई. खूप काही सुंदर घडविण्याचा तारुण्याचा ऋतू संपून गेल्यावर कितीतरी विद्यार्थी जागे होतात, तेव्हा उशीर झालेला असतो. एक भकास दुपार आणि निराश संध्याकाळ! सकाळी उठण्यासाठी

जबरदस्ती, कॉलेजला जाण्यासाठी 'जबरदस्ती, मग शिकण्यासाठी, परीक्षेसाठी. त्या आधी वर्गात हजर राहण्यासाठीही जबरदस्ती!... 'जबरदस्तीनं का कधी फुलं उमलतात?.. रोपानं स्वतःहूनच आतून ठरवलेलं असतं. विद्यार्थ्यांनंही असं आतूनच ठरवायला हवं... आईचे बाबांचे डोळे आठवण्या साठी ते प्रत्यक्ष मरायलाच हवे कां?

....आपण वर्गात गुंडगिरी करतांना किंवा वाह्यात वेळ घालवतांना, चाचणीत शून्य मार्क मिळवतांना, बसमधून /लोकलमधून लोंबकळत येणारे आई वडिल आठवत नाहीत? मुलांसाठीच पैसे जमा करायला सारखे वेगवेगळ्या ठिकाणी कंपनीच्या कामासाठी वाऱ्या करणारे थकलेले आई बाबा आठवत नाहीत? घरात आपण लहान असू, पण जाणीवेन थोडं समजूतदार झालं, तर पालकांच्या घामाचं गुलाबपाणी होऊ शकतं. यशाची राईसप्लेट रेडीमेड मिळत नाही, हे आताच कळायला हवं. यश शिजत ठेवावं लागतं. परिस्थितीच्या धगीनं कधी महत्त्वाकांक्षेच्या इंधनानं आयुष्य उकळत ठेवावं लागतं. हे केव्हा कळणार? चाळीसाव्या वर्षी? एस. एस. सी. ला फॉर्म भरायला पैसे नव्हते ते रामकृष्णाकडे पाहताना आठवून गेलं. आईच्या हातातली शेवटची सोन्याची बांगड़ी गहाण टाकण्यासाठी (तीही कधीच न मिळण्यासाठी) निघालेले माझे वडील आठवले. आई म्हणाली ' ही शेवटची, पुढे काय?" अजूनही घरातले ते क्षण आठवताहेत. नातेवाईकांनी केलेली उपेक्षा आठवते. निष्कांचन आईला पुढे येऊ न देणारे नातेवाईक आठवले. कुणाच्या तरी लग्नात ' माझी बोरमाळ तू घाल थोडा वेळ, अगदीच काळी पोत बरी दिसत नाही." असं आईला म्हटल्यावर, ' माझी लाज वाटत असेल तर मी येणार नाही. आले तर अश्शीच येईन." हे बाणेदारपणे सुनवणारी आई आठवली आणि नंतर ती म्हणाली होती, ' माझा दागिना बघायचा असेल तर माझा मुलगा पहा." त्या वाक्याने केवढी जबाबदारी टाकली आपल्यावर, ते आठवलं

असे प्रसंगच झपाटून शिकणाऱ्या मुलांच्या आयुष्यात निरांजन होऊन येतात. दारिद्रय् माणसाला संपवू शकत नाही. पण आळस, उदासीनता, ध्येय-शून्यता पार नेस्तनाबूत करते माणसाला! मला दिलेल्या एका मुलाखतीतलं आशा भोसलेंचं सूचक वाक्य आठवलं, ' सुखी माणूस कधी कलावंत होऊच शकत नाही."

खूप काही प्रेरणा देणारी ही रसरसलेली आयुष्य तेव्हांच घडतात, आकाराला येतात. जेव्हा जगाच्या पाठीवर आपण कुठेही असलो तरी आपल्याला आठवत असतात. कष्टाळू, अपार विश्वासाने कर्तृत्व गाजविण्यासाठी जगात ज्यांनी आपल्याला पाठविलं आहे, असे आपल्यासाठी स्वप्न पाहणारे आईचे डोळे! आपल्या आईचे डोळे!...

-**प्रविण दवणे.**

-**संकलन** : ज्ञानेश्वर धनराज महाजन
M.Com. II

■ ■ ■





# श्री बालाजी वहन....

-संकलन :
प्रिया मनोहर पवार
वर्ग: प्रथम वर्ष कला

सालाबादाप्रमाणे ह्या वर्षी देखील येथील श्री बालाजी वाहन व्यवस्थापक मंडळाचा रथोत्सव शांततेत पार पाडला कोरोना महामारी मुळे सार्वजनिक रथोत्सवात मिरवणूकीवर बंदी होती. मात्र भाविकांच्या भक्तीला उधाण आले होते. रथाचे जागेवरच पूजन करण्यात आले. रथाला दहा फुटापर्यंत ओढून लागलीच ठिकाणावर ठेवण्यात आले. प्रमुख अतिथींच्या हस्ते रथाची विधीव्रत पूजा करण्यात आली या प्रसंगी जि. प. सदस्य प्रतापराव पाटील, लोकनियुक्त नगराध्यक्ष निलेश सुरेश चौधरी, तहसिलदार नितीन देवरे, नायब तहसीलदार प्रथमेश माहोळ. ए. पी. आय. पवन देसले, मुख्याधिकारी जनार्दन पवार आदींची उपस्थिती होती. प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष प्रा. डी.आर. पाटील सदस्य डी. जी. पाटील, ज्ञानेश्वर महाजन, भानुदास विसावे यांनी प्रमुख अतिथींचा सत्कार केला. मंडळाचे पदाधिकारी प्रशांत वाणी यांनी प्रमुख पाहुण्यांचा परिचय, सुत्रसंचलन करुन आभार व्यक्त केले. प्रसंगी मंडळाचे उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, मंदिर बांधकाम समितीचे जिवन आप्पा बयस, सचिव राजेंद्र पवार सह सचिव किरण वाणी सह असंख्य सभासद उपस्थित होते. रथाची जागेवर पुजा केली असताना सोशल डिस्टेंन्सींग ची जाणीव ठेवण्यात आली, कायदेशीर नियमाचे पालन करुन कोणतेही वाद्य न वाजवता मोजक्या सभासदांचा उपस्थितीत मंत्र पठन व पुजन गणेश पुराणिक यांनी यथासांग शास्त्रोक्त पध्दतीने केले.

रथाच्या मिरवणूकीला कोरोनामुळे स्थगिती असल्याने कसा प्रतिसाद मिळतो याबाबत उत्सुकता होती. नागरिकांनी उत्स्फुर्त प्रतिसाद देवून आयोजकांच्या मेहनतीचे चीज केले. रात्री ९ वाजेपर्यंत मंदिराच्या प्रांगणात नागरिकांची रीघ लागली होती. एकादशीला गावातील सर्व रस्ते जाणू बालाजी मंदिराकडेच वहात होते. मंडळातील सर्व जाणकार सदस्यांनी पथ्य पाळत जनतेला आनंद घेवू दिला या बद्दल सर्वत्र समाधान व्यक्त होत होते.

-संकलन : प्रिया मनोहर पवार
वर्ग: प्रथम वर्ष कला

# मारुती वहन

**धरणगांव (प्रतिनिधी):** सालाबादाप्रमाणे श्री बालाजी वाहन व्यवस्थापक मंडळामार्फत झालेल्या वाहनास बैलजोडी जुंपण्याचा लिलाव मोठया उत्साहात संपन्न झाला. त्यात मारुतीचे वाहनाचा लिलावाच्या वेळी रेकॉर्ड ब्रेक बोली लागली. एरंडोल येथील ॲड. ओम त्रिवेदी यांनी वाहनासाठी ४ लाख २१ हजाराची बोली लावली.

लिलावात मारोतीच्या वहानास जोडी जुंपण्यासाठी सुरुवाती पासुनच चढाओढ झाली. असंख्य भाविकांकडून बोली लावत हे वाहन एरंडोल येथील ॲड. ओम त्रिवेदी यांनी वाहनासाठी ४ लाख २१ हजाराची बोली मध्ये सर्वात जास्त किंमत मिळाली आहे.

या प्रसंगी हजारो भाविक भक्तांनी श्री बालाजी महाराजांचा जयघोष केला.गेल्या दिडशे वर्षापासून येथील बालाजी वहन व रथ उत्सव मोठ्या श्रध्देने व भावनेने सुरु असुन ह्या वर्षी १५ ऑक्टोबर २३ घटस्थापने पासुन प्रारंभ होत आहे. त्यासाठी दि. ६ ऑक्टोबर २३ रोजी जाहीर जोडी लिलावाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्या प्रसंगी हजारोंच्या संख्येने शहर परिसरातील असंख्य भाविक उपस्थित होते.

प्रारंभी मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील यांनी आगामी काळात होणारे रथ व वहनोत्सव मोठ्या उत्साहात व शांततेत साजरा करण्याचे आवाहन केले व उपस्थित भाविक भक्ताचा



भावना जाणून घेतल्या. उर्वरित वहनाचा लिलाव खालील प्रमाणे आहेत!

ध्वजावहन -(गजाननाचे)–१०५०१
हत्तीचे वहन-२१००१, सूर्याचे वहन - १५००१
मोराचे वहन -२०००१, शेषाचे वहन -४६००१
घोड्याचे वहन -. २२६०१, राजहंसाचे वहन-२६००१, मारोतीचे वहन - ४२१११,
दुर्गादेवीचे वहन -३११११, चंद्राचे वहन-१६१११
गरुडाचे वहन -७१११, अंगदाचे वहन - ८१११
पांडव सभेचे वहन -२५१११ या प्रमाणे आहे.

लिलाव प्रसंगी मंडळाचे अध्यक्ष डी. आर पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, कार्याध्यक्ष जिवनसिंह बयस, सेक्रेटरी प्रशांत वाणी, सह सेक्रेटरी अशोक येवले, खजिनदार किरण वाणी व लिलाव जाहीर करतांना मंडळाचे विश्वस्त मंडळ तसेच श्री बालाजी व बजरंग बली चा जयघोष केला. लिलाव सभेला भाविकांची अभूतपुर्व व अलोट गर्दी होती, मंडळाचे सदस्य भानुदास विसवे, ॲड संजय महाजन, भास्कर मराठे व रवि काबरे यांनी लिलाव बोली कुशलतेने सांभाळली, धरणगांव पो. स्टे. पी. एस. आय. समाधान पवार, पो. कॉ. विजय धनगर, वैभव बोरसे हे उपस्थित होते.





संकलन प्रिती मनोहर पवार
वर्ग- प्रथम वर्ष कला

## नवरात्री उत्सव

नवरात्रीच्या सणाला संपूर्ण भारतात मोठ्या जल्लोषात साजरा केला जातो. नवरात्र हा फक्त नऊ दिवसाचा एक मोठा उत्सव आहे, ज्यात दुर्गा देवीची मोठ्या उत्साहाने पूजा केली जाते. हिंदू धर्मानुसार नवरात्र वर्षातुन दोनदा साजरा केली जाते. नऊ दिवसाच्या उपासनेनंतर नवरात्र दहाव्या दिवशी धुमधडाक्याने साजरी केली जाते. नवरात्र नऊ दिवस सतत चालू असते. ज्यात देवीचे विविध रुपाची लोक भक्तीने पुजा करतात, भारतातील नवरात्र वेगवेगळ्या पध्दतीने वेगवेगळ्या राज्यामध्ये आजही केली जाते.

दुर्गा देवीने महिशासुर राक्षसाला ठार मारले होते. या राक्षसाचा ब्रह्मदेव यांनी वरदान दिले होते ज्यामुळे त्याने कहर केला होता. जेव्हा लोक त्याच्या अत्याचारामुळे अस्वस्थ झाले तेव्हा ब्रह्मा, विष्णू आणि शिव यांनी त्यांची सर्व शक्ती मिळवून दुर्गादेवीची निर्मिती केली होती. देवी दुर्गाला आठ हात होते आणि प्रत्येक हातात एक एक शस्त्र असते. दुर्गा देवीने नऊ दिवस राक्षसाशी लढा दिला आणि शेवटी दहाव्या दिवशी जाऊन त्याचा वध शैलपुत्री या रुपात केला नऊरात्रीच्या दिवसात पहिल्या दिवशी शैलपुत्री देवीची पूजा केली जाते. या जगात आपले स्थान मिळवणे हे त्याचे उद्दीष्ट आहे.

नवरात्रीच्या तिसरे दिवशी भक्त दुर्गा देवीच्या चंद्रघंटा रुपाची पूजा करतात. चंद्रघंटा हे नांव यामुळे दिले कारण आईचे रुप चंद्रसारखे चमकते. नवरात्रीच्या चौथ्या दिवशी लोक दुर्गादेवीच्या कृष्मांडा रुपाची पूजा करतात. नवरात्रीच्या पाचव्या दिवशी स्कंदमाता देवीची पूजा केली जाते. तिला कार्तकी माता असेही म्हणतात, त्याची नवरात्रीच्या सहाव्या दिवशी दुर्गा देवीच्या कात्यायनी रुपाची पूजा केली जाते. नवरात्रीच्या सातव्या दिवशी दुर्गा देवीच्या कालरात्रीच्या रुपाची पूजा करतात.

नवरात्रीच्या आठव्या दिवशी दुर्गा देवीचे महागौरी रुप पूजले जाते. नवरात्रीच्या नवव्या दिवशी दुर्गा देवीच्या सिध्ददात्री रुपाची पूजा लोक करतात. नवरात्रीच्या सुरुवात चैत्र शुक्ल पक्षात असते नवरात्रीच्या दिवसात हिंदू आपल्या घरात घटाची स्थापना करतात, त्याचबरोबर लोक दुर्गापाठही वाचतात. लोक आठ दिवस फक्त फळांचे सेवन करतात व आठव्या दिवशी दुर्गाष्टमी साजरी केली जाते आणि नवव्या दिवशी सप्तनवमी साजरी केली जाते. गुजरात, पश्चिम बंगाल आणि महाराष्ट्र यासारख्या राज्यामध्ये नवरात्र शरद ऋतूत साजरी केली जाते.

नवरात्र साजरी करण्यासाठी गुजरात राज्यात गरबा नृत्य केले जाते या काळात गरबा आणि दांडीयांचे पर्व सुरु केले जाते. नवरात्र हे पर्व खूप आनंद , उल्हास आणि भक्ती भावाने साजरा केले जाते. या दिवसात उपवास करुन हा उपासना काल ही मानला जातो.

संकलन : **गायत्री गणेश माळी**
वर्ग : प्रथम वर्ष, कला

धरणगांवचा अस्सल धार्मिक सोहळा म्हणजे वहनोत्सव व रथोत्सव, वहन हे साधारण चित्ररथासारखे असते. त्या उत्सवाची सुरुवात घटस्थापनेपासून होऊन समाप्ती कोजागिरी पौर्णिमेला होते. दररोज नवीन देवतेचे वहन त्यासाठी काही दिवस अगोदर वहनाला जुंपल्या जाणाऱ्या बैलजोडीचा लिलाव बालाजी मंदिरात लाऊडस्पीकर लावून केला जातो. लिलाव ऐकण्यास गर्दी होते. श्रध्दाळू भाविक बोली लावतात. सर्वात जास्त बोली मारुतीच्या वहनाला लागते. त्यासाठी चढाओढ असते. प्रत्येक वहनाचा मार्ग ठरलेला असतो. त्या मार्गाची साफसफाई संध्याकाळी तीन-चार वाजल्यापासून होते, रात्रभर चालते. वहन ज्या रत्स्यावरून जाणार त्या गल्लीतील बायका-माणसे रात्रीच्या वेळी त्यांच्या झोपलेल्या मुलांना सुध्दा जागे करून वहनाला नमस्कार करण्यास लावतात. वहन खरेदी करणाऱ्या श्रध्दाळूला वहनाच्या वाजंत्रीचा; तसेच, वहनापुढे नाचणाऱ्या लेझीम पथकांच्या बक्षिसाचा खर्च करावा लागतो.वहनाच्या पुढे नाचणाऱ्या लेझिम पथकांत वेगवेगळ्या समाजांचे चमू असतात. मुलांमध्ये पथकात नाचण्यासाठी ईर्षा असते. गुलाल वारेमाप उधळला जातो. ती मुले शेवटच्या रांगेत नाचणे शिकुन दरवर्षी एकेका रांगेची बढती होत पुढे पहिल्या-दुसऱ्या रांगेत नाचण्यासाठी तयार होतात!

मारुतीचे वहन संध्याकाळी चार वाजल्यापासून निघून दुसऱ्या दिवशी दोन वाजेपर्यंत परत बालाजी मंदिरात येत दरम्यान, एकादशीला रथ बालाजी मंदिरापासून कोटापर्यंत दोराने ओढत दिमाखात निघतो. भाविक रथाचे दर्शन घेण्यासाठी आजूबाजुला पाच पंचवीस खेड्यापाड्यातून आलेले असतात.





## श्री बालाजी मंदिर



श्री. दिलीप रामू पाटील यांच्या अध्यक्षते खाली गावाच्या बालाजी मंदिराचा जीर्णोध्दार चालू आहे. जवळपास तीन कोटी रुपये खर्चाचे ते मंदिर धरणगांवास एक वेगळ्या उंचीवर नेऊन बसवणार आहे. असे मानले जाते. धरणगांवला त्या मंदिरामुळे तीर्थक्षेत्र पर्यटनाचा दर्जा मिळाला आहे. मंदिर सोनपाषाण दगडात बांधले जात असून त्यासाठी गुजरात मधील कच्छ येथून दगड मागवण्यात आला आहे. त्या दगडाचे वैशिष्ट्ये म्हणजेच तो पाच हजार वर्षे टिकतो. त्याच्यावर ऊन, वारा, पाऊस याचा काही परिणाम होत नाही. उलट, अशा नैसर्गिक वातावरणात त्याची चकाकी वाढते. त्या कामासाठी मा.पर्यटनमंत्री श्री.जयकुमार रावल व मा.पालकमंत्री श्री. गुलाबराव पाटील यांनी दोन कोटी एक्याण्णव लाख रुपयाचा निधी मंजूर करुन घेतला आहे. धरणगांवातील डॉक्टर कै. टी. डी. कुडे यांच्या परिवाराने गर्भशिखराचा खर्च म्हणून अकरा लाख अकरा हजार एकशे अकरा रुपयांची देणगी जाहीर केली आहे.

धरणगांवः माणसाची श्रध्दा कशी साधी आणि भक्तीपूर्ण असू शकते याचा प्रत्यय नुकताच धरणगावकरांना आला. एका अज्ञात गृहस्थाने धरणगावच्या श्री बालाजी मंदिराच्या जीर्णोध्दारासाठी ७१ हजारांची देणगी दिली आहे. २० मार्च रोजी चौकशी करत -करत श्री बालाजी वहन व्यवस्थापक मंडळाचे अध्यक्ष श्री.डी.आर पाटील. यांच्याकडे आला होता. त्यावेळी त्या व्यक्तीने सांगितले की, मी २०१० मध्ये श्री मारोतीच्या वहनाच्या दर्शनाला आलो व नमस्कार करुन माझ्या कंपनीत मला बढती मिळू दे, अशी प्रार्थना मारोतीरायाला केली होती. ६ महिन्यांनी मला पूर्वलक्षी प्रभावाने बढती मिळाली. यानंतर २६ सप्टेंबर रोजी या अज्ञात व्यक्तीने मागील फरकाची रक्कम श्री बालाजी मंदिराच्या बांधकामासाठी अर्पण केली. श्री बालाजी मंदिराच्या बांधकामाच्या कामाला सर्वमान्य लोकही अनामिक राहून सहकार्य करतात याचे हे उदाहरण आहे.

अशा उदाहरणामुळे आम्हा काम करणाऱ्यांनाही उत्साह मिळतो. लवकरच राजस्थानच्या मजुरांना बोलावून पुन्हा मंदिराचे काम पूर्ववत सुरु करणार आहोत. असे मंडळाचे अध्यक्ष डी. आर. पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, जीर्णोध्दार प्रमुख जिवन बयस, सचिव राजेंद्र पवार, सहसचिव प्रशांत वाणी व अशोक येवले यांनी सांगितले.

धरणगांव प्रतिनिधी: परिसरातले श्रध्दास्थान असलेल्या श्री बालाजी मंदिर सभागृह व भक्तनिवासाचे भूमीपूजन कार्यक्रम दि. १४ शनिवार २०२४ रोजी सकाळी ९ वा संपन्न होणार आहे.

भुमिपूजन ना. श्री.जयकुमार रावल (पर्यटन विकास मंत्री) यांचे हस्ते होणार आहे. कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान ना. गुलाबराव पाटील (सहकार राज्यमंत्री, महाराष्ट्र) हे भूषवणार असून प्रमुख अतिथी म्हणून सौ. अंजली आनुदास विसावे (प्रभारीनगराध्यक्ष धरणगांव नगरपालिका ) सर्व नागरिक बंधू – भगिनींनी मोठ्या संख्येत उपस्थित रहावे असे आवाहन श्री बालाजी वाहन व्यवस्थापक मंडळ धरणगांवचे अध्यक्ष डी.आर. पाटील, उपाध्यक्ष गुलाबराव वाघ, सचिव राजेंद्र पवार यांनी केले आहे.

संकलन : **गायत्री गणेश माळी**

प्रथम वर्ष कला

धरणगावच्या श्री बालाजी मंदिराच्या बांधकामासाठी भाविकांकडून मदतीचा ओघ











# माता कानबाई व रानबाई उत्सव

कानबाई व रानबाई ह्या अनुक्रमे राधा व चंद्रावली (रुक्मिणी) देवी होत. खानाच्या नावने कानबाई बसवली जाते असा उपप्रचार आहे पण या उत्सवाला पाच हजार वर्षांची परपरा आहे आणि खानांचा इतिहास तेवढा पुरातन नाही म्हणून ते तत्थ्यात्मक नाही.

श्रावणातल्या पहिल्या रविवारी कानबाई किंवा कानुबाई हा उत्सव खान्देशात उत्साहाने साजरा होतो. त्यासाठी तिथी वैगेरे बघत नाही. कानबाई उत्सवाला फार जुनी परंपरा लागली आहे. कुणी म्हणतं पुर्वी खानाचं राज्य होतं त्या तुझ्या नावाची म्हणजे कानबाई साजरी करतो. असा हा हिंदुंचा सण साजरा करत होते. कुणी म्हणतं हा खान्देश कान्हादेश ! खान्देशी लोक कान्हा म्हणजे श्रीकृष्णाला मानतात म्हणून त्यांनी देवीचा उत्सव सुरु करण्यासाठी कानबाई हे नाव घेतलं असावं. असो. हा उत्सव प्रमुख्याने सोनार, शिंपी, चौधरी, माळी, पाटील या समाजात साजरा होतो.

या उत्सवाच्या आधीही दिवाळी सणाच्या आधी करतो तशी घराला रंग रंगोटी होते. घरातील भांडी घासुन पूसुन स्वच्छ केली जातात. पडदे, चादरी, बेडशीटस् कव्हर्स सगळे धुवून घेतात. एकत्र कुटूंब असेल तर रोटांसाठी घरातील लहान मोठ्या पुरुषांना मोजून प्रत्येकाची सव्वा मुठ असे धान्य म्हणजे गहु व चण्याची दाळ घेतले जाते. ते चक्कीवालीला आधी सांगून (तो मग चक्की धुवून पुसून ठेवतो) चक्कीवरुन दळून आणले जाते. विशेष म्हणजे या दिवशी चण्याच्या दाळीचाच स्वयंपाकात जास्त वापर असतो पुरण पोळी, खीर, कटाची आमटी, चण्याची दाळ घालून गंगाफळ /लाल भोपळ्याची भाजी असा थाट असतो. कांदा लसूण वर्ज्य असतो. साडयांचे पड़दे लावून डेकोरेशन केले जाते. कानबाईचे नारळ

या उत्सवाच्या आधीही दिवाळी सणाच्या आधी करतो तशी घराला रंग रंगोटी होते. घरातील भांडी घासुन पूसुन स्वच्छ केली जातात. पडदे, चादरी, बेडशीटस् कव्हर्स सगळे धुवून घेतात. एकत्र कुटूंब असेल तर रोटांसाठी घरातील लहान मोठ्या पुरुषांना मोजून प्रत्येकाची सव्वा मुठ असे धान्य म्हणजे गहु व चण्याची दाळ घेतले जाते. ते चक्कीवालीला आधी सांगून (तो मग चक्की धुवून पुसून ठेवतो) चक्कीवरुन दळून आणले जाते. विशेष म्हणजे या दिवशी चण्याच्या दाळीचाच स्वयंपाकात जास्त वापर असतो पुरण पोळी, खीर, कटाची आमटी, चण्याची दाळ घालून गंगाफळ /लाल भोपळ्याची भाजी असा थाट असतो. कांदा लसूण वर्ज्य असतो. साडयांचे पड़दे लावून डेकोरेशन केले जाते.



मुख्यतः पुर्वापार चालत आलेले असते. किंवा परनुन आणलेले असते.

कानबाई परनुन आणणे ... म्हणजे ! पुर्वीच्या काळी एखाद्या खेड्यात ठरवून गावचे पाटील लोक गावोगावी आमंत्रण पाठवायचे. ज्या घरातील बाईला काही कापलेलं भाजलेलं नाही अंगावर एकही डाग नाही. अशा सवाष्णी निवडल्या जायच्या, सासरी असल्या तरी सासरकडचे लोक घेऊन यायचे. तेव्हा गावात उत्सव व्हायचा. त्या स्त्रियांना नाना वस्त्रालंकारांनी सजवून त्यांची पुजा करायचे. गावची गाव जेवायला असायची टनाने पुरणपोळ्या रांधल्या जायच्या अक्षरशः बैलगाड्यांवर स्वच्छ धुतलेली धोतर अंथरुन शिजवलेला भात रांधला जायचा. हा सगळा स्वयंपाक नदीवरुन पाणी आणण्यापासून पुरुष मंडळी करायची तिथे त्या सवाष्णींनी स्पर्श केलेला नारळ घेऊन तोच वर्षानुवर्षे पुजेत वापरला जायचा आता चाळीसगांव, उमरखेडला कानबाईचं मंदिर बांधलय. ज्यांना नविनच कानबाई बसवायची असेल तर ते नारळ घेऊन तिथल्या मुर्तीला स्पर्श करुन आणतात. तर असे हे परनुन आणलेलं नारळ त्या दिवशी धुवुन घेतात. त्याला नथ,डोळे, बसवुन इतरही पारंपारिक दागिन्यांनी कानबाईचा साजश्रृंगार केला जातो. केळीचे व कण्हेरीचे खांब बांधलेल्या चौरंगावर तांब्याचा कलश ठेऊन तीची स्थापना होते. कण्हेरीला खान्देशात फार महत्त्व आहे. काही गाण्यांमध्ये कण्हेरीलाच कानबाई संबोधलं जाते. कलशावरुनच गळयातले हार मणी, मंगळसुत्र चढवले जाते. वरुन शेवंतीची वेणी लावुन ओढणी लावली जाते. मग आरती व नैवद्य दाखवतात. नैवदयाला अर्थातच् पुरणपोळया, पुरणाचेच दिवे, देवीचा सगळा साज म्हणजे भंडारा, वेणी, फणी, आरसा, बांगड्या, टिकली, पोळपाट लाटणे, तवा हे सगळं कणकेचंच केलं जाते. (ही कणीक पण स्पेशली पीठात साजुक तुप घालून दुधात मळलेली असते.) कटाची आमटी,लाल भोपळ्याची (डांगराची) भाजी, पापड, भजे हे सर्व काशाच्या ताटात ठेवून देवीला ओवाळतात.



इतर सणासारखाच इथे ही ज्येष्ठांना मान असतो. रात्री जागरण केले जाते. फुगड्या, गाणी म्हटलेजातात. काही जणांकडे फक्त रोट असतात. मग ते रोट परातीत घेऊन कानबाईच्या दर्शनाला सहकुटूंब येतात. यादिवशी कुणी कानबाईला काही मानता / नवस केला असेल तर तो फेडण्या साठीही गर्दी होते. मुख्यतः नारळाच्या तोरणाचा नवस असतो. आपल्या घरी दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भक्ताला ज्वारीच्या लाह्या फुटाण्याचा प्रसाद दिला जातो. काहींकडे हातापायाची कानबाई असते. तर काहींकडे

# माता कानबाई व रानबाई

**रात्री जागरण केले जाते. फुगड्या, गाणी म्हटलेजातात. काही जणांकडे फक्त रोट असतात. मग ते रोट परातीत घेऊन कानबाईच्या दर्शनाला सहकुटूंब येतात. यादिवशी कुणी कानबाईला काही मानता / नवस केला असेल तर तो फेडण्यासाठी ही गर्दी होते. मुख्यतः नारळाच्या तोरणाचा नवस असतो. आपल्या घरी दर्शनाला येणाऱ्या प्रत्येक भक्ताला लाह्या फुटाण्याचा प्रसाद दिला जातो.**




कानबाई रानबाई अशा दोघी बहिणी दोन वेगवेगळया चौरंगावर बसवतात. दुसऱ्या सकाळी लवकर उठून कानबाईंच्या विसर्जनाची तयारी होते. कानबाईची आरती करुन अंगणात चौरंग नेऊन ठेवतात. गल्लीतील सगळ्या कानबाया एकाच वेळेस मिरवणूकीत ढोल ताशांच्या गजरात कानबाईचा चौरंग डोक्यावर घेऊन बायका नदीवर किंवा विहरीवर निघतात. कानबाईचा नित्यास्त्रीचा नमस्कार करण्यासाठी ही झुंबड उडते. कानबाई पुढे मुले, मुली, स्त्रीया फूगड्या खेळतात. वाजत गाजत जातांना समोरुन जर दुसरी कानबाई आली तर दोनी कानबायांची चौरंग (डोकयावर धरलेल्या स्थितीतच) जोडून भेट घडवली जाते. अशातच एखादया कानबाई धरलेल्या स्त्रीच्या अंगात आले तर ती त्याही स्थितीत नाचते पण, विशेष म्हणजेडोक्यावरचा कलश नि कानबाई अजिबात सरकत नाही .

नदीवर पुन्हा एकदा आरती होऊन कानबाईच्या नारळाव्यतिरिक्त सगळयाचे विसर्जन होते. नदीतलीच वाळू घेऊन त्यावर कलश नि आपापले कानबाईचे नारळ डोक्यावर घेऊन पुन्हा वाद्यांच्या गजरात घरी परत येतात. पुरणाचे दिवे मग मोडुन त्यांचा बारीक चुरमा केला जातो. दही, दुध, तुप घालून ह्या चुरम्याची चव अप्रतिम असते. मग हा चुरमा नि पुरणपोळ्यांचा वगैरे देवीला आदल्या दिवशी दाखवलेला नैवद्य हे सगळं काशाच्या त्या एका ताटातच देवीचा प्रसाद म्हणून फक्त घरातीलच लोक खातात. अगदी लग्न झालेल्या मुलींना हा प्रसाद वर्ज्य असतो.

दुसऱ्या दिवशी नि तिसऱ्या दिवशी पण रोटाचंच जेवण असते रोट (म्हणजे सवा-सवा मुठ गहु घेऊन दळून आणलेलं पिठ) संपेपर्यंत ते खावंच लागतं रोट संपे पर्यंत जेऊन हात धुतलेलं पाणी नि उष्ट्या ताटातील पाणी सुध्दा खड्डा करुन त्यात ओततात. काहीही उष्ट गटारीत किंवा इकडे तिकडे पडू देत नाहीत. पौर्णिमेच्या आत रोट संपवावे लागतात. जर मधेच पौर्णिमा आली तर त्याआधी उरलेलं पीठ खड्डा करुन पुररुन टाकतात.कानबाईमुळे घरातली, गावातील इडा पीडा टळते. असा लोकांचा दृढ विश्वास आणि श्रध्दा आहे. ज्या गावाला हा उत्सव साजरा केला जातो.त्या गावाला दोन-तीन दिवस खुप मोठा आनंद असतो. कानबाईचं विसर्जन झाल्यावर कानबाईला घरात नेतात. व देवघरात ठेवतात. व नित्यनेमाने रोज पुजा करतात.

- संकलनः **कोमल सुरेश पाटील**
- एफ. वाय. बी. ए.

संकलनः
**कोमल सुरेश पाटील**
प्रथम वर्ष कला

# बैल पोळा सण







**बैलपोळा हा भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण मानला जातो. या सणाला खूप महत्त्व आहे. प्राण्यांचा एकमेव सण हा साजरा केला जातो.**

**म्हणून या सणाला खूप भावनिकदृष्ट्या पाहिले जाते. बैल पोळ्याचे महत्त्व शेतकऱ्यांना विशेष आहे, कारण बैल हे शेतीसाठी आवश्यक असा प्राणी आहे. ते शेतात नांगरणी, खते टाकणे, कापणी करणे, वजन वहाणे इ. कामे करतात. बैलाच्या मेहनतीमुळे शेतकऱ्यांना चांगले पीक मिळते. म्हणून शेतकरी बैलाचे आभार मानण्यासाठी बैलपोळा सण साजरा करतात.**

भारत हा एक कृषीप्रधान देश आहे. शेतीमध्ये बैलांचे योगदान हे बहुमूल्य आहे. त्यामुळे या बैलांची भारत देशात पुजा केली जाते. पोळा हा सण त्यापैकीच एक आहे. या दिवशी शेतकरी गायी आणि बैलांची पुजा करतात. पोळा सण विशेषतः छत्तीस गड मध्यप्रदेश आणि महाराष्ट्र राज्यात साजरा केला जातो. बैलाबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा दिवस आहे.

महाराष्ट्रात व कर्नाटकात बैलपुजे निमित्त साजरा केला जाणारा एक हिन्दू सण म्हणजे पोळा. सर्वसामान्यतः श्रावणी अमावस्येच्या दिवशी शेतकरी वर्ग हा सण मोठ्या उत्साहात साजरा करतो. प्रदेशपरत्वे हा सण आषाढ महिन्यात मूळ नक्षत्र असलेल्या दिवशी किंवा श्रावण अथवा भाद्रपद महिन्याच्या अमावस्येला साजरा करतात. या सणाचे शेतकरी वर्गात विशेष महत्व आहे. या दिवशी बैलांना सजवून रंगवून त्यांची पुजा करतात. पुजा करण्याआधी बैलांना मारुतीच्या मंदिरात दर्शनाला घेऊन जातात आणि सकाळी देवी देवतांना नारळ फोडतात. गावातल्या दर्जाच्या बाहेर उभे करतात. पहिली जोडी पोलीस पाटलाची असते. तेथे वाजा ही असतो. तिथुन जोड्या निघतात. आणि ज्याच्या त्याच्या घरी बैलांची आरती व पुजा केली जाते. त्यानंतर त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य देतात. तीन ते पाच च्या दरम्यान हा सण शेतकरी बांधव साजरा करतात त्याला पोळा फूटला असेही म्हणतात. गावातील सर्व बैलांची डी.जे. किंवा बँड लावून मिरवणुक

काढतात. काही ठिकाणी बैलांची शर्यतही लावतात. ज्याच्या घरी बैल नसतात तर ते मातीच्या बैलांची पुजा करतात. कुंभार मातीच्या बैलाची छोटीछोटी मातीचे मुर्ती करुन 'बैलं घ्या बैलं... ' अशी हाळी देत दारोदार विकत फिरतात. सकाळी दाराला आंब्यांच्या पानांचे तोरण घराला बांधतात. या दिवशी शेतकरी बांधव बैलांकडून कोणतेही काम करुन घेत नाही. बैलांना दैवत मानून त्यांची वर्षातून कृतज्ञता व्यक्त करतो, त्याच्याबद्दल पुज्य भाव व्यक्त करतो.

या सणास दक्षिण महाराष्ट्रात बेंदुर असेही म्हणतात. या सणांमुळे धनधान्याची व गोधनाचि समृध्दी होते अशी समजुत आहे. पशुपुजेच्या ह्या प्रकारचे मूळ मानवाने ज्या काळात पशुपालनास आरंभ केला त्या प्राचीन अवस्थेत असणे शक्य आहे. सकाळी बैलास हळद, बेसन पेस्ट लावून तेलाने मालीश केली जाते. यानंतर त्यांना गरम पाण्याने आंघोळ घातली जाते. बैलांना चांगले सजवले जाते. शिंगांना रंगीबेरंगी कलर दिला जातो, गोंडे फुगे, घुंगरूच्या माळा घालून सुशोभीत केले जाते सकाळी पोटभर वैरण खाऊ घालतात. डोळ्यात काजळ भरतात. अंगावर झुल टाकली जाते नाकात नथनी घातली जाते. कपाळाला गंध आणि आरशाचे बाशिंग बांधले जाते. बैल पोळ्याच्या दिवशी अगदी बैल नवरीहून सुंदर दिसतो. त्याच्या पायात चांदीचे तोडे घालतात.

बैलपोळा हा भारतीय संस्कृतीतील महत्त्वाचा सण मानला जातो. या सणाला खूप महत्त्व आहे. प्राण्यांचा एकमेव सण हा साजरा केला जातो. म्हणून या सणाला खूप भावनिकदृष्ट्या पाहिले जाते. बैल पोळ्याचे महत्त्व शेतकऱ्यांना विशेष आहे कारण बैल हे शेतीसाठी आवश्यक असा प्राणी आहे. ते शेतात नांगरणी, खते टाकणे, कापणी करणे, वजन वहाणे इ. कामे करतात. बैलाच्या मेहनतीमुळे शेतकऱ्यांना चांगले पीक मिळते. म्हणून शेतकरी बैलाचे आभार मानण्यासाठी बैलपोळा सण साजरा करतात. हा सण साजरा करण्यामागे एक कथा जुन्या काळापासून सांगतात. एक दिवस कैलासात भगवान शंकर आणि माता पार्वती सारीपाटाचा (चौपट) खेळ खेळीत होते. या खेळात माता पार्वती विजयी झाली परंतु भगवान शंकर मात्र स्वतः जिंकलयाचे म्हणाले. ते व्हा तिथे उपस्थित असलेल्या नंदीला माता पार्वतीने विचारले की या खेळात कोण जिंकले तेव्हा नंदीने भगवान शंकराचे नाव घेतले त्यावर माता पार्वती क्रोधीत झाल्या आणि नंदीला शाप दिला की पृथ्वीवर तुझ्या मानेवर सदैव नांगर राहील तुला जीवनभर कष्ट करुन जगावे लागेल. हे ऐकून नंदी घाबरला आणि त्याने आपली चूक मान्य केली. त्यावर पार्वतीने त्याला सांगितली, शेतकरी वर्षातून एक दिवस तुला देव मानून तुझी पुजा करेल. तेव्हापासून बैलपोळा हा सण साजरा करतात. हा सण सुध्दा शेतकऱ्यांसाठी एक आनंद घेऊन येतो. ज्याच्या जोडीला सर्वात चांगले तयार केले असेल त्या जोडीला पारितोषिक दिले जाते. आपापल्या गावातील परंपरेनुसार उत्सव साजरा झाल्यानंतर कार्यक्रम संपन्न होतो.

■ ■ ■



माझी वसुंधरा

# कमळाबाई मंगेशरावांची लेक

नांव – **मोहिनी प्रमोद शिंदे**,
एफ. वाय. बी.ए., रोल नं. ४१



चैत्र गौरीच हळद कुंकू असलं की, आमचा उत्साह विचारायलाच नको. चुकून कोणी राहू नाही म्हणून बरेच दिवस अगोदर पासून यादी व्हायची आईच्या सुरेख अक्षरात लिहिलेली ही यादीसाठी उलटली तरी ते सुवास अद्यापही अवती-भवती रुंजी घालत असेललं जाणवतं.

सासरी गौरीचं आगत स्वागत तर व्हायचं पण आरास बिरास नसायची, मन भंवरलालच्या हाती घरोघरी आमंत्रण यादी पोहोचल्याच्या सहिनिशी परत यायची. आरास कशी करायची, याचं चर्वित वर्णन करायचं आमचं काम, तर किती कैऱ्या आणायच्या? वाटल्या डाळीकरता किती चण्याची डाळ भिजवायची? किती शेराच्या करंज्या करायच्या? याचा हिशोब व नंतरची ढोर मेहनत आईच्या माथी असायची.

सुगंधी फुलांच्या उद्‌बत्त्यांच्या व अत्तराच्या घमघमाटात न्हालेली ही संध्याकाळ इतकी अविस्मरणीय असायची की, वयाची हिरमुसायचं व माहेरची गौर आठवायची वाढत्या वयाबरोबर गौरीबरोबर इतरांच पण आगतस्वागत करणं पण जड जाऊ लागल्यावर मनात विचार केला. गौरीला तर माहेरवासाचा आनंद घ्यावयाचाच. पण त्या पासून मिळणारा स्वतःचा आनंद मात्र वेगळ्या मार्गाने उपभोगायचा ठरला तर मग गौरीपूजा करायचीच पण भरल्या पोटी डाळ, करंज्या खाऊ नाही घालायच्या एकदा या निर्णयाप्रती आल्यावर मी आनंद वृध्दाश्रम, अनाथाश्रम व आसपासच्या झुभ्यांमध्ये राहणाऱ्या पोरांमध्ये शोधत राहण्याचा उपक्रम सुरु झाला.

आता या वर्षी काय करावं याचा विचार करत होते. वर्षभरापूर्वी आम्ही ह्या पन्नास कुटूंबांना गिळंकृत करुन बसलेल्या बहुमंजिली भवनात रहायला आलो होतो. प्रत्येक घरात वेगळ्या वेगळ्या बायका यायच्या एखाद् दोन सोडल्यास जवळ-जवळ सर्व 'अन्नासाठी दाही दिशा आम्हा फिरवशी जगदिशा' हे सिध्द करुन बाहेरुन आलेल्या आणि त्या पण नऊवारी लुगडं, चोळी, कपाळाच्या गोंदणावर आडवी चिरी किंवा रुपया एवढं कुंकू लावून डोईवर पदर घेतलेल्या, महाराष्ट्रातल्या खेड्यापाड्यातल्या! यावर्षी यांनाच का नाही बोलवावं हा विचार मनात येईस्तोवर तो पक्का रुजलाही. फुकटचा सल्ला नाही, तर औषधसुध्दा देणाऱ्या भाऊ व बहिणी बायचं आमंत्रण व स्विकारण्याचा प्रश्नच उद्‌भवत नव्हता.

सर्वांनी त्यातल्या त्यात ठेवणीतली लालचुटूक पदराची लुगडी काढली होती. एखाद दोघींच्या नाकात नथी पण होत्या. कानाच्या पाळींना भोक करायची फॅशन आजकाल आली आहे; पण ही फार जुनी पध्दत होती . जरी सर्वांच्या पाळ्यांना भोकं होती, तरी एखादा अपवाद सोडता काप गेले आणि भोकं राहिली; अशी त्यांची परिस्थिती होती. हळदी कुंकू खाणपिणं झाल्यावर मी त्यांना नाव घ्यायचा आग्रह केला. ए मनोज ए सुव्रत अशा हाका मारणाऱ्या पिढीला या नांव घेण्यातलं संगित उमजणं शक्यच नाही. 'मले नाही येत तूच घेशीला. '.असा त्यांचा एकमेकींना आग्रह होता. या कोलाहलातच चादीची डबी किंवा

# कमळाबाई मंगेशरावांची लेक

अत्तराचा बोळा कधिही पाहिला नसतांही  चांदिच्या डबीत अत्तराचा बोळा, अन् रामरावांच नाव आहे शंभर रुपये तोळा...म्हणत शेवंतानं  ' पैला नंबर' लावला, रखमाबाईला मात्र परिस्थितीची पूर्ण जाणीव असल्याचं तिच्या उखाण्यावरून समजलं. 'नको गाडी घोडा, नको वतनवाडा शिरपत रावांच्या नावाचा हातभर चुडा ' यातच तिचं सौख्य होतं । मथुरेन नाव घेतले  'जानकी जीवन राम, पतीत पावन राम वामनरावांच्या जिवावर असे मथुरेला आराम' असे म्हटले तरी, सत्य स्थिती पुढे ठेवायची, तर वामनराव व मथुरा या दोन शब्दांच्या जागांची अदलाबदल करण योग्य ठरलं असतं. कधी अंगभर लुगडं नेसायला मिळालं, तर भाग्य ; अशा स्थितीतल्या वरणाबाईला  'येवल्याच्या पैठणीला मोनेरी जोरतार ... भाग्याने लाभले पंढरीनाथ भ्रतार ' म्हणतांना ऐकलं आणि तिची खरोखरचं वाहवा कराविशी वाटली, कारण पंढरीनाथ भ्रतार तिला भाग्याने नाही तर अभाग्यानेच भेटवले होते. आपलं खेड्यातलं सर्व घर  शेतीवाडी सर्व इथं मोलाची कामं करणाऱ्या बायकांच मन मात्र गावच्या हिरव्यागार शेतातच राहिलेल असतं हे म्हाताऱ्या कोंडाबाईवरून जाणवलं

**पाऊस पडे झिरमिरी,**
**बेल केलं हारोहारी,**
**तिथं माझा शिरहरी.**
**झाली पान्याची बरकतं**
**आना-आना कृस्णाबाईचं**
**अन दत्ताजी रावांस्न नाव**
**कोंडाबाई रानी'**



**मोट धरलिया चाड्यावरी**
**पिक आलं नानापरी**
**मळ्यात राबती कारभारी**
**धान्याची रास भरते हरखत**
**पानी**
**घेते**

घालवावे लागणाऱ्या प्रसंगी एक घडाभर पाण्याकरता तासन्तास पाण्याकरता एक दुसऱ्याच्या उत्तरावर बसणाऱ्या कोंडाबाईला कल्पनेत का होईना, 'कृस्नाबाईचं पानी ' आल्यानं  'पान्याचाी आणि 'धान्याची आलेली बरकत निश्चितच सुखावून गेली असेलं यात मुळीच शंका नाही. 'आत्तीबाय बसल्या चुलीपाशी तर किसनरावांशी बोलुं कशी ? तेव्हा 'सिताबाय पोरीले खिनभर तरी दादल्या संग बोलू दीना.. ' .म्हणून गमतीत सर्वांनी केलेला गिल्ला सिताबायच्या काळजात रुपला तिच्या हिशोबी आजच्या पोरींना खट्याळ सासवा कशा छळायच्या, याची कल्पना सुध्दा नाही.. या गरीब गाईला सासुनं आतोनात छळलेलं होतं. या छळात भर घालायला येणारे-जाणारे पाहुणे व एका पाठोपाठ येणारे वर्षाचे सणपण असायचेचं, कंबरड मोडलं नाही तरच आश्चर्य!

कशी कंबर मोडायची माहित आहे कां ?



**'पंचमिन लावला डोळा, आला शेरावानी पोळा'**
**पोळयाची काढते चित्र, तंबर वडिलांची  आली पित्रं**
**पित्रांची निवडते डाळ, तर घाईत आली घटांची माळ**
**माळत ओवते जाई, तर दिवाळी आली घाई घाई,**
**दिवाळीची लावते पणती, तर संकरांत आली नेणती,**
**संकरांतीचं पुजते सुगडं, जव्याची पुजव आली दुघड**
**पुनवेची घेते ओंबी, शिमगा मारतोय झोंबी,**
**शिमग्याची काढू सोजी, पाडवा आलाय राजी,**
**पाडव्याची उभारते गुढी, आखातिज आली लाडी,**
**आखातिजेचा पुजते करा, शंकररावांच नाव घेते, वाईच् दम धरा... '**

आम्हाला दम धरा  म्हणता-म्हणता एवढा उखाणा घेता-घेता तिलाच दम लागला होता. तो परत घेतलेल्या

थंड पन्ह्यानं सावरला...

कुरुपातच जमा होणाऱ्या राही आणि श्रीपतीकडे पाहुन चंद्र हसु शकतो, हे एकुण मला वाटणाऱ्या माह्या सौंदर्याचा अभिमान पार गळाला आणि स्वतःचीच किव आली. कारण –

**चंदनाचा पाट  त्यावर रुप्याचे ठसे त्यावर शिरपतराव बसे,**
**पर मला ते चंद्रावानी दिसे, आणि मी लाजल्याली बगुन चंद्र बी हसे**
**माझ्याकडे तर चंद्राने बघितलेलं सुध्दा नव्हतं, हसणं तर दुरचं ! '**

या बायकांमध्ये वयस्कर असणाऱ्यांनी गंधर्वाची नाटकं पाहिली नसली, तरी त्यांची किर्ती उखाण्यात जरुर गुंफली.

**गंधर्वाची कंपनी, सौभद्राचा खेळ**
**भिमरावांच्या आगारातली सोनुबाई केळं**

दारु ढोसल्यावर भिमरावात खरीच भीमाची शक्ती अवतरायची आणि सोनुबाईची केळ आल्यादिवशी उमळून पडायची; पण शिव्यागाळी, मारपीट, तर बिचाऱ्यांच्या पाचवीलाच पुजलेली असायची.
सदानकदा डोळे गरगरवत खेकसणाऱ्या दादल्याच्या वर्मी बोट ठेवायची हिंम्मत नमीनं मात्र दाखवली.

**'समोरच्या कोनाड्यात ठिवली लोनच्याची फोड,**
**भवानरावांच बोलन गोड, पण लंदाणं लई दोड,**
**येताजाता डोळं वटारायची खोडं'**

या सर्व कळपात फिरोजा व आसमानी वेगळ्याचं उठून दिसायच्या त्यांना पण 'मुन्ने के अब्बाचं'नांव कसं गुंफतात, हे पाहुन मजा येत होती. बिबिजीं हम भी कोशीश करें क्या ? असं त्यांनी विचारतां मी म्हटलं की, हे विचारायची गरजच नाही. उलट तुम्ही पण ह्या कार्यक्रमात आपल्याला समावुन घेतलं यातच आनंद आहे, तेव्हा हो जाने दो' हे ऐकताच...

**'ताल में ताल भोपाल ताल, बाकि सब तलैया, मोहम्मद हसन साहब की, लेते सब बलैय्या'**
हे शिघ्र वाक्य पुढे आलं, खरं तर बलैय्या घेणं तर दूरचं या मोहम्मद हसन ला बायको खेरीज कोणी मोहल्ल्यात ओळखतं ही नसेल; पण  तिचा हा प्रयत्न '**काबिले तारिफ** ' होता.भोपाळच्या निसर्गानं मुक्त हस्तानं सौंदर्य प्रदान केलेंल आहे. त्यात चार चांद लावतात. पावलोपावली असणारे तलाव यातले बरेचसे तलाव कमळांनी व शिंगाड्यांनी भरलेले असतात; पण फिरोजीबी ला याचा अभिमान असेल. याची मला सुतरामही कल्पना नव्हती. '**आपा, अब तेरी बारी**' असे म्हणत सर्व जणी आसमाच्या पाठी पडल्या.
'रुको जरा सोचने दो.. तो ऐसा बढिया उखाना लुँगी की तुम हसते-हसते लोट पोट हो जाओगें.'

**भोपाली शान-ओ-शौकत के हिस्से थे हुक्के, मोहम्मद सगिर साहब का कुनबा देखकर सब रह गये हक्के बक्के'**

म्हणत तिच पोट धरुन-धरुन हसु लागली.पण अति झालं आणि हसुं आलं. यातला हा  प्रकार होता.
आसमाचा नंबर होता तिसरा. मोठिला आठ मुलं, मधलीला सहा आणि हे पाहून धसका घेतलेल्या आसमानं चार मुलं झाल्यावर नवऱ्याच्या नकळत गोळ्या खात राहून आपला बचाव केलेला होता. आता एवढा मोठा कुनबा कुणालाही हक्का बक्का (आश्चर्यचकित ) करायला पुरेसा होता. या सर्वात चौथीपर्यंत 'शिकल्याची' बनुबाईची सुन वेगळीच दिसत होती. सासुनं तिला जबरदस्तीनं ओढून आणलं होतं; पण हळू हळू तिच्या कपाळावरच्या आठ्या मावळत चाललेल्या दिसल्या. आता गं बाई, ही बबिता राहिलीच की 'बबिते तू नांव घ्ये की गं नांव' म्हणताच तिनं उध्दट वाटणारा प्रश्न केला...

फोकटमंदी काहून नाव घ्याव जी ? फुकटमंदी कोण म्हणतं ? तू हवं तर दोन चार करंज्या आणखीण खा, असं मी म्हणताच

'नाय बाबा मला करंजी –गिरंजी नाय पायजे; म्हणून तिनं उत्तर दिलं ...करंजी नको तर काय हवं म्हणता तिनं एक लांबलचक यादीच पुढे केली...

**'घ्या नारळाची हारकी, तर नाव घेईन. नारळाची हारकी किंमतीला थोडी, घ्या लुगड्याची घडी, तर नाव घिईन... लुगड्याच्या घडीला बी पैका थोडा, घ्या बसायला घोडा तर नाव घेईन... ब्री हालकी हालकी घ्या बसायला पालकी तर नाव घेईन...पालकीत ठेवा सव्वाशेर गव्हाची ओटी अन शंभर खाऊच्या पानाची पटटी, चिरीवर ठेवा हिरवा खण फिका अन अशोककुमारांच नाव घ्येते निट ध्यानात धरा... '**

आता हा अशोक कुमार आणि बबिता ध्येनात राहनार की नाही सांगा ?

सर्वच उखाणे स्थाभावी लिहिणं शक्य नाही पण ही छोटी झलकच या सामान्य स्तरातल्या व अशिक्षित म्हणवणाऱ्या बायकांच्या तोंडच्या रंगीत संगीत उखाण्यांची कल्पना घ्यायला पुरेशी आहे.त्यात एखाद् दुसरा अपवाद सोडता सर्वांनीच आपल्या दारुड्या, मारकुट्या नवऱ्यांची जराही बेईज्जत केली नव्हती. उलट त्यांना गौरवलेलचं होतं. सर्वांना निरोप घ्यायला लागले तर त्यांनी मलाच कोंडीत पकडलं. 'वैनीबाय आमी तर आमी; पन फिरोजा अन आसमां बीनं दिकुन नांव घ्येतलं. आता तुमी बी घ्यावा. जवा बघावं तवा तुमी डॉक्टरसा-डॉक्टरसा करतासा आमाले भाऊचं नाव देखील म्हायती नाई.' या साध्या भोळ्या सख्यांचा आग्रह मला मोडवेना. त्यांना साजेलश्या भाषेतच उखाणा घ्यायला हवा म्हणून म्हटलं

**'नाव घ्येती मी एक कमळाबाई मंगेशरावांची लेक, नाव घ्येती मी गहिन, या करुणाबाईची बहिण, नाव घ्येते मी पाव्हनी, नरेन्द्र रावांची मेव्हनी, नाव घ्येते मी गवळन, या अंजुबाईची मावळण, नाव घ्येते मी हौशी, राधिका मोनिका ची मावशी, नाव घ्येते मी मौज, दत्ताजी रावांची भावज, नाव घ्येते मी ओळखून सुमित्रा आईसाहेबांची सून आणि नाव घ्येते मी तानी, गोविंदरावांची राणी.**

वैनीबाई आपली डॉक्टरकी विसरून आपल्या पैकी एक झाल्या याचा आनंद त्यांच्या चेहऱ्यावर स्पष्ट दिसत होता. या आनंदातच ही साठा उत्तराची कहाणी पाचा उत्तरी संपूर्ण झाली. पण मनातल्या विचारांवर काही पुर्णविराम लागला नाही. या कमळाबाई मंगेशरावांच्या लेकीचं आयुष्य समृध्द झालं, ते केवळ त्यांच्या आशिर्वादानंच! कोणतीही पात्रता नसतांना अनंत हस्ते कमलावरानं देता किती घेशील दोन कराने ? अशी ईश्वरानं माझ्यावर सुखाची बरसात केली. संसारात कधीही विसंवादी सुर उमटु न देणारा जिवनसाथी, घराला घरपण देणारी मुलं व नातवंड, मध्ये अफाट अंतर असलं, तरी सदैव ह्रदयात वास करणारी बहिण, आम्हाला देवाच्या ठिकाणी कल्पुन पाया पडणारे रुग्ण जिवाला जीव देणारे नातलग व सुह्रद आणि मस्तकावर सदैव आशिर्वाद देत असलेले सद्‌गुरुच वरदहस्त !

समृध्दी समृध्दी म्हणतात ती आणखीन काय असु शकते ? आयुष्याची सकाळ व दुपार अशी परिपुर्ण जगल्यावर पुढे येऊ घातलेल्या संध्या छायेची भिती कमळाबाई मंगेशरावांच्या लेकीला वाटणं शक्य तरी आहे का ?

**-मोहिनी शिंदे**



कु. वैष्णवी उज्वल शुक्ला
एम.कॉम



# Growing with Community: *A College Story*

As I reflect on my current college experience, I feel a tremendous sense of excitement and anticipation for the years ahead. I am thoroughly enjoying every moment of it, from the challenging classes I am taking to the new friends I am making along the way.

One thing that really stands out to me is how approachable and friendly my teachers are. From the very first day of classes, I felt warmly welcomed and supported by my professors. They always make themselves available to answer any questions I have, whether in class or during office hours, and they are genuinely interested in helping me succeed academically.

Their guidance and mentorship have played a significant role in my academic success thus far. Whenever I feel stuck on an assignment or need help understanding a concept, I know that I can count on my teachers to provide me with the support and resources I need to overcome any challenges. Their encouragement and constructive feedback have pushed me to work harder and strive for excellence in all my coursework.

Moreover, the benefits of having great teachers extend far beyond academic success. They have also played a crucial role in shaping my character and instilling important values that will stay with me for a lifetime. Whether it's through leading by example or fostering a supportive learning environment, my teachers have taught me the value of respect, responsibility, and perseverance. I am profoundly grateful for the incredible teachers I have had the opportunity to learn from in college. Their wealth of knowledge and expertise, combined with their approachability and dedication, have truly made a positive impact on my educational journey.

In addition to academics, I am also actively participating in various programs and extracurricular activities that are helping me grow in numerous ways. One of my most memorable experiences was representing my college at both the National Camp of Nehru Yuva Kendra Sangathan (NYKS) and the State Camp of National Service Scheme (NSS). These opportunities provided me with a great sense of pride and accomplishment, and I gained valuable communication and stage confidence skills that will benefit me in both my personal and professional life. The NYKS camp helped me develop leadership and teamwork skills, while the NSS camp gave me the opportunity to serve society and make a positive impact in my community. Overall, participating in these camps has been a truly enriching experience, and I look forward to continuing to pursue opportunities that challenge me to grow and develop as an individual.

Another fantastic aspect of my college experience is the wonderful group of friends I have made. These are individuals who share my interests, support me during challenging times, and celebrate my successes. They are my study partners, adventure buddies, and trusted confidantes.

In conclusion, my college experience has been about much more than just education and extracurricular activities. It has also been about the connections I have made with others. These connections have allowed me to learn from my peers, gain new perspectives, and grow as a person. Being surrounded by people who share similar interests and goals has inspired me to work harder and strive for excellence in all that I do. The support and encouragement I have received from my Teachers during my college journey have helped me overcome challenges and achieve my goals. I feel fortunate to have found such a wonderful friend group during my time in college, and I look forward to the ways in which these friendships will continue to enrich my life in the future. I believe that the relationships I have formed during college will continue to be a valuable source of guidance and inspiration as I navigate the next stages of my life. Through these relationships, I have learned the importance of community and the power of working together towards a shared vision.

Overall, I am profoundly grateful for everything that my college experience has offered me, from helping me create my own identity to enriching my life in countless ways.

Name : Vaishnavi Ujwal Shukla.
STD : M.Com. II

विद्यार्थी साहित्य विभाग

आविष्कार 2023 -24

प. रा. हायस्कुल सोसायटीचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

धरणगांव, जि.:जळगांव

# अहवाल विभाग

P.R.High School Society's

**ARTS, COMMERCE AND SCIENCE COLLEGE,**

**DHARANGAON**

NAAC Reaccredited (III[rd] Cycle) Grade "B"

# Department of Mathematics Annual report (2023-24)

| | |
|---|---|
| **Name of the events** | **: Invited Talk on " Career Opportunities in Mathematics "** |
| **Date** | **:20/10/2023** |
| **Time** | **:8.30 am to 9.30 am** |
| **Organizer** | **:Department of Mathematics** |
| **No. of participats** | **:65** |

**Details of Events**

The Lecture on "Career Opportunities in Mathematics" was organized by Mathematics Club of Department of Mathematics on 17th January 2024. The lecture was delivered by Dr. Kunal J. Ingale, Head and Associate Professor, M. J. College, Jalgoan. Dr. D. R. Bonde , Head, Department of Mathematics greeted Dr.K. J. Ingale and all present students. Dr. K. J. Ingale initiated his talk with the importance of the field of Mathematics. He also discussed the various career options and job opportunities available after undergraduate studies in Mathematics. In addition to this,Dr. K. J. Ingale explained about the different entrance examinations schemes required for seeking admission in the Central/State Universities, NITs and IITs for Master as well as Ph.D. programme. Subsequently, he also discussed the various career options and job opportunities available after Post Graduate studies in Mathematics. Finally, he highlighted the numerous research thrust areas of Mathematics for pursuing Ph.D. in Mathematics.



**Name of the events** **:Invited Talk on "Applications of Mathematics in Daily life"**
**Date** **:20/10/2023**
**Time** **:9.30 pm to 10.30 pm**
**Organizer** **:Departmentof Mathematics**
**No. of participants** **:62**

## Details of Events

Department of Mathematics, organized an Invited Talk on "Applications of Mathematics in daily life". Students of Mathematics and computer sciences were benefited. Dr. Hemant P. Bendale, Departmeh of Mathematics, M. J. College, Jalgaon was the Resource person. He engaged the students throughout the talk with relentless interaction with them and students were impressed with his insights into Applications of Mathematics. With his rich experience and expertise in teaching he shared a lot of information to students that were thought provoking that make a long lasting impact on their study.



**National Mathematics Day (NMD - 2023)**

The National Mathematics day celebrations (NMD2023) were conducted at Arts, Commerce and Science College, Dharangaonon 22nd December, 2023 The Programmes included Invited talk, Math MazePresentation competition,Rangoli and Poster exhibition. All banners, brochure and certificates were designed and prepared by students themselves.

**Inauguration**

Formal inauguration of National Mathematics day celebrations was held on December,22,2023 at 10.00 AM.Vice Principal P. R. Deshmukh inaugurated the programme by offering a flowers to great Mathematician Shrinivas Ramanujan Prof. P. R. Deshmukh delivered a message regarding National Mathematics day during the occasion and students paid tribute to the great mathematician Srinivasa Ramanujan.







**Collegiate Poster Presentation competition**

As part of NMD-2023celebrations, Poster Presentation competition was conducted for college students. A total of thirteen Students participated Each participant was given ten minutes for presentation. Weightage was given for mathematical value of the topic and clarity of presentationProf. R.J.Patil and Prof. A.R.Patil evaluated the presentations and selected the winners.



**Rangometri**

As part of NMD-2023celebrations, rangoli competition was also kept for students to encourage their creative thinking. It was conducted from 10:30 AM to 12:30 PM on Science Building. The theme was "Mathematical rangoli", and brought out the fervour of the students. Participants worked on their rangoli patterns and colors to bring out their talent. Prof. R.J.Patil and Prof. A.R.Patil were the judges for the competition. The results would be formally announced by considering judges decision



**Name of the events** : **Seminars**
**Date** : Evensemester of academic year 2023 -24
**Time** : **As per the available time slots**
**Organizer** :**Department of Mathematics**
**No. of participants** :**22**

Seminarsare small group discussions organised and led by staff. The purpose of a seminar is to enable students to improve their knowledge and understanding of a topic by engaging with key issues. By delivering the seminars students can gain stage daring similarly they can improve their communication skills also. Some specific topics is assigned to advanced learners. Students first discussed that topic with their mentor and after that they deliver the same topic in front of other students. This activity was conducted in the first semester of academic year 2023-24.



**Name of the events** : **Old Question paper solving and Discussion**
**Date** : **EveryWednesday after practical**
**Time** : **9.30 am to 10.30 am**
**Organizer** : **Department of Mathematics**
**No. of participants** : **26**

**Details of Events**

Mathematics is a subject of problem. Its teaching learning process demands solving of innumerable problems.A problem is a sort of obstruction or difficulty which has to be overcome to reach the goal. Problem solving is a set of events in which human beings was rules to achieve some goals.Problem solving is a suitable approach in teaching of mathematics. It develops in the

learners the ability to recognize analysis, solve and reflect upon the problematic difficulties.

## ADD ON COURSE

The Department of Mathematics offers an add oncourse to caterto the growing demand for specialized knowledge in the fields of Competitive Mathematics and logical thinking. This course is designed to suit the need of the outgoing students and to acquaint them with frequently asked patterns in quantitative aptitude and logical reasoning during various competitive examinations and campus interviews.

| Sr. No. | Course Title | No. Of Students Attended |
|---|---|---|
| 1. | Mathematics for Competitive Examinations | 25 |

## BRIDGE COURSE

The Department of Mathematics offers a bridge course titled "Introduction to Fundamental Mathematics" to provide students with a solid foundation in the fundamental concepts of mathematics. This course is designed for students who wish to refresh their knowledge before pursuing advanced mathematics courses. The bridge course serves as a stepping stone, ensuring that all students have a common understanding of key principles before embarking on more specialized topics.

| Sr. No. | Course Title | No. Of Students Attended |
|---|---|---|
| 1. | Introduction toFundamental Mathematics | 34 |

Annual Report 2023-24



प. रा. हायस्कुल सोसायटीचे

## कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

धरणगांव, जि.जळगांव

# PHYSICS

## Department Report

Department of Physics organise programme on birth anniversary of Dr. APJ Abdul Kalam Vice Principal Prof. Sandip Palkhe was the Presedent of the programme. On this occasion flowers are offers to the photo of Dr. APJ Ablul Kalam in introductory speech Dr. Abhijit Joshi describe the childhood and difficulties of APG Abdul Kalam in his life. Prof. S.S. Palkhe share different thoughts in the book of Wings of Fire and Work of Dr. APJ Abdul Kalam with students. On this occasion students also share the knowledge about missile man Kalam and his vision of India 2020. On this Occasion Science facuilty staff Dr. D.R. Bonde, Dr. D.K. Gaikwad, Prof. V.Y. Valvi, Dr. G. G. Jadhav, Prof. Kalpesh Patil, Prof. Prachi Pagariya was Present.




Department of Physics organise programme on birth anniversary of Dr. Vikram Sarabhai in introductory speech Dr. Abhijit Joshi describe the how Vikram Sarabhai's contribution in Indian Space Reasearch Organization. It opreates as the primary research and development arm of the Department of Space.

He describe the progress of ISRO from first satellite Aryabhatta to latest Chandrayan. By using ICT, he shows how satelites are launches from the space station.








Department of Physics organise program live telecast of Aditya L1 (Surya Yan). The student of S.Y.B.Sc. Seen the launching of Aditya L1. Prof. R.M. Kendre, HOD Geography, Explain the different Stages involved in the rocket How the rocket get upward thrust, which fuel is used at different stages. He also explains the langrage point L1, a point in the space where gravitational force of earth and sun are equal.

CHEMISTRY
**Annual Report**
**(2023-24)**

आविष्कार 2023 -24

P. R. Highschool Society's
## Arts, Commerce & Science College Dharangaon

# Department of Chemistry



P. R. Highschool Society's

# Arts, Commerce & Science College Dharangaon

## Department of Chemistry

## Annual Report (2023-24)

It gives me immense pleasure to submit the annual report of Department of chemistry for your favorable consideration. Along with regular teaching learning process department has conducted various student-oriented activities. The purpose of conducting these activities is to generate more interest in chemistry. In the academic year 2023-24 department has organized following activities

1] Chemistry Talent search exam

2] Poster presentation competition

3] Students seminar on various topics

4] Fare well function of T.Y.B. Sc students

5] Chemistry Aptitude test

6] ICT Lectures

7] Industrial Visit

8] Online Quiz on Mahatma Gandhi Jayanti

9] Question paper Solving activity

### Chemistry Talent search exam

Nowadays students are more focusing on competitive exam .so, in order to generate interest in such exams and to make the students aware about how to face these exams, the department has organized Chemistry Talent search exam. Format of this exam was totally based on competitive exam pattern. This exam was conducted in two rounds. First round of this exam was conducted on **19th January 2024**. Almost 35 students from FY/SY & TY B.Sc. class have participated in he first round. From first round 06 students were selected for the final round.

Final round of this exam was conducted on **20th January 2024**. Audio video questions related to chemistry were asked in this round. Following are the winners of this talent search exam.

1] Mr. Mahajan Harshal Natthu (T.Y.B. Sc First)

2] Miss. Mali Bhavna Shamrao (S.Y. BSc Second)

3] Miss. Pawar Harshada Mahindra (T.Y.B. Sc Third)

**Students are Solving the Quiz of Chemistry Talent Search exam.**







## Poster Presentation competition

**P.R.Highschool Society's**
**ACS College Dharangaon**

Department of Chemistry Organizes
Poster Presentation
Topic- Environmental Chemistry

All the student of F.Y./ S.Y./ T.Y.B.Sc informed that department of Chemistry organizes Poster Presentation on 23rd January 2024. It is mandatory to take participation in Poster Presentation.

Organizer's

Mr. A. A. Patil
Mr. R. P. Kedar

Mr. V. Y. Valvi
Mr. K.H.Patil

Dr. G.G. Jadhao

Prof. S. S. Palkhe
Head, Department Of Chemistry

Dr. S. B. Shingane
Act. Principal
A.C.S. college, Dharangaon

Department of Chemistry Organized poster Presentation competition for F.Y./S. Y/T.Y.B.Sc. Students on 23rd January 2024. Topics of this competition was ***Environmental Chemistry***. 22 Students were participated and make the poster on above said subject. Dr.V.C.Badgujar (Dept. of Chemistry

Pratap College Amalner) and Dr. R. S. Suralkar (Dept. of Chemistry Pratap College Amalner) observed the posters and after observation declared the following result

**1) First Prize** -1] Rohini Vijay Patil 2] Tejal Naval Patil

**2) Second Prize**- 1] Sangita Kalyan Patil 2] Jagruti Balu Patil

## Posters Compition

## Students are Explaining their posters to Judges









Subject : Air Pollution, Global Worming, Save to Earth, Water & Trees

## Students' seminar on various topics

T.Y.B. Sc Class students delivered the seminars on various topics of Chemistry


















## ICT Lecturers

ICTlectures plays a crucial role in equipping students with knowledge, skills and mindset required to thrive in an increasingly digital and interconnected world, empowering them to contribute meaningfully to society.










# Industrial Visit

Department has organized an industrial visit at Mahabaleshwar on 14th & 15th March 2024. During this tour students visited Mapro industry and Madhusagar Industry. Students get detailed idea about various industrial process which are conducted in these industries.
















## Question paper Solving Activity

Question paper Solving Activity plays a crucial role in the academic development of students by providing opportunities for self-assessment, Skill enhancement and confidence building, ultimately contributing to improving learning outcomes.














# Fare Well Function

The Fare well function for TY BSc chemistry students was organized on 10th April 2024 Prof. Dr. S.B. Shingane was the chief guest of this function. Prof.S.S.Palkhe Prof.Dr.G.G.Jadhao also guided the students about future prospective. Students of our department share their beautiful memories about the department & they pay their sincere gratitude towards all the faculty members





Annual Report 2023-24

आविष्कार 2023-24

P. R. Highschool Society's
Arts, Commerce & Science College Dharangaon

# Department of Economy



# अर्थशास्त्र विभाग

शैक्षणिक वर्ष 2023 24 करिता सीबीसीएस पॅटर्न नुसार बीए पदवीसाठी एकूण दहा विषय होते, व बीकॉम वाणिज्य पदवीसाठी पाच विषय आहेत. चालू वर्षी एफ वाय बी 97 विद्यार्थी, ए एस वाय बी ए 22 विद्यार्थी व टी वाय बी ए करिता 21 विद्यार्थी संख्या होती. सदर शैक्षणिक वर्षामध्ये विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र या विषयाबद्दल आकर्षण निर्माण व्हावे, भविष्यात जीवन जगत असताना अर्थशास्त्र या विषयाचे महत्त्व पटवून देताना रोजगाराच्या संधी कशा उपलब्ध होतील, या दृष्टिकोनातून सुद्धा विद्यार्थ्यांना अर्थशास्त्र विभागाकडून मार्गदर्शन करण्यात येत असते. यासाठी अर्थशास्त्र विभागाकडून विविध कार्यक्रमांचं आयोजन स्वतंत्रपणे विभागाचं शैक्षणिक कॅलेंडर तयार केले गेलेले असते. यामध्ये प्रथम सत्र घेण्यात येणारे उपक्रम व द्वितीय सत्र घेण्यात येणारे उपक्रम त्याच प्रकारे अंतर्गत परीक्षा सेमिनार यांचे नियोजन करण्यात आलेले असते.

शैक्षणिक वर्ष 2023- 24 मध्ये विभागाकडून सुरुवातीला द्वितीय व तृतीय वर्षात वर्षाच्या विद्यार्थ्यांकडून प्रथम वर्षाला प्रवेशित अर्थशास्त्र घेतलेल्या विद्यार्थ्यांचे स्वागत समारंभ ( Well-Come Function) चे आयोजन करण्यात आले, तसेच अर्थ व वाणिज्य मंडळाचे उद्घाटन करून शैक्षणिक वर्षामध्ये त्या अंतर्गत आयोजित केलेल्या कार्यक्रमांची रूपरेषा व अर्थशास्त्र व वाणिज्य विभागातील रोजगार संधी या संदर्भात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले प्रथम सत्राच्या शेवटी अर्थशास्त्र व वाणिज्य विभागाचा विद्यार्थ्यांसाठी अर्थशास्त्र "संशोधन पद्धती" या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. सदर व्याख्यानासाठी डॉ. जगत धनगर, वाणिज्य महाविद्यालय नव गुजरात अहमदाबाद, यांनी मार्गदर्शन केले. अर्थशास्त्र विभागाकडून सहकारी पतपेढी बँकेचा कामकाजाची माहिती करून घेण्याचा दृष्टिकोनातून भेट देण्यात आले यामध्ये बँकिंग विषय घेतलेल्या विद्यार्थ्यांनी शाखा व्यवस्थापकाशी प्रत्यक्ष संवाद साधून वेगवेगळ्या व्यवहारासाठी वापरल्या जाणाऱ्या स्लिप बद्दल माहिती समजून द्वितीय सत्रामध्ये एक फेब्रुवारी 2024 रोजी संसदेत सादर सादर झालेल्या, अंतरिम अर्थसंकल्पाचे वाचन अर्थशास्त्र व वाणिज्य शाखेच्या विद्यार्थ्यांसाठी करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांसाठी करिता व्यासपीठ खुले करण्यात आले. 16 मार्च 2024 रोजी अर्थशास्त्र व वाणिज्य मंडळामार्फत शैक्षणिक व सांस्कृतिक सहलीचे आयोजन करण्यात आले. सदर सहलीसाठी 52 विद्यार्थी व पाच शिक्षकांनी सहभाग नोंदवला तसेच 22 मार्च 2000 रोजी महाविद्यालयात पार पडलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेसाठी अर्थशास्त्र विभागाकडून तीन संशोधन पेपर सादर करण्यात आले. तसेच सत्राच्या शेवटचा उपक्रम तृतीय वर्षाचा विद्यार्थ्यांना निरोप देणे, यासाठी निरोप समारंभ "SEND OF PROGRAMME " चे आयोजन करण्यात आले. यामध्ये प्रथम व द्वितीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी तृतीय वर्षाचा विद्यार्थ्यांचे आभार मानण्याबरोबर त्यांना भविष्यकाळासाठी शुभेच्छा सुद्धा दिल्या. अशा प्रकारे अर्थशास्त्र विभागाकडून शैक्षणिक वर्षात विविध उपक्रमांचा आयोजन करण्यात आले.

अर्थशास्त्र विभाग प्रमुख
डॉ. व्ही. ए. वारडे

Well-Come Function Second & Third Year Students Welcomes First Year Students.




## Economics & Commerce Association

Inauguration




## Arrange Guest Lecture of Research Methodology.




व्यावसायिक उद्योजकता सेमिनार क्र. 1
दि.3-10-2024 / एस. वाय. बी. कॉम :





**Arrange Seminar in Class.**

**Interim Budget Discussion Session.**





**Academic & Cultural Trip Patana Devi, Goutala Forest, Hemadpanthi Mahadev Temple &, Pitalkhor Leni & Kanhere Fort**





## Bank of Maharastra Dharangaon Field Visit



## Research Paper presentation of International Conference at Arts , Commerce & Science College,. Dharangaon Assit. Prof. Yogesh Patil , Assit. Prof. R.K. Khatik



**Thank You !**

मराठी विभाग
वार्षिक
अहवाल
2023-24





# मराठी विभाग अहवाल

# २०२३-२४










*ऐका, बोला, वाचा, लिहा, पहा, अभ्यासा*

माय मराठी



## मराठी भाषा गौरव दिन (२०२४)

धरणगांव येथील प. रा. हायस्कुल सोसायटी चे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि. २७-२-२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता मराठी भाषा गौरवदिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. शिंगाणे, प्रमुख वक्ते डॉ. संजीवकुमार सोनवणे, विद्यार्थी विकास चेअरमन प्रा. डॉ. स्वप्निल खरे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुषमा तायडे आणि प्रा. सुलताना पटेल उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉ. संजीवकुमार सोनवणे यांच्या हस्ते मराठी विभागांतर्गत चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयातील ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांच्या स्वलिखित कविता, कथा आणि प्रकल्प याचा समावेश होता. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. सुषमा तायडे यांनी केले.




प्रमुख वक्ते डॉ. संजयकुमार सोनवणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मराठी भाषा कशी गौरव करण्यासारखी आहे. तिचा अभिमान आम्हा सर्वांनी बाळगावा तसेच मराठी भाषा कशी टिकवली पाहिजे, याविषयी मार्गदर्शन केले. निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, आणि काव्यवाचन या स्पर्धांचे आयोजन व बक्षिसवितरण करण्यात आले. तसेच अध्यक्षिय भाषणात अध्यक्षांनी मराठी भाषेचे महत्त्व पटवून देऊन वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. बहिणाबाई प्रणिता सोनवणे, गौरी देशपांडे – भाग्यश्री ठाकूर, शांताबाई कांबळे – जोगेश्वरी, शांता शेळके, भाग्यश्री बऱ्हाटे, डॉ. प्रतिमा इंगोले, शकुंतला, प्रा. डॉ. प्रज्ञा पवार, प्रज्ञा सोनवणे, या विद्यार्थीनींनी लेखिका, कवयित्री ची पात्रे साकारली.




या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित यांने तर आभार अविनाश पाटील या विद्यार्थ्यांनी केले. पारितोषीक विवेचन प्रा. सुलताना पटेल यांनी केले. अशाप्रकारे मराठी विभागातर्फे मराठी गौरवदिन साजरा करण्यात आला.





मराठी भाषा संवर्धन

लहान मूल जेव्हा जन्माला येते, तेव्
आपल्या आईची, आपल्या सभोवताल
असलेल्या भाषेची त्याला ओळख होते, त्य
भाषेचे त्याच्यावर संस्कार होतात
हाराष्ट्रातील बहुतांश लोकांची मराठी भाष
मायबोली आहे.

# मराठी विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल

विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी व चांगल्या निकालासाठी मराठी विभागातील प्राध्यापक नेहमीच प्रयत्नशील असतात त्यासाठी विभागाच्या वतीने विविध कार्यक्रम व उपक्रम राबविले गेले.विद्यार्थ्यांची साहित्यात, वाचनात, कलागुणात, लोकसाहित्य, लोककला यांच्यात रुची निर्माण व्हावी म्हणून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना व्यासपीठ मिळावे म्हणून कविता,कथा,नाट्य,वाचन, अभिनय या सर्वांच्या माध्यमातून विविध कार्यक्रमांचे आयोजन वर्षभर करण्यात आले ते कार्यक्रम व उपक्रम पुढील प्रमाणे -

## * क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिन

धरणगाव येथील कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात मराठी विभाग आणि विद्यार्थी विकास च्या अनुषंगाने दिनांक 9 ऑगस्ट 2023 रोजी क्रांती दिन आणि जागतिक आदिवासी दिन साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख वक्त्या म्हणून लोकसंघर्ष मोर्चाच्या संस्थापक प्रतिभा शिंदे उपस्थित होत्या. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.ए.डी. वळवी हे होते. 'भारत छोडो नंतर आता भारत जोडो' चा नारा प्रमुख वक्त्यांनी यावेळी दिला.

या दरम्यान विद्यार्थ्यांची ऐतिहासिक वेशभूषा स्पर्धा देखील आयोजित करण्यात आली. या स्पर्धेचे परीक्षण प्रा. डॉ. सुषमा तायडे आणि प्रा. प्राची पगारिया यांनी केले. व्याख्यानानंतर धरणगाव येथील खाजा नाईक यांच्या समाधी पर्यंत विद्यार्थ्यांची प्रभात फेरी काढण्यात आली. कार्यक्रमादरम्यान पाहुण्यांचा परिचय डॉ.पी.एस. बोरसे यांनी केले.प्रास्ताविक डॉ.ए.ए. जोशी यांनी तर सूत्रसंचालन डॉ.जी.जी. महाजन यांनी केले. तर आभार डॉ.एच.ए. भालेराव यांनी केले.यावेळी श्री.संजय महाजन, उपप्राचार्य डॉ.एस.एस.पालखे, विद्यार्थी विकास अधिकारी डॉ.एस.एस.खरे, डॉ.डी.के.गायकवाड, प्रा.एस.एन.पटेल, प्रा.टी.डी.पाटील महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि तिन्ही शाखांचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते.

## *बालकवी जयंती साजरी

धरणगाव येथील कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात भाषा विभागाच्या वतीने 14 ऑगस्ट 2023 रोजी बालकवी ठोंबरे यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते.यावेळी प्रमुख वक्ता म्हणून कवी बी.एन.चौधरी उपस्थित होते. अध्यक्ष म्हणून डॉ. प्रवीण बोरसे हे होते तर प्रमुख डॉ.विजयानंद वारडे हे होते. बालकवी हे कवी नसून ते उत्तम छायाचित्रकार देखील होते.त्यांच्या कविता वाचून निसर्गाचे देखणे चित्ररूप वाचकांसमोर उभे राहते असे मत चौधरी यांनी व्यक्त केले तसेच बालकवींच्या काही कविताही त्यांनी सादर केल्या.

याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा. डॉ. सुषमा तायडे यांनी केले.यावेळी प्रा. डॉ. डी. के. गायकवाड, प्रा. डॉ. विश्वजीत वळवी, प्रा. एस.एन.पटेल उपस्थित होते. प्रास्ताविक व आभार प्रा. तुषार पाटील यांनी केले यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



क्रांतीदिन आणि जागतिक आदिवासी दिनानिमित्त प्रमुख वक्त्या प्रतिभा शिंदे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना.



मराठी विभागातर्फे महाविद्यालयात बालकवी साजरी करण्यात आली

### •कवयित्री बहिणाबाई चौधरी जयंती साजरी -

दिनांक 24 ऑगस्ट 2023 रोजी संत ज्ञानेश्वर सभागृह येथे मराठी विभागातर्फे कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. व्याख्याते म्हणून प्रा. सी.एस. पाटील यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले.

'बहिणाबाई चौधरींच्या कवितेतील अध्यात्म'या विषयावर व्याख्यात्यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्ष म्हणून प्राचार्य ए.डी.वळवी तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ.प्रवीण बोरसे उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. तुषार पाटील यांनी केले. कार्यक्रमास डॉ.स्वप्निल खरे, डॉ. धम्मज्योत गायकवाड,डॉ.ज्योती महाजन, प्रा. जगदीश चव्हाण आणि महाविद्यालयातील तीनही शाखांचे विद्यार्थी विद्यार्थिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### • वाचन प्रेरणा दिन अहवाल -

धरणगाव येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाने दि.२०/१०/२०२३ वाचन प्रेरणा दिन साजरा केला. त्याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्रा.डॉक्टर ज्योती महाजन या होत्या. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून मराठी विभागाच्या प्रा. डॉ.सुषमा तायडे हया होत्या. प्रा.सुलताना पटेल, प्रा.तुषार पाटील उपस्थित होते. डॉ.अब्दुल कलाम यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून कार्यक्रमाची सुरुवात झाली तसेच विद्यार्थ्यांनी लिहिलेल्या कवितांचे प्रदर्शनाचे उद्घाटन देखील करण्यात आले. यावेळी प्रज्ञा सोनवणे,जोगेश्वरी, भाग्यश्री बऱ्हाटे, भाग्यश्री ठाकूर, रोहिणी चौधरी या विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. प्रमुख पाहुण्यांनी वाचनाचे महत्त्व पटवून देऊन अभिवाचन कसे करावे ते सांगितले. अध्यक्षीय भाषणात अध्यक्षांनी विद्यार्थ्यांचे कौतुक करून वाचनाचे महत्त्व पटवून दिले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा.सुलताना पटेल यांनी केले तर आभार प्रज्ञा सोनवणे या विद्यार्थिनीने मांनले.

### • राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती -

दिनांक 12 जानेवारी 2024 या दिवशी राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंती संत ज्ञानेश्वर सभागृहात मराठी विभागातर्फे साजरी करण्यात आली. याप्रसंगी अध्यक्ष प्राचार्य डॉ. संजय शिंगाने हे होते तर प्रा. डॉ. जी.जी. महाजन, प्रा. राजू केंद्रे, प्रा.संदीप पालखे, प्रा.जगदिश चव्हाण, प्रा. डॉ.ज्योती महाजन, प्रा. क्षत्रिय, प्रा.लहासे,प्रा. सुनील पाटील, प्रा.अभिजीत जोशी यांनी उपस्थित राहून कार्यक्रमाची शोभा वाढवली. अध्यक्षीय भाषणात डॉ. शिंगाणे यांनी जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद यांची शिकवण विद्यार्थ्यांना पटवून दिली. विद्यार्थिनी प्रणिता हिने सावित्रीबाई फुले ची भूमिका वठवून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले.याप्रसंगी सूत्रसंचालन प्रा. डॉ.सुषमा तायडे यांनी केले तर आभार प्रा. सुलताना पटेल यांनी मानले.






महाविद्यालयातील इंद्रधनुष्य स्नेहसंमेलन मध्ये पाककला
रांगोळी स्पर्धेत मराठी विभागातील सहभागी विद्यार्थिनी

## * मराठी भाषा संवर्धन पंधरवडा -

आपल्या महाविद्यालयात मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' या उपक्रमा अंतर्गत निबंध, वाचन, लेखन, काव्यवाचन, वादविवाद, वक्तृत्व या स्पर्धा सतत वेगवेगळ्या दिवशी घेण्यात आल्या दिनांक 16 जानेवारी 2024 रोजी या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येऊन याप्रसंगी अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे उपस्थित होते. प्रमुख अतिथी उपप्रचार्य डॉ. पंकज देशमुख, प्रा.एस.एस.पालखे, प्रा. डॉ. व्ही.ए.वारडे, प्रा. डॉ. सुषमा तायडे, प्रा. सुलताना पटेल आणि परीक्षक म्हणून प्रा. ए.आर.पाटील उपस्थित होते.

या उपक्रमाची सुरुवात 'काव्यवाचन' या स्पर्धेपासून शुभारंभ झाला. या काव्यवाचनात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. हुंडा, बाईपण, आई अशा विविधांगी विषयावरील रचना सादर करण्यात आल्या.वक्तृत्व स्पर्धेत 'आजचा शेतकरी' या विषयावर विद्यार्थ्यांनी मते मांडली.या प्रसंगी परीक्षक म्हणून प्रा.डॉ.डी.के. गायकवाड यांनी काम पाहिले अशाप्रकारे विविध स्पर्धा घेण्यात आल्या .

याप्रसंगी महाविद्यालयातील प्रा. डॉ.सुषमा तायडे यांनी सूत्रसंचालन केले. तर आभार प्रा. सुलताना पटेल यांनी मांनले. सर्व शिक्षक वृंद,शिक्षकेतर कर्मचारी आणि बहुसंख्या विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभून हातभार लागला आणि अशा प्रकारे हा मराठी विभागाचा 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' उपक्रम संपन्न झाला.

## * उपजत कलागुणांना वाव -

धरणगाव येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात. इंद्रधनुष्य संमेलनात दि. 16 जानेवारी 2024 या दिवशी मेहंदी आणि फ्लावर डेकोरेशन या स्पर्धा घेण्यात आल्या. त्यानिमित्ताने अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे, उपप्राचार्य डॉ. पंकज देशमुख, स्नेहसंमेलन चेअरमन प्रा.संदीप पालखे आणि प्रा.डॉ.हेमंत बोंडे, विद्यार्थी विकास चेअरमन डॉ.स्वप्नील खरे, स्पर्धा परीक्षक प्रा. रेखा पवार, आयोजक प्रा.डॉ.सुषमा तायडे प्रा.सुलताना पटेल उपस्थित होते.तसेच प्राध्यापक वृंद आणि विद्यार्थी सहभागी होते. पाहुण्यांचे स्वागत प्रा.सुलताना पटेल आणि प्रा.डॉ.सुषमा तायडे यांनी प्रास्ताविक करून विद्यार्थ्यांना स्पर्धेच्या अटी,नियम सांगितल्या. त्यानंतर स्पर्धांना सुरुवात झाली. स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना एक तास देण्यात आला होता. मेहंदी परीक्षण आणि फ्लावर डेकोरेशन परीक्षण करून परीक्षकांनी सहभागी विद्यार्थ्यांमधून प्रथम व द्वितीय विजेते काढण्यात आले.
मेहंदीतील,फ्लावर डेकोरेशन स्पर्धेतील सहभागी विद्यार्थ्यांना प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात आले. या स्पर्धांमध्ये मराठी विभागातील बहुसंख्य विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला.

याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित राहून सर्व कर्मचाऱ्यांनी हातभार लावला. तसेच विद्यार्थ्यांनीही हातभार लावला. याप्रसंगी आभार प्रा.सुलताना पटेल यांनी मानले.






'अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन ९७' अमळनेर येथे भरलेल्या संमेलनात मराठी विभागाने सहभाग नोंदवून,विद्यार्थी,प्राध्यापक यांनी लेखक आणि साहित्यिक यांच्या भेटी घेतल्या. त्यावेळेस एका कवयित्री सोबत असलेले छायाचित्र

# मराठी विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल







# मराठी विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल

## वार्षिक स्नेहसंमेलन -

आपल्या महाविद्यालयात झालेल्या दिनांक 24 जानेवारी 2024 वार्षिक स्नेहसंमेलनात देखील मराठी विभागाच्या अनेक विद्यार्थ्यांनी आपला कलागुणांचे प्रदर्शन करून जास्तीत जास्त प्रमाणात सहभाग नोंदविला.

## अमळनेर साहित्य संमेलन -

अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन हा मराठी साहित्य प्रेमींना एक आनंदाचा उत्सव असतो. तीच परंपरा कायम राखत 97 वे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन जळगाव जिल्ह्यातील अंमळनेर येथे होणार हे आमच्या विद्यार्थ्यांसाठी पर्वणीच होती आणि ती पर्वणी आमच्या विद्यार्थ्यांना द्यावयाची असे ठरवून महाविद्यालयाच्या मा. प्राचार्य आणि मा. व्यवस्थापन मंडळ यांचा होकार गाठीशी घेऊन मराठी विभागाने पाऊल उचलले आणि कला शाखा ही तर साहित्याची शाखा असल्यामुळे विद्यार्थ्यांना लेखक कवी यांचा सुद्धा परिचय होऊन साहित्याची आवड निर्माण व्हावी हा दृष्टिकोन डोळ्यासमोर ठेवून. विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होण्यासाठी साहित्य सहल काढण्याचे ठरवून मराठी विभागाने दिनांक 2 फेब्रुवारी 2024 या दिवशी अखिल भारतीय साहित्य संमेलनास भेट देण्याचा मानस पूर्णत्वास नेला. या उपक्रमाची जबाबदारी प्रा. डॉ. सुषमा तायडे, प्रा. सुलताना पटेल, प्रा. डॉ. हर्षवर्धन भालेराव यांनी चोखपणे पार पाडली.




**धरणगाव येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात.मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन' (कुसुमाग्रज जयंती) साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी विद्यार्थिनींनी लेखिका आणि कवयित्री यांच्या भूमिकेत केलेला अभिनय, व्याख्याते आणि ग्रंथ प्रदर्शन छायाचित्रे.**

# मराठी विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल



धरणगाव येथील कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयात.मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा गौरव दिन' (कुसुमाग्रज जयंती) साजरी करण्यात आली. त्याप्रसंगी विद्यार्थिनींनी लेखिका आणि कवयित्री यांच्या भूमिकेत केलेला अभिनय, व्याख्याते आणि ग्रंथ प्रदर्शन छायाचित्रे.



दि.16 मार्च 2024 शैक्षणिक सहल पाटणादेवी .









## मराठी भाषा गौरव दिन (२०२४)

धरणगांव येथील प. रा. हायस्कुल सोसायटी चे कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि. २७-२-२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता मराठी भाषा गौरवदिनाचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस.बी. शिंगाणे, प्रमुख वक्ते डॉ. संजीवकुमार सोनवणे, विद्यार्थी विकास चेअरमन प्रा. डॉ. स्वप्निल खरे मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. सुषमा तायडे आणि प्रा. सुलताना पटेल उपस्थित होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते ज्येष्ठ साहित्यिक कुसुमाग्रज यांच्या प्रतिमेला पूजन करुन कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. डॉ. संजीवकुमार सोनवणे यांच्या हस्ते मराठी विभागांतर्गत चालविण्यात येत असलेल्या ग्रंथालयातील ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यात विद्यार्थ्यांच्या स्वलिखित कविता, कथा आणि प्रकल्प याचा समावेश होता. प्रास्ताविक मराठी विभागप्रमुख प्रा. सुषमा तायडे यांनी केले.

प्रमुख वक्ते डॉ. संजयकुमार सोनवणे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधत मराठी भाषा कशी गौरव करण्यासारखी आहे. तिचा अभिमान आम्हा सर्वांनी बाळगावा तसेच मराठी भाषा कशी टिकवली पाहिजे, याविषयी मार्गदर्शन केले. निबंधस्पर्धा, वक्तृत्व स्पर्धा, वादविवाद, आणि काव्यवाचन या स्पर्धांचे आयोजन व बक्षिसवितरण करण्यात आले. तसेच अध्यक्षिय भाषणात अध्यक्षांनी मराठी भाषेचे महत्त्व पटवून देऊन वेशभूषा साकारलेल्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले. बहिणाबाई प्रणिता सोनवणे, गौरी देशपांडे – भाग्यश्री ठाकूर, शांताबाई कांबळे – जोगेश्वरी, शांता शेळके, भाग्यश्री बऱ्हाटे, डॉ. प्रतिमा इंगोले, शकुंतला, प्रा. डॉ. प्रज्ञा पवार, प्रज्ञा सोनवणे, या विद्यार्थीनींनी लेखिका, कवयित्री ची पात्रे साकारली.

या प्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद, कर्मचारी आणि बहुसंख्य विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहित यांने तर आभार अविनाश पाटील या विद्यार्थ्यांनी केले. पारितोषीक विवेचन प्रा. सुलताना पटेल यांनी केले. अशाप्रकारे मराठी विभागातर्फे मराठी गौरवदिन साजरा करण्यात आला.







महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे वर्षभरामध्ये अंतर्गत चाचण्या, सेमिनार, गटचर्चा विद्यार्थ्यांकडून घेण्यात आल्या त्यांची छायाचित्रे.





महाविद्यालयातील मराठी विभागातर्फे वर्षभरामध्ये अंतर्गत चाचण्या, सेमिनार, गटचर्चा विद्यार्थ्यांकडून घेण्यात आल्या त्यांची छायाचित्रे.

# मराठी विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल

विद्यार्थ्यांना निसर्गाच्या बरोबरच साहित्याची गोडी निर्माण करणे हा मराठी विभागाचा मुख्य हेतू असतो आणि त्या हेतूतूनच शैक्षणिक सहल नेण्याचे ठरले ते ठिकाण होते चाळीसगाव येथील पाटणादेवी. तिथे नेण्याचा मुख्य उद्देश म्हणजे मंदिर परिसरात असलेल्या शिल्पाकृती, शून्याचा अविष्कार करणाऱ्या प्रसिद्ध गणिती भास्कराचार्य यांनी आपला लीलावती नामक ग्रंथ येथेच बसून लिहिला असा हा शिलालेख, शिलालेख म्हणजेच दगडांवर कोरलेली लिपी, ही मोडी लिपी काय असते हे विद्यार्थ्यांना सांगणे हा होता.

* विद्यार्थ्यांसोबतच मराठी विभागाच्या प्राध्यापकांनी देखील विविध संशोधन पेपर सादर केलेले आहेत तसेच कार्यशाळेमध्ये सहभाग नोंदविलेला आहे. प्रा. डॉ.सुषमा तायडे यांचे यावर्षी 4 पेपर राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय जर्नलमध्ये प्रकाशित झालेले आहेत. असे त्यांचे 15 च्या वर पेपर प्रकाशित झालेले आहे. तसेच याच वर्षी त्यांना तीन पुरस्कार प्राप्त होऊन त्यांचे सतत वर्तमानपत्रात कथा, कविता लेखन चालू असते.
त्याचप्रमाणे प्रा.सुलताना पटेल यांचा देखील एक पेपर प्रकाशित झालेला आहे अशा प्रकारे मराठी विभाग साहित्याने, लालित्याने समृद्ध असा विभाग आहे.

* या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी महाविद्यालयातील, विभागातील सर्वांचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांच्या ऋणातच राहू इच्छिते. तसेच वरील सर्व उपक्रम, कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, व्यवस्थापन, उपप्राचार्य, आय.क्यू.ए.सी समन्वयक,सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेतर बंधू-भगिनी आणि मराठी विभागातील विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

प्रा. डॉ. सुषमा विश्वरत्न तायडे. प्रा. सुलताना पटेल
मराठी विभाग -
कला,वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, धरणगाव.

# राज्यशास्त्र विभाग अहवाल

## प.रा हायस्कुल सोसायटीचे कला वाणिज्य महाविद्यालय, धरणगांव

प.रा हायस्कुल सोसायटीचे कला वाणिज्य महाविद्यालय, धरणगांव येथील राज्यशास्त्र विभागातर्फे २३/९/२०२३ रोजी 'future opportunities" या विषयावर रसायन शास्त्र विभागाचे प्रा. आर. पी. केदार यांचे गेस्ट लेक्चर घेण्यात आले तसेच २६-९-२०२३ व ३०-९-२०२३ रोजी प्रथम व द्वितीय वर्गाच्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला. त्यात २१ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला सेमिनार मध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयावर सादरीकरण केले. वरील सेमिनार साठी प्रा. मोहन लहासे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. व १९-१०-२०२३ रोजी प्रथम वर्षाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय लोकशाही (**Indian democracy)** या विषयावर गटचर्चा केली. गटचर्चेत विद्यार्थ्यांचा उत्स्फुर्त सहभाग लाभला.

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, व राज्यशास्त्र विभागातर्फे २६ नोव्हेंबर २०२३ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख अध्यक्षस्थानी होते. बाह्य परिक्षक प्रा. किशोर पाटील, प्रा. सौदागर तसेच उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापित परीक्षा पथकातील डॉ. संजीव पगारे, डॉ.डी. के. भामरे, डॉ. एस. डी. वळवी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेचे व संविधान उद्देशिकेचे पूजन करण्यात आले. राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मोहन लहासे यांनी उपस्थित प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना संविधान दिनाची शपथ दिली.

२५ जानेवारी २०२४ रोजी 'नव मतदार दिन " साजरा करण्यात आला. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्रभारी **प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे** प्रमुख अतिथी म्हणून धरणगांवचे नायब तहसीलदार, नगरसेवक, भाजप तालुकाध्यक्ष चंदन पाटील, उपसरपंच दिनेश पाटील उपस्थित होते या प्रसंगी महाविद्यालयात रांगोळी स्पर्धा व पोस्टर्स स्पर्धा मतदान जागृती या विषयावर घेण्यात आली. तसेच पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मतदार दिना निमित्त भाषण विद्यार्थ्यांना ऑनलाईन दाखवण्यात आले.

दि.२४-२-२०२४ व २६-२-२०२४ रोजी प्रथम व द्वितीय वर्गाच्या विद्यार्थ्यांचा सेमिनार घेण्यात आला. २४ विद्यार्थ्यांनी यात सहभाग घेतला. सेमिनार मध्ये विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या विषयावर सादरीकरण केले.वरील सेमिनार साठी प्रा. मोहन लहासे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



'भविष्यातील संधी' या विषयावरील राज्यशास्त्राचे सत्रात
प्रा. राहुल केदार विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतांना




'भविष्यातील संधी' या विषयावरील
राज्यशास्त्राचे सत्रात उपस्थित विद्यार्थी

# राज्यशास्त्र विभाग अहवाल



संविधान दिनानिमित्त  उद्‌देश पत्रिकेचे वाचन व
संविधान दिनाची शपथ देतांना  प्रा. मोहन लहासे




संविधान दिनाची शपथ घेतांना उपस्थित विद्यार्थी समुदाय

# राज्यशास्त्र विभाग अहवाल



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त शपथ देतांना प्रा. डॉ. गौरव महाजन



राष्ट्रीय मतदार दिनानिमित्त व्याख्यान ऐकतांना उपस्थित
विद्यार्थी, विद्यार्थीनी व प्राध्यापक वृंद

# भुगोल आणि पर्यावरण विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल

शैक्षणिक वर्ष 2023-24 चा भूगोल आणि पर्यावरण विभागाचा अहवाल सादर करताना विशेष आनंद होत आहे. मागील शैक्षणिक वर्षांमध्ये भूगोल आणि पर्यावरण विभागा अंतर्गत विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. त्या कार्यक्रमांचा थोडक्यात लेखाजोखा अहवाला अंतर्गत सादर करीत आहे. महाविद्यालयात भूगोल हा विषय सामान्य स्तरावर शिकवला जातो व पर्यावरण हा विषय प्रथम वर्ष कला, वाणिज्य आणि विज्ञान या वर्गासाठी अनिवार्य असा आहे.

## भूगोल अभ्यास मंडळ :-

शैक्षणिक वर्ष 2023-24 करिता महाविद्यालयात भूगोल विभागाअंतर्गत भूगोल अभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. यामध्ये प्रथम वर्ष कला, प्रथम वर्ष वाणिज्य, द्वितीय वर्ष कला आणि तृतीय वर्ष कला वर्गातील सर्व भूगोल विषयाच्या विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. त्यांच्या मधून भूगोल अभ्यास मंडळाचा अध्यक्ष म्हणून तृतीय वर्षा काला वर्गातील विद्यार्थी तुळशीराम पाटील यांची निवड करण्यात आली. भूगोल अभ्यास मंडळाचा उपाध्यक्ष म्हणून प्रथम वर्ष कला वर्गातील विद्यार्थिनी राजश्री शिंदे हिची निवड करण्यात आली.  तर सचिव म्हणून द्वितीय वर्ष कला वर्गातील विद्यार्थिनी राजश्री कुंभार हिची निवड करण्यात आली. अशा प्रकारे भूगोल अभ्यास मंडळ महाविद्यालयामध्ये शैक्षणिक वर्ष 2023-24 करिता स्थापन करण्यात आले.

## पर्यावरण दिन :-

5 जून 2023 हा पर्यावरण दिन म्हणून महाविद्यालयात साजरा करण्यात आला. त्यानिमित्ताने महाविद्यालयातील परिसरामध्ये वृक्षारोपणाचा कार्यक्रम घेण्यात आला. यामध्ये महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला आणि सर्वांनी पर्यावरण संरक्षण करण्याची शपथ घेतली. अशाप्रकारे महाविद्यालय पर्यावरण दिन साजरा करण्यात आला.

## ओझोन दिन :-

16 सप्टेंबर 2023 हा महाविद्यालयात ओझोन दिन म्हणून साजरा करण्यात आला त्यानिमित्ताने महाविद्यालयातील वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. गौरव महाजन सर हे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते होते. तर महाविद्यालयातील न्या ॅक समन्वयक प्रा. संदीप पालखे सर हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी होते. प्रा. डॉ. गौरव महाजन सर यांनी पर्यावरणामध्ये ओझोन थराचे महत्त्व विद्यार्थ्यांना पटवून सांगितले. तसेच सध्याच्या वातावरणीय प्रदूषणामुळे

ओझोन थरावर होत असलेला परिणाम आणि त्याचे गांभीर्य याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना प्रा. संदीप पालखे सर यांनी सध्या असलेल्या पर्यावरणीय समस्या यावर आपले मत व्यक्त केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महाविद्यालयातील भूगोल विभागातील सर्व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

**भूगोल सप्ताह :-**

14 ते 21 जानेवारी 2024 हा भूगोल सप्ताह म्हणून महाविद्यालयामध्ये साजरा करण्यात आला. या सप्ताह निमित्त महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यामध्ये विद्यार्थ्यांमध्ये विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यात पोस्ट स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, फ्लावर डेकोरेशन, प्रश्नमंजुषा इत्यादी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.

**शैक्षणिक सहल :-**

भूगोल आणि पर्यावरण विभागा अंतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये शैक्षणिक सहलीचे आयोजन करण्यात आले. महाविद्यालयातील शैक्षणिक सहल चाळीसगाव तालुक्यातील पाटणादेवी या ठिकाणी भेट देण्यात आली. महाविद्यालयातील पर्यावरण आणि भूगोल विभागातील विद्यार्थ्यांनी या सहलीमध्ये सहभाग नोंदवला. विद्यार्थ्यांना पर्यावरण व तेथील मंदिरा विषयी माहिती देण्यात आली.

**प्रकल्प कार्य :-**

महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला, वाणिज्य, विज्ञान या वर्गातील विद्यार्थ्यांना प्रकल्प कार्य दिले जाते त्यामध्ये विद्यार्थी आपल्या इच्छेनुसार पर्यावरणाशी संबंधित एक विषय निवडून त्यावर प्रकल्प कार्य पूर्ण करून महाविद्यालयातील प्राध्यापकाकडे जमा करतो. शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये 250 विद्यार्थ्यांनी प्रकल्प कार्य पूर्ण करून जमा केलेले आहेत. अशा प्रकारे शैक्षणिक वर्ष 2023-24 मध्ये भूगोल आणि पर्यावरण विभागा अंतर्गत महाविद्यालयात विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रा. आर. एम. केंद्रे
भूगोल विभाग प्रमुख

# भुगोल आणि पर्यावरण विभाग २०२३-२४ वार्षिक अहवाल



3 च्या यशस्वी ते साठी चंद्रयान -3 टीमला सुल्यूट देताना विद्यार्थी



5 जून जागतिक पर्यावरण दिनानिमित्त महाविद्यालयात वृक्षारोपण करताना प्रा. डॉ. अभिजीत जोशी व विद्यार्थी.




भूगोल अभ्यास मंडळाचे उद्घाटन करताना मान्यवर.



ओझोन दिनानिमित्त विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वाणिज्य विभागाचे विभाग प्रमुख प्रा. डॉ. गौरव महाजन सर.



ओझोन दिनानिमित्त अध्यक्षीय मनोगत व्यक्त करताना उपप्राचार्य प्रा संदीप पालखे सर.




भूगोल सप्ताह निमित्त रांगोळी स्पर्धा



भूगोल दिनानिमित्त फ्लावर डेकोरेशन स्पर्धा.

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

कला,वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव जि. जळगाव या संस्थेतील राष्ट्रीय सेवा योजना एककाच्या (२०२३-२४) या शैक्षणिक वर्षातील विविध कार्यक्रमांचा अहवाल सादर करताना मला विशेष आनंद होत आहे. श्रम संस्कार, बौद्धिक संस्कार या कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी प्राचार्य डॉ.एस.बि.शिंगाणे, अध्यक्ष, राष्ट्रीय सेवा योजना विभाग, विभागीय समनव्ययक प्रा.डॉ. दिलीप बि.गिऱ्हे (विभागीय समन्वयक, रा.से.यो. चोपडा विभाग) , माजी प्रभारी प्राचार्य डॉ. ए.डी. वळवी यांचे मार्गदर्शन तसेच राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीचे सदस्य प्रा. आर. एम. केंद्रे , डॉ. दीपक बोंडे,यांच्या सहकार्याने पर्यावरण जनजागृती,जल संवर्धन,आरोग्य,साक्षरता,महिला सबलीकरण यासाठी विविध कार्यक्रम व उपक्रम राबविण्यात आलेल्या चा तपशील पुढील प्रमाणे




### २१ जून २०२३ (आंतरराष्ट्रीय योग दिवस)

या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.डी. वळवी हे अध्यक्ष स्थानी होते. क्रिडा संचालक प्रा.दीपक पाटील, प्रा. जितु ओस्तवाल यांनी विविध योगासने करून दाखवले. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. एस. पालखे ,डॉ. संजय शिगाणे, प्रा. आर. एम. केंद्रे, ग्रंथपाल प्रा.पंकज देशमुख,डॉ. कांचन महाजन, डॉ. श्रीपाद उपासनी , डॉ. दिपक बोंडे प्रा. संदीप पालखे, प्रा. अभिजित जोशी, प्रा. गौरव महाजन, प्रा. ज्योती महाजन प्रा.आर.आर. पाटील, पर्यवेक्षक बि.एल.खोडे, प्रा.प्रताप साळवे, श्री. जितू परदेशी, श्री. नारायण चव्हाण, श्री. किरण सुतारे, श्री.कैलास पाटील तसेच महाविद्यालयातील प्राध्यापक बंधू-भगिनी शिक्षक-शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.



### १८ जुलै २०२३ (अण्णा भाऊ साठे पुण्यतिथी)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव तर्फे लोकशाहीर आणणा भाऊ साठे यांची पुण्यतिथी दि. १८ जुलै २०२३ रोजी महाविद्यालयात साजरी करण्यात आली.




### २२ जुलै २०२३ (युवा सवांद G-२० कार्यक्रम)

युवा संवाद G-२० या कार्यक्रमा अंतर्गत महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी कवियत्री बहिणाबाई उत्तर महाराष्ट्र विद्यापीठात सहभाग नोंदविला. या मध्ये भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी अमृत महोत्सव वर्षी दिलेल्या पंच प्रण व त्याच्या उपप्रकारावर विद्यार्थी स्वयंसेवकांनी आपापली मते नोंदविली.




### २४ जुलै २०२३ (मतदान नोंदणी, वगळणि, मतदान जनजागृती अभियान अहवाल)

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे दिनांक २४ जुलै २०२३ रोजी मतदान नोंदणी, वगळणी, मतदान जागृती अभियान राष्ट्रीय सेवा योजना विभाग व धरणगाव तहसील कार्यालय यांच्या मार्फत महाविद्यालयाच्या जिमखाना हॉल मध्ये घेण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर कनिष्ट महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. आर.आर. पाटील , श्री. महेंद्र सूर्यवंशी , तहसीलदार धरणगाव , श्री. सी.बी. देवराज , निवडणूक नायब तहसीलदार, धरणगाव उपस्थित होते. ज्या विद्यार्थी, विद्यार्थिनी यांना १८ वर्ष पूर्ण झाले आहेत, अथवा होणार आहेत अशा विद्यार्थी मित्रांनी आपले नाव मतदार यादी मध्ये कसे नोंदवावे या बद्दल श्री. महेंद्र सूर्यवंशी सर यांनी मार्गदर्शन केले. तसेच मतदान करताना जे दोन यंत्र वापरले जातात, Ballot Unit आणि Control Unit याचे प्रत्यक्षिक करून दाखविले. तसेच विद्यार्थी विद्यार्थिनी यांच्या मनात मतदान यंत्र व निवडणूक ज्या काही शंका होत्या त्यांचे निरसन श्री. सी.बी. देवराज, निवडणूक नायब तहसीलदार यांनी केले.



### २६जुलै २०२३ (कारगिल विजय दिवस अहवाल)

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , धरणगाव येथे दिनांक २६ जुलै २०२३ रोजी कारगिल विजय दिवस राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राष्ट्रीय छात्र सेना विभाग यांनी संयुक्तपणे महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर घेण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस.एस. पालखे,राष्ट्रीय छात्र सेनेचे माजी विद्यार्थी श्री. प्रमोद पाटील जे सध्या काश्मीर यथे देश सेवा बजावत आहेत. कनिष्ट महाविद्यालयाचे प्रा.ए. आर. पाटील , प्रा. सौ. राखी पाटील मॅडम, प्रा. कांडेलकर, प्रा.राजू केंद्रे हे उपस्थित होते. या प्रसंगी देश सेवा बजावताना येणाऱ्या विविध अनुभव त्यांनी उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकां समोर मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम



कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथे दिनांक 01/08/2023 रोजी लोकमान्य टिळक पुण्यतिथी व अण्णाभाऊ साठे जयंती हा कार्यक्रम कॉम्प्युटर विभाग व राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी संयुक्तपणे महाविद्यालयात घेण्यात आला. या प्रसंगी व्यासपीठावर महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. एस. एस. पालखे, डॉ. दीपक बोंडे, प्रा. पूजा कुलकर्णी, डॉ. अभिजित जोशी , प्रा. डॉ. तायडे हे व्यासपीठावर उपस्थित होते. विद्यार्थी स्वयंसेवकांनी लोकमान्य टिळक व अण्णाभाऊ साठे यांचे विचार आपल्या भाषणातून व्यक्त केले. उपप्राचार्य प्रा. एस.एस. पालखे विविध अनुभव उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकां समोर मांडले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील प्राध्यापक , शिक्षक, शिक्षकेत्तरकर्मचारी, विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

### ०९ ऑगस्ट २०२३ (क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन एक दिवसीय शिबिर)



दिनांक ०९ ऑगस्ट २०२३ रोजी क्रांती दिन व जागतिक आदिवासी दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या प्रसंगी क्रांतिकारक भगत सिंग, राजगुरू, सुखदेव , महात्मा गांधी व आदिवासी क्रांतिकारक बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला अभिवादन करण्यात आले. या प्रसंगी मार्गदर्शन करण्यासाठी लोकसंघर्ष मोर्चाच्या संस्थापक प्रतिभा पाटील या व्यासपीठावर उपस्थित होत्या. आपल्या मार्गदर्शनपर व्याख्यानामध्ये त्यांनी भारतातील आदिवासी लोकांची शैक्षणिक , सामाजिक, राजकीय परिथितीबद्दल खंत व्यक्त केली.या प्रसंगी विद्यार्थी स्वयंसेवकांनी विविध महापुरुषांच्या वेशभूषा करून शहीद क्रांतिकारक व आदिवासी यांना आदरांजली वाहिली. दुपार सत्रात आदिवासी दिनानिमित्त महान क्रांतीकारक खाजाजी नाईक यांचे स्मरण व आदरंजली वाहण्यासाठी महाविद्यालयात ते खाजाजी नाईक स्मृती स्थळ इथपर्यंत फेरी काढण्यात आली. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. ए.डी. वळवी यांनी हिरवा झेंडा दाखवून फेरीला सुरुवात केली. खाजाजी नाईक स्मृती स्थळ येथे त्यांच्या स्मृती स्थळाला पुष्पहार अर्पण करण्यात आला.

### ११ऑगस्ट २०२३ (विद्यापीठ नामविस्तार दिन अहवाल)




कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे विद्यापीठ नामविस्तार दिन उत्साहात साजरा करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयात विविध देशी झाडांचे मान्यवरांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.ए.डी.वळवी,उपप्राचार्य प्रा.एस.एस.पालखे राष्ट्रीय राष्ट्रीय छात्र सेनेचे १८ महाराष्ट्र बाटालीएन जळगाव चे नायब सुभेदार अनिल कुमार, हवालदार विक्रम सिंग, यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रमुख मान्यवरांच्याद्वारे महाविद्यालय परिसरात चिंच , कडुलिंब , पिंपळ या झाडांचे वृक्षारोपण करण्यात आले.या प्रसंगी राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ, अभिजित जोशी, डॉ गौरव महाजन,विद्यार्थी स्वयंसेवक,स्वयंसेविका तसेच राष्ट्रीय छात्र सेनेचे विद्यार्थी उपस्थित होते. या प्रसंगी महाविद्यालयात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.



### १२ ऑगस्ट २०२३ (आंतरराष्ट्रीय युवा अहवाल)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग, कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव तर्फे आंतरराष्ट्रीय युवा दिन 12 ऑगस्ट रोजी महाविद्यालयाच्या जिमखाना हॉलमध्ये संपन्न झाला. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी अर्थशास्त्र विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विजयानंद बारडे हे होते. याप्रसंगी ग्रामीण रुग्णालयाचे श्री ज्ञानेश्वर शिंपी, श्री राजेश्वर काकडे, श्री गणेश कुंभार, श्री अमोल सूर्यवंशी, श्री अतुल पाटील हे व्यासपीठावर उपस्थित होते. याप्रसंगी वक्तृत्व स्पर्धेत महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी कु. फाल्गुनी चव्हाण, कु. पूजा चव्हाण कु. मृणाल भावसार यांचा अनुक्रमे प्रथम द्वितीय व तृतीय क्रमांक आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक कार्यक्रमाधिकारी डॉ. अभिजीत जोशी या यांनी केले तर आभार प्रदर्शन प्रा. प्रताप साळवे यांनी केले. वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षक म्हणून महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्योती महाजन प्रा. रेखा बिरारी यांनी काम पाहिले. याप्रसंगी श्री रोहित सपकाळे यांनी कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रयत्न केले. याप्रसंगी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होत्या.




### १५ ऑगस्ट २०२३ (स्वातंत्र्य दिन)




१५ ऑगस्ट २०२२ रोजी सकाळी महाविद्यालयात ध्वज वंदन करण्यात आले. शासनाच्या आवाहना नुसार तंबाखूमुक्ती ची शपथ देण्यात आली. याप्रसंगी वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयातील स्वयंसेवक व स्वयंसेविका उपस्थित होत्या.

### २१ ऑगस्ट २०२३ (सद्भावना दिन)

कला, वाणिज्य आणी विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना व वाणिज्य विभागा तर्फे सद्भावना

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम

दिवस ऑगस्ट २०२३ रोजी महाविद्यालयात संपन्न झाला. या प्रसंगी महाविद्यालाचे प्राचार्य डॉ. ए. डी. बळवी, डॉ. व्ही. ए. वारडे हे प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते माजी पंतप्रधान राजीव गांधी यांना माल्यार्पण करण्यात आले. या प्रसंगी विद्यार्थ्यांना सद्भावना दिनाची शपथ देण्यात आली. या नंतर वाणिज्य विभागातर्फे गट चर्चेचे आयोजन करण्यात आले होते.



### ५ सप्टेंबर २०२३ (शिक्षक दिन अहवाल)

कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय , धरणगाव येथे राष्ट्रीय सेवा योजना , विद्यार्थी विकास विभाग, युवती सभा यांनी संयुक्तपणे शिक्षक दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या प्रसंगी महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. ए. डी. बळवी हे अध्यक्षपदी होते. व्यासपीठावर इतिहास विभागाचे प्रमुख डॉ. संजय शिगाणे, उपप्राचार्य प्रा. संदीप पालखे , महाराष्ट्र बँक धरणगाव शाखेचे उपशाखा अधिकारी श्री हर्शल पाटील, डॉ. डी. के. गायकवाड उपस्थित होते. विदयार्थी स्वयंसेवकांनी गुलाब पुष्प शिक्षकांना देऊन , शिक्षकाप्रती आदर व्यक्त केला. अध्यक्षीय भाषणात डॉ. अरुण बळवी यांनी , भारतातील सर्वोच्चपद राष्ट्रपती पद एका शिक्षकाला देऊन , शिक्षकाचा बहुमान केला अशा भावना व्यक्त केल्या. श्री हर्शल पाटील यांनी डिजिटल पेमेंट , बँक तर्फे विद्यार्थी , प्राध्यापक यांना देण्यात येणाऱ्या सवलती योजना या बद्दल उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी यांना मार्गदर्शन केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन डॉ. सुषमा तायडे तर आभार डॉ.ज्योती महाजन यांनी मांडले.



### २४ सप्टेंबर २०२३ (राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग , कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्याल धरणगाव मार्फत दिनांक २४ सप्टेंबर २०२३ रोजी राष्ट्रीय सेवा योजना स्थापना दिवस दत्तक गाव अनोरे येथे साजरा करण्यात आला. २४ सप्टेंबर हाच दिवस सत्यशोधक समाजाचा स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात आला. या वेळी कार्यक्रमाची सुरुवात महात्मा जोतीबा फुले व सावित्री बाई फुले यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून करण्यात आली.या प्रसंगी गावातील प्रथम नागरिक श्री. स्वप्नील महाजन हे प्रमुख अतिथी तर ग्रामपंचायत सदस्य कार्यक्रमाला हजर होते. भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी यांनी केलेल्या आव्हानानुसार गावातील सरपंच, पंचायत सदस्य, प्रतिष्टीत व्यक्ती च्या हस्ते अमृत कलशाचे पूजन करण्यात आले व त्या मध्ये एक मुठ माती अर्पण करण्यात आली.या नंतर गावातून श्री. संत सावता माळी सभागृह ते जिल्हापरिषद शाळेपर्यंत प्रभातफेरी काढण्यात आली. तेथे स्वातंत्र्य लढ्यात हुतात्मा झालेल्या स्वातंत्र्यवीरांना वंदन करून स्वच्छता पंधरवाड्या निमित्त गावातील शाळेचा परिसर, रस्ते व मुख्य बसस्थानक याची स्वच्छता करण्यात आली. या प्रसंगी कनिष्ट महाविद्यालयातील कार्यक्रम अधिकारी प्रा. प्रताप साळवे, प्रा. उन्मेष पाटील, प्रा. योगेश पाटील व विद्यार्थी स्वयंसेवक स्वयंसेविका यांचे सहकार्य लाभले.



### २५ सप्टेंबर २०२३ (निर्माल्य संकलन)


गणेशोत्सवाच्या काळात रा.से. यो. स्वयंसेवक विविध गणेश मंडळांना भेट देऊन निर्माल्य संकलन करावे असे अवाहन गणेश मंडळ यांना केले. तसेच निर्माल्य पाण्यात न टाकता , त्याचे कँम्पोस्ट खत करावे असे सांगून निर्माल्य संकलन केले.




### २७ सप्टेंबर २०२३ (माहितीचा अधिकार दिन)

राष्ट्रीय सेवा योजना विभाग कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव तर्फे माननीय तहसीलदार धरणगाव तथा जिल्हाधिकारी जळगाव यांच्या यांच्या पत्रानुसार दिनांक २७सप्टेंबर २०२३ रोजी माहिती अधिकार दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी कॉमर्स विभागाचे प्रमुख डॉ. गौरव महाजन सर यांनी माहितीच्या अधिकार अर्थात राईट टू इन्फॉर्मेशन एक्ट याची स्थापना आणि या अंतर्गत येणारे विविध विभाग याचे उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.माहितीचा अधिकार म्हणजे सरकारकडून माहिती मागवण्याचे लोकांचे स्वातंत्र्य होय. भारतात 'माहिती कायदा' ११ मे २००५ मध्ये केंद्र सरकारने मंजूर केला. १२ ऑक्टोबर २००५पासून हा कायदा अंमलात आला. भारतीय राज्यघटनेतील अनुच्छेद १९ प्रमाणे प्रत्येक व्यक्तीला भाषण आणि विचार स्वातंत्र्याचा हक्क आहे. या हक्काचाच भाग म्हणजे माहितीचा अधिकार होय. माहितीचा अधिकार हा व्यक्तीचा नैसर्गिक, मानवी आणि मूलभूत अधिकार आहे. या कार्यक्रमासाठी विज्ञान व वाणिज्य विभागाचे राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम





**०१ व ०२ ऑक्टोबर २०२३**

**("स्वच्छता ही सेवा" - राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती व माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्रीजयंती).** "स्वच्छता ही सेवा" या उपक्रमांतर्गत धरणगाव शहरातील तसेच दत्तक गाव अनोरे, पष्टाने येथील एनएसएसच्या स्वयंसेवकांनी गणपती मंडळा मार्फत निर्माल्य संकलन केले. स्वच्छता ही सेवा या उपक्रमांतर्गत माननीय प्रधानमंत्री श्री नरेंद्रजी मोदी यांनी केलेल्या आवाहनानुसार ,कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातील स्वयंसेवकांनी महाविद्यालयातील परिसरात सकाळी दहा ते अकरा अशी, एक तास श्रमदान करून स्वच्छता केली. याप्रसंगी महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्रभारी प्राचार्य डॉ.संजय शिंगाणे सर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. पंधरवड्याच्या अंतिम दिनी, दिनांक 2 ऑक्टोबर रोजी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांची जयंती श्रमदान करून साजरी करण्यात आली. यानंतर राष्ट्रपिता महात्मा गांधी व स्वतंत्र भारताचे माजी पंतप्रधान लालबहादूर शास्त्री यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. याप्रसंगी प.रा.हायस्कूल सोसायटीचे सचिव डॉ. मिलिंदजी डहाळे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. या कार्यक्रमासाठी प.रा.हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष डॉ अरुणजी कुलकर्णी उपाध्यक्ष श्री वसंतराव गालापुरे संचालक अजय शेठजी पगारिया यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. या कार्यक्रमात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे यांनी महात्मा गांधी व लालबहादूर शास्त्री यांचे विचार उपस्थित स्वयंसेवक समोर मांडले. या कार्यक्रमासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. भगवान खोंडे, वरिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी डॉ.अभिजीत जोशी, डॉ.ज्योती महाजन, कनिष्ठ महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. प्रताप साळवे, प्रा प्रा.एस.झेड.पाटील सर ,रेखा पवार मॅडम, प्रा. उमेश पाटील, विद्यार्थी विकास विभागाचे प्रमुख डॉ.स्वप्नील खरे उपस्थित होते.या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गौरव महाजन यांनी केले तर आभार प्रदर्शन उमेश पाटील सर यांनी केले. याप्रसंगी नुकतीच अहिल्याबाई होळकर विद्यापीठात राज्यस्तरीय पथसंचलन निवड चाचणी शिबिरामध्ये महाविद्यालयातर्फे विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केलेली राष्ट्रीय सेवा योजना विभागाची स्वयंसेविका कु. साक्षी माळी हिचा कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ मिलिंद जी डहाळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा.योगेश पाटील, श्री सुरज वाघरे, श्री दीपक पाटील, श्री सुजित जैन व राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक स्वयंसेविका यांचे सहकार्य लाभले.



**०४ ऑक्टोबर २०२३ (वन्यजीव सप्ताहानिमित्त)**

एनएसएस विभाग व वनविभाग एरंडोल परिक्षेत्र यांच्यातर्फे महाविद्यालयात वन्यजीव सप्ताह साजरा करण्यात आला. त्यात बायोलॉजिस्ट आयडियल ऑर्गनायझेशनचे सचिव विवेक देसाई यांनी पॉवर प्रेझेंटेशनद्वारे मार्गदर्शन केले. खानदेशामध्ये आढळणाऱ्या विविध वन्यजीवांबद्दल तसेच एखादा हिंस्त्र वन्यजीव अचानक आपल्यासमोर आला तर आपला बचाव कशा पद्धतीने करावा याबद्दल त्यांनी मार्गदर्शन केले. तसेच बिबटे वाघ यांना कॉलर आय. डी. लावून त्यांचा कसा अभ्यास केला जातो, याचप्रकारे डॉ. बाबा आमटे यांच्या आनंदवनात प्राण्यांची निगा कशा पद्धतीने घेतली जाते, याबद्दल देसाई यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे अध्यक्षस्थानी होते. उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख, वनस्पती विभागाच्या प्रमुख डॉ. कांचन महाजन, ए. व्ही. साळुंखे, वनपाल राजवड, वनरक्षक एस. व्ही. थारेकर, वनरक्षक गणेश धानोरे व्यासपीठावर होते. याप्रसंगी डॉ अभिजीत जोशी, डॉ. ज्योती महाजन, डॉ. गजानन जाधव, प्रा. अमित पाटील, सलीम खाटीक, शांताराम पाटील, गजानन सैंदाणे, सागर शृंगारराव उपस्थित होते. डॉ. संजय शिंगणे यांनी अध्यक्षीय समारोपात वन्यजीव मानवी वस्तीमध्ये प्रवेश करतात, असे आपण बातम्यांमध्ये बऱ्याचदा बघतो, पण ते खरे नसून मानवांनी जंगलतोड करून त्यांच्या वस्तीमध्ये प्रवेश केला आहे. तसेच त्यांचे वस्तीस्थान लहान होत जात आहे, त्यामुळे ते शिकारीसाठी मानव वस्तीमध्ये प्रवेश करतात, असे प्रतिपादन केले.




**३१ ऑक्टोबर २०२३ (राष्ट्रीय एकता दिवस)**

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभागातर्फे महाविद्यालयात आज दिनांक ३१ ऑक्टोबर २०२३ रोजी, "राष्ट्रीय एकता दिवस" म्हणून साजरा करण्यात आला. याप्रसंगी माजी पंतप्रधान श्रीमती इंदिरा गांधी यांचा स्मृती दिवस व सरदार वल्लभभाई पटेल यांची जयंती साजरी करण्यात आली. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमापूजन व प्रतिमेस माल्यार्पण करण्यात आले. राष्ट्रीय एकता दिनाच्या औचित त्याने एनएसएस विभागातर्फे राष्ट्रीय एकता या विषयावर प्रश्नमंजुषा आयोजित करण्यात आली होती, यामध्ये विद्यार्थी

विद्यार्थिनी स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदविला. राष्ट्रीय एकता दिनानिमित्त महाविद्यालयातील विद्यार्थी, प्राध्यापक बंधू-भगिनी, शिक्षकेतर कर्मचारी व राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी राष्ट्रीय एकात्मतेची शपथ घेतली.




### २६ नोव्हेंबर २०२३(संविधान दिन)

प.रा. हायस्कूल सोसायटीच्या कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व राज्यशास्त्र विभागातर्फे दिनांक २६ नोव्हेंबर रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी महाविद्यालयाचे उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख हे अध्यक्षस्थानी होते. बाह्य परीक्षक प्रा. किशोर पाटील प्रा.सौदागर तसेच, उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ स्थापित परीक्षा पथकातील डॉ. संजीव पगारे, डॉ. डी.के. भामरे, डॉ. एस. डी. वळवी यांच्या हस्ते भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर, यांच्या प्रतिमेचे व संविधान उद्देशिकेचे पूजन करण्यात आले.राज्यशास्त्र विभागाचे प्रा. मोहन लहासे यांनी उपस्थित प्राध्यापक, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी यांना संविधान दिनाची शपथ दिली.

### ०१ डिसेंबर २०२३ (जागतिक एड्स दीन सप्ताह निमित्त एकदिवशीय शिबिर)

आज दिनांक ०४/१२/२०२३रोजी आर. आर. सी. व कला ,वाणिज्य शास्त्र महाविद्यालय धरणगाव, आय. सी. टी. सी. विभाग ग्रामीण रुग्णालय धरणगाव, साने गुरुजी फाउंडेशन अमळनेर, वाय. आर. जी. केअर जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने एच आय व्ही एड्स माहिती मार्गदर्शन व तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. वैद्यकीय अधिकारी डॉ. मनोज पाटील सर यांचे मार्गदर्शन लाभले. बहिस्थ परीक्षक मा.श्रीमती डॉ. शर्मिला गाडगे डी. डी. एस. पी. महाविद्यालय एरंडोल, राष्ट्रीय सेवा योजनेचे व रेड रिबीन क्लब समन्वयक श्री. डॉ. अभिजीत जोशी, डॉ. गौरव महाजन, महिला कार्यक्रमाधिकारी डॉ. ज्योती महाजन प्रा. रेखा बिरारी, आयसीटीसी विभागाचे समुपदेशक श्री ज्ञानेश्वर शिंपी, श्री राजेश्वर काकडे, साने गुरुजी फाउंडेशन अमळनेर, डी. आर. पी. आकाश माळी , श्रीमती अश्विनी शिंपी, वाय आर जी केअर संस्थेचे समुपदेशक श्री.मोहन महाजन, श्री. संकेत वारुलकर, व्यासपीठावर उपस्थित होते.




कार्यक्रमाची सुरुवात कवयित्री बहिणाबाई चौधरी यांच्या प्रतिमेला पूजन करून करण्यात आली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा.सौ.रेखा बिरारी मॅडम यांनी केले.प्रमुख मार्गदर्शनात आयसीटीसी विभागाचे समुपदेशक ज्ञानेश्वर शिंपी यांनी जागतिक एड्स दिना निमित्त या वर्षीचे एड्स दिनाचे "लेट कम्युनीट लीड" (आत्ता नेतृत्व समुदायाचे) ह्या ब्रीद वाक्याला अनुसरून जागतिक एड्स दिनचे महत्व, एड्स आजार, एच आय. व्ही. संसर्ग, त्याची लक्षणे, लैंगिक वर्तणूक आजार व उपचार तसेच युवकांची जबाबदारी या सर्व बाबींवर सविस्तर चर्चात्मक मार्गदर्शन केले, तसेच राजेश्वर काकडे यांनी तपासण्या संदर्भात मार्गदर्शन केले.

वाय.आर. जी. समुपदेशक मोहन महाजन यांनी जळगाव जिल्ह्यात संस्थेच्या कार्या विषयी माहिती दिली तसेच साने गुरुजी फाउंडेशन अमळनेर डी. आर. पी. आकाश माळी यांनी आपल्या संस्थेच्या कार्या विषयी माहिती दिली. कार्यक्रमाला विद्यार्थ्यांचा उत्कृष्ट सहभाग मिळाला एकूण ८० ते ९० विद्यार्थ्यांनी आपली एचआयव्हीचे तपासणी करून घेतली. हा कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य आर. आर. पाटील, प्रा. बी. एल. खोंडे, प्रा. प्रताप साळवे ,प्रा. एस झेड पाटील, प्रा. उमेश भदाणे यांचे सहकार्य लाभले.डॉ. ज्योती महाजन यांनी सर्वांचे आभार व्यक्त केले.



### ०६ डिसेंबर २०२२ (भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिन)

प. रा. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे आय. क्यू. ए. सी., विद्यार्थी विकास विभाग, एन.एस.एस. आणि इंद्रधनुष्य क्लब यांच्या संयुक्त विद्यमाने भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण दिनानिमित्त "वंदन महामानवाला"" भीम गीतांची स्वरांजली कार्यक्रमाचे आयोजन दिनांक ०६ डिसेंबर २०२३ रोजी संत ज्ञानेश्वर हॉल येथे करण्यात आले. सदर कार्यक्रमात प्रणिता सोनवणे,

विशाल सोनवणे, प्रवीण शिंदे या विद्यार्थ्यांनी भीम गीतांचे सादरीकरण करत महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्याचे आणि जीवन कार्याचे दर्शन स्वरांच्या माध्यमातून श्रोत्यांना घडविले.कार्यक्रमासाठी प्रमुख वक्ते म्हणून लाभलेले प्रा.डॉ.पी. एस. बोरसे सरांनी बाबासाहेबांच्या कार्य विशद करतांना हिंदू कोड बिल या विषयावर विस्तृत मार्गदर्शन केले. अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. संजयजी शिंगाणे हे यांनी बाबासाहेबांच्या अर्थशास्त्र, सामाजिक शास्त्र, इतिहास, राज्यशास्त्र या विषयावरील अभ्यासाचे उदाहरणासहित उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.



### ०३ जानेवारी २०२३(सावित्री बाई फुले जयंती)

प. रा. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे एन.एस.एस. विभाग व वाणिज्य विभागातर्फे सावित्रीबाई फुले यांची जयंती ३ जानेवारी २०२४ रोजी साजरी करण्यात आली. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिगाणे हे होते. या प्रसंगी महाविद्यालयचे उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख, अर्थशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विजयानंद वारडे हे व्यासपिठावर उपस्थित होते.या कार्यक्रमाची सुरुवात सावित्री बाई फुले यांच्या प्रतीमेचे पूजन व माल्यार्पण करून करण्यात आली. या प्रसंगी टी. वाय. बी. कॉम. ची विद्यार्थिनी कु. रोशनी भाटीया हिने सावित्रीबाई फुले यांचा जीवनपट उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवक, प्राध्यापक, शिक्षक , शिक्षकेत्तर कर्मचारी यांच्यासमोर मांडला.या नंतर बी. कॉम.च्या विद्यार्थ्यांनी दोन तास पुस्तक वाचून सावत्रीबाईना अभिवादन केले.




### १२ जानेवारी २०२४ (जागतिक युवा दिन व राजमाता जिजाऊ जयंती)

एन.एन.एस. तर्फे जागतिक युवा दिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या प्रसंगी स्वामी विवेकानंद व राजमाता जिजाऊ यांच्या प्रतिमेचे पूजन प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे व उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख यांच्या हस्ते करण्यात आले. उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी यांना स्वामी विवेकानंद यांच्या दृष्टीकोनातील युवक व आजचा युवक याच्यातील तफावत कशी कमी करता येईल यावर प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे यांनी मार्गदर्शन केले तर राजमात जिजाऊ याच्या सारखे प्रत्येक आई ने जर लहान मुलांचे संगोपन केले तर प्रत्येक घरातील नवयुवक हा शिवबा झाल्या पासून कोणी रोखू शकणार नाही असे मत उपप्राचार्य प्रा. पंकज देशमुख यांनी माडले.




### २३ जानेवारी २०२४ ( नेताजी सुभाषचंद्र जयंती )

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय यथील एन.एन.एस. विभागातर्फे नेताजी सुभाषचंद्र यांची जयंती महाविद्यालयात साजरी करण्यात आली. या प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे यांनी नेताजी सुभाषचंद्र यांच्या कार्याचा जीवनपट उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांन समोर मांडला.



### २५ जानेवारी २०२४ ( नव मतदार दिन )

प. रा. हायस्कूल सोसायटीचे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय धरणगाव येथे एन.एस.एस. विभागातर्फे नव मतदारदिन महाविद्यालयात साजरा करण्यात आला. या प्रसंगी धरणगाव तहसीलचे नायब तहसीलदार श्री. देवराज साहेब , महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे हे व्यासपीठावर उपस्थित होते.श्री. देवराज साहेब यांनी उपस्थित विद्यार्थी विद्यार्थीनी यांना येणाऱ्या निवादनुकिंबद्दल माहिती दिली.तसेच ज्या विद्यार्थी स्वयंसेवकांना अठरा वर्ष पूर्ण झाले असतील त्यांनी आपली नावे मतदार यादी मध्ये नोंदवावी ,नावामध्ये काही दुरुस्ती करायची असल्यास कोणकोणती कागदपत्र लागतील याची सविस्तर पणे मार्गदर्शन केले. या वेळेस भारताचे पंतप्रधान श्री. नरेंद्रजी मोदी यांनी नवमतदार दिनाच्या शुभेच्छा भारताच्या जनतेला दिल्या याचे लाईव्ह प्रक्षेपण उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी यांना दाखविण्यात आले. या दिना निमित्त महाविद्यालयात नवमतदार , मतदान या विषयावर पोस्टर स्पर्धा व रांगोळी स्पर्धा आयोजित करण्यात आली होती.



# कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,
धरणगाव, जि. जळगाव

आविष्कार 2023-24

## राष्ट्रीय सेवा योजना नियमित कार्यक्रम



### २९ जानेवारी २०२४ ते ०२ फेब्रुवारी २०२४ (पूर्व तयारी आणि नियोजन कार्यशाळा)

विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन दत्तक गाव अनोरे गावात ०३ फेब्रुवारी २०२४ ते ०९ फेब्रुवारी २०२४ दरम्यान आयोजित करण्यासाठी नियोजन करण्याच्या हेतूने दिनांक २९ जानेवारी २०२४ ते ०२ फेब्रुवारी २०२४ ला महाविद्यालयाच्या संत ज्ञानेश्वर सभागृहात सहकारी प्राध्यापक आणि NSS स्वयंसेवकांची बैठक आयोजित करण्यात आली.सदर कार्यशाळेत विभागीय समन्वयक प्रा. डॉ. संजय शिंगाणे, प्रा. डॉ. अभिजित जोशी, प्रा. डॉ. गौरव महाजन यांनी मार्गदर्शन केले. शिबिराची भूमिका, करावयाचे कार्य, सेवकांची जबाबदारी याबाबत तसेच गावात करावयाचे श्रमदान, स्वच्छता जनजागृती रॅलीचे नियोजन याबाबत बैठकीत चर्चा व मार्गदर्शन करण्यात आले.



### ०२ फेब्रुवारी २०२४ (साहित्य संमेलन सहल)

दिनांक ०२ फेब्रुवारी २०२४ रोजी राष्ट्रीय सेवा योजनेच्या विद्यार्थी विद्यार्थिनी यांनी अमळनेर येथील साहित्य संमेलन बघण्यासाठी एक दिवसीय सहल आयोजित करण्यात आली होती.स्वयंसेवकांनी साहित्य संमेलनाला भेट देऊन ग्रंथ वाचन व ग्रंथ खरेदी केली.




### ८ मार्च २०२३ ( जागतिक महिला दिन)

महाविद्यालयातील महिला प्राध्यापिकाना आमंत्रित करून त्यांचा "भारतीय नारी" हे स्वामी विवेकानंद यांचे पुस्तक देवून महिला दिन साजरा करण्यात आला. कार्यक्रमात मुलींनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. सर्व प्रमुख पाहुण्यांनी एकत्रित कुटुंब पद्धती स्वातंत्र्याचा सदुपयोग, आजच्या समाजरचनेत मुलींची कुटुंबाची भूमिका आरोग्य विषयक काळजी या संदर्भात मार्गदर्शन केले. या प्रसंगी हिमोग्लोबिन तपासणी शिबीर आयोजित करण्यात आले होते.




राष्ट्रीय एकात्मता शिबिर (**NIC**) सहभागी विद्यार्थी

१] राध्येश्याम भोई (S.Y. B.Com.) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

२] प्रकाश लांबोळे (S.Y. B.Com.) कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव

आपत्ती व्यवस्थापन शिबिर आव्हान

३] चेतन विठ्ठल पाटील (S.Y. B.Com.) गोंडवाना विद्यापीठ , गडचिरोली, महाराष्ट्र

राज्यस्तरीय पथसंचलन निवड चाचणी शिबिर

४] माळी साक्षी राजू (S.Y. B.Sc.) अहिल्याबाई होळकर विद्यापीठात, सोलापूर

जळगाव जिल्हा पथसंचलन (जळगाव डिस्ट्रिक्ट परेड)

५] हर्षल संजय पाटील (F.Y. B.Com.)

६] अतुल खैरनार(F.Y. B.Sc.) नवी दिल्ली यथे मेरी मिट्टी मेरा देश या उपक्रमा अंतर्गत अमृत कलश यात्रेत सहभागी

प्रा.डॉ.अभिजित जोशी
कार्यक्रम अधिकारी

डॉ. ज्योती महाजन
महिला कार्यक्रम अधिकारी

प्रा. डॉ. गौरव महाजन सहाय्यक
कार्यक्रम अधिकारी

राष्ट्रीय सेवा योजना विभाग,
कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव

प. रा. हायस्कुल सोसायटीचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

## धरणगांव, जि.जळगांव





# कला, वाणिज्य, आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव
## राष्ट्रीय सेवा योजना विभाग
### विशेष  श्रमसंस्कार शिबिर अहवाल
### 3 फेब्रुवारी ते 9 फेब्रुवारी 2024

कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, धरणगाव राष्ट्रीय सेवा योजना विभाग अंतर्गत विशेष श्रमसंस्कार शिबिराचे आयोजन 3 फेब्रुवारी ते 9 फेब्रुवारी 2024 या दरम्यान अनोरे या गावात करण्यात आले होते. या शिबिराचे उद्घाटन भारतीय लष्करातील माजी सैनिक संदेश महाजन, भटू पाटील, तसेच प्रवीणकुमार वानखेडे जागतिक महिला बँक प्रमुख महाराष्ट्र राज्य यांच्या उपस्थितीत व प.रा. हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष डॉ. अरुणजी कुलकर्णी यांच्या अध्यक्षते खाली करण्यात आले. उद्घाटन कार्यक्रमाला ग्रामपंचायत सरपंच व इतर सन्माननीय सदस्य उपस्थित होते. या सोबतच अनोरे गावाचे सरपंच श्री स्वप्निल महाजन व ग्रामस्थ उपस्थित होते.

"**सक्षम युवा - समर्थ भारत**" या शीर्षकांतर्गत दत्तक गावात अनेक उपक्रम राबवले गेले. या सात दिवसांमध्ये पाणी प्रश्न, स्पर्धा परीक्षा, कृषी विषयक समस्या व उपाय, अवयव दान, थॅलेसेमिया निदान, पशुधन, मतदान, कॅशलेस मोबाईल बँकिंग, सामाजिक सुरक्षा, ग्रामीण तरुणांसाठी उद्योगातील संधी, स्वच्छ भारत अभियान अंतर्गत ग्रामस्वच्छता अभियान, मृदा परीक्षण चिकित्सा, एस.बी.आय. मध्ये ऑनलाईन बँकिंग व्यवहार शिबिर असे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी डॉ. अरुणजी कुलकर्णी यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात स्वयंसेवकांनी रासेयोच्या माध्यमातून समाज सेवा करण्याचा प्रयत्न करावा आणि स्वतःच्या व्यक्तिमत्वात सकारात्मक बदल घडवून आणावेत असे प्रतिपादन केले. तर शिबिराचे उदघाटन करताना माजी सैनिक श्री. संदेश महाजन यांनी त्यांनी देशात सैन्यातील विविध ठिकाणी बजावलेली सेवा आणि त्या सेवेदरम्यान अंगीकृत झालेली शिस्त याचे महत्व स्वयंसेवकांना सांगितले.

प्रमुख उद्घाटक श्री. प्रविणकुमार वानखेडे यांनी महिला बचत गट व त्याद्वारे स्त्री स्वावलंबी कशी होते , हे उदाहरण देऊन स्पष्ट केले. ग्रामीण महिलांसाठी बचत गटाद्वारे आत्मनिर्भर होते. यावेळेस जागतिक महिला बँकेचे महत्व आणि त्यांच्या योजना उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.

आजच्या विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी गावातील प्रथम नागरिक श्री स्वप्नील महाजन , सरपंच अनोरे यांनी राष्ट्रीय सेवा योजनेतून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होतो.तसेच एन.एन.एस. मुळेच मी आज

आपल्या समोर उभा आहे व व्यक्तिगत व्यवसाय नौकरी यामध्ये यशस्वी होण्यासाठी एन.एन.एस. चा वाट खूप मोठा आहे.एन.एन.एस. मुळे उद्या आपल्यातील बरेच जण व्यासपीठावरून मार्गदर्शन कराल असे मत व्यक्त केले.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे यांनी एन एस एस च्या ही जबाबदार आणि जागरूक नागरिक घडवित असते त्यामुळे स्वयंसेवकांनी या व्यासपीठाचा अधिकाधिक उपयोग करून घ्यावा असे प्रतिपादन केले.सदर कार्यक्रमाला प.रा. हायस्कुल सोसायटीचे सचिव डॉ.मिलिंदजी डहाळे, संचालक श्री.अजयशेठजी पगारिया, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे, उपप्राचार्य ग्रंथपाल प्रा.पंकज देशमुख व सर्व प्राध्यापक सहकारी उपस्थित होते.

**दि**. 3 **फेब्रुवारी** 2024

**सत्र पहिले**– प्रथम सत्रात डॉ. सूचित जैन यांनी जल है तो कल है , या विषयावर उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले.पाण्याचे महत्व त्यांनी उदाहरण देऊन विषद केले. जलदूत फौंडेशनआली हि स्वखर्चाने समाजासाठी काम करते व ती कशी अस्तित्वात आली हे सांगितले. श्री. सुनील शहा यांनी त्यांच्या जलदूत फौंडेशन चे धरणगाव शहरातील कार्य उपस्थित स्वयंसेवकांन समोर मांडले. त्यांनी नाला खोलीकरण, शहरातील तलाव स्वच्छता, रेन वाटर हार्वेस्टिंग, पाणी आडवा पाणी जिरवा, झाडे लावा झाडे जगवा हे उपक्रम जलदूत फौंडेशन ने राबविते व या सामाजिक कार्यात आपण सहभागी व्हावे असे आव्हाहन केले.

**सत्र दुसरे**- श्री कैलास महाजन, माजी एन.आय.सी. विद्यार्थी,कला वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय धरणगाव यांनी एनएसएसचे महत्व आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले तसेच एनएसएस द्वारे जे विविध उपक्रम राबवले जातात एन. एस. एस. चे घोषणा ,गीत याबद्दल शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. तसेच एन एस एस द्वारे विद्यार्थ्यांना कोणकोणत्या संधी उपलब्ध होतात तसेच विविध प्रकारचे कॅम्प, जे विद्यापीठ स्तर, विभागीय स्तर, राज्य व देश स्तरावर राबवले जातात याची माहिती दिली व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी यामध्ये सहभागी व्हावे व आपल्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून घ्यावा असे आव्हान केले.

**गट चर्चासत्र**- डॉ. अरुण वळवी व प्रा. संदीप पालखे यांनी जल व्यवस्थापन हि काळाची गरज आहे. शुध्द पाणी याचा वापर काटकसरीने केला पाहिजे, तसेच पाण्याचे प्रदूषण कश्या पद्धतीने टाळले पाहिजे या बद्दल उपस्थित स्वयंसेवकांशी चर्चा केली.













विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीराचा उद्घाटन सोहळा माजी सैनिक श्री. संदेश महाजन, श्री.भटु पाटील, मा.श्री. प्रविणकुमार वानखेडे व डॉ.अरुणजी कुलकर्णी यांचे अध्यक्षते खाली दि.३/२/२०२४ रोजी संपन्न झाला .









**दि**. 4 **फेब्रुवारी** 2024

**सत्र पहिले**– या अस्तीत्व फौंडेशन चे श्री मिलिंद भालचंद्र पाटील यांनी अनोरे गावामध्ये अस्तित्व फौंडेशन द्वारे राबविले जाणारे उपक्रम सांगितले. तसेच सध्याच्या स्पर्धात्मक युगात सरकारी नौकरी साठीन कोण कोणत्या स्पर्धा परीक्षेला आपण देऊ शकतो आणि त्यात आपण कसे यशस्वी होऊ शकतो याचे मार्गदर्शन केले. स्पर्धा परीक्षे मुळे ग्रामीण युवकांना संधी प्राप्त होते, त्याचा अभ्यास करून लाभ घ्यावा असे आवाहन केले.

**सत्र दुसरे**- या सत्रात श्री. भगवान महाजन यानी ग्रामीण विकासात तरुणांचा युवकांचा सहभाग कसा करून घेता येईल हे उदाहरण देऊन सांगितले. भारत हा नवतरुणानाचा देश आहे, जगामध्ये सगळ्यात जास्त नव तरुण भारतात आहेत,त्याचा सामाजिक कार्यात सकारात्मक पणे उपयोग करून घेणे काळाची गरज आहे आशी भावना व्यक्त केली.

**गट चर्चासत्र**-ग्रामीण विकास या विषयांवर उपस्थित स्वयंसेवकांशी डॉ. श्रीपाद उपासनी , डॉ. सदाशिव वाघमारे , प्रा.अमित पाटील यांनी चर्चा केली. अर्थशास्त्र तसेच विज्ञान याचा शेती साठी जर व्यवस्थित उपयोग केला तर गावातील विकास चांगला होईल अशी आशा गट चर्चे दरम्यान व्यक्त केली.

**दि**. 5 **फेब्रुवारी** 2024.

सकाळच्या सत्रात शिबिरार्थी विद्यार्थ्यांनी कै. बि.जे. महाजन हायस्कूल, अनोरे या शाळेचे क्रीडांगणाची स्वच्छता केली. त्यानंतर विद्यार्थ्यांसाठी आपत्ती व्यवस्थापन शिबिर आयोजित करण्यात आले होते. यामध्ये कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ आयोजित आव्हान कॅम्प मध्ये महाविद्यालयातील माजी रासेयो विभागातील सहभागी विद्यार्थी यांनी आपत्ती व्यवस्थापनाचे विविध धडे शिबिरार्थी विद्यार्थ्यांना दिले.

**सत्र पहिले**– जेष्ठ वैज्ञानिक , कृषी विज्ञान केंद्र , जळगाव डॉ.हेमंत बाहेती यांनी कृषी विषयक समस्या व उपाय या विषयावर उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. कृषीचे नापिकीकरण, क्षारीकरण का ? होत आहे,प्रत्येक हंगामात पिकांमध्ये बदल करणे , तसेच गट शेती , रासायनिक खतांचा वापर , नैसर्गिक शेती, सेंद्रिय शेती या विविध संकल्पना उदाहरण देऊन सोप्या भाषेत विद्यार्थी स्वंसेवकांना समजाऊन सागीतल्या.

**सत्र दुसरे**- डॉ. नरेंद्र ठाकूर,अध्यक्ष इंडिअन रेडक्रॉस सोसायटी यांनी अवयव दान- काळाची गरज याचे महत्व उपस्थित स्वयंसेवकांन समोर मांडले. रक्तदान बरोबर आज अवयव दान करून आपण एक व्यक्ती एका पेक्षा जास्त व्यक्तींना मदत करू शकतो. यामध्ये त्यांनी नेत्रदान, किडनी दान, हृदयदान , कातडी (स्कीन ) दान

करू शकतो याची माहिती उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी यांना दिली.

**गट चर्चासत्र**- प्रा.राजू केंद्रे आणि डॉ. डी. आर. बोंडे यांनी आपत्ती व्यवस्थापनया विषयावर उपस्थित स्वयंसेवकांची चर्चा केली. आपत्ती प्रामुख्याने दोन प्रकारच्या असतात नैसर्गिक आणि मानवनिर्मित.प्रत्येकाने अनपेक्षित येणाऱ्या आपत्ती साठी सजक असले पाहिजे. त्यांनी विविध आपत्तीचा कश्या पद्धतीने सामना केला पाहिजे या बाबत उपस्थित स्वयंसेवकांशी चर्चा केली.

**दि**.6 **फेब्रुवारी** 2024

सकाळ सत्रात अनोरे गावामध्ये पशुचिकित्सा शिबीर आयोजित करण्यात आले होते. या प्रसंगी सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन , धरणगाव तालुका डॉ. अशोक महाजन,डॉ. गौरव सुर्यवंशी , श्री. गोकुळ साळुंखे यांनी गावातील शेतकर्यांनी आणलेल्या गुरांची तपासणी करून योग्यतो ओषोधोप्चार केला. विद्यार्थी स्वयंसेवकांनी जिल्हा परिषद हायस्कूल मराठी शाळेत क्रिडागणाची स्वच्छता, शोषखड्डे , वर्ग खोल्यांची स्वच्छता व ग्रामस्वच्छता केली.

**सत्र पहिले** – या सत्रामध्ये डॉ. अशोक महाजन यांनी राष्ट्रीय पशुधन व राष्ट्रीय संगणकीय पशुधन अभियानाबद्दल उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. राष्ट्रीय संगणकीय अभियानांचा शेतकरी पशुधारकांना कसा फायदा होईल, पशुचीनिगा कशी राखावी, पशु हरविल्यास पोलिसांना कडून शोध घेण्यात कसा फायदा होतो, तसेच पशुचिकित्सा करताना त्याचा कसा फायदा होतो हे उदाहरण देऊन पटवून दिले.NDLM एप चा वापर या बाबतीत मार्ग दर्शन केले

डॉ. अनिल कोरडे यांनी रेबीज विषाणू मुळे पाळीव प्राणी तसेच पाळीव प्राण्यांमुळे मानवाला होणारे आजार व त्यावेळेस घ्यायचे प्रथमोपचार या विषयी उपस्थित विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. डॉ. गौरव सूर्यवंशी पशुधन विकास अधिकारी यांनी पशुचिकित्सा विभागाद्वारे कोणकोणत्या प्रकारच्या योजना राबविल्या जातात उदा. कुकुट पालन, रेशीम पालन, शेळीपालन व या साठी लागणारे कागदपत्र , आवेदन पत्र कसे भरायचे , बँके कडून कोणकोणत्या कागदपत्र घ्यावे लागतात याचे सविस्तर मार्गदर्शन केले.

**सत्र दुसरे**- या सत्रामध्ये अध्यक्ष खोसला फौंडेशन व माधवराव गोळवलकर रक्त पेढी च्या संचालिका डॉ. सई नेमाडे यांनी थलेसेमिया या नव आजाराबद्दल उपस्थित स्वयंसेवकांना मार्गदर्शन केले. थलेसेमिया, मायनर कसे ओळखायचे , एखाद्या गर्भवती महिलेला थलेसेमिया मेजर जर बाळ होणार असेल तर कोणता औषधं उपचार घ्यावा, तसेच रक्तातील नात्यात शक्यतो लग्न टाळावे, अथवा तसे शक्य नसल्यास लग्नापूर्वी रक्त चाचणी




आविष्कार
2023 -24

















निदानाद्वारे थलेसेमिया मेजर/ मायनर निदान करून घेणे आवश्यक असल्याचे सुचविले.
**गट चर्चासत्र-** डॉ.हर्शल भालेराव व प्रा. डी.एन. पाटील यांनी वित्तीय व्यवस्थापन हि काळाची गरज कशी आहे, तसेच आपण एफडी, मुचुअल फंड, शेअर मार्केट, बीट कोइन अशा विविध प्रकारात पैसे गुंतवणूक करू शकतो व त्या तील फायदा व नुकसान या बाबत उपस्थित स्वयंसेवकांशी चर्चा केली.

**दि.**7 **फेब्रुवारी** 2024 सकाळ सत्रात विद्यार्थी स्वयंसेवकांनी जिल्हा परिषद हायस्कूल मराठी शाळेत क्रिडागणाची स्वच्छता, शोषखड्डे , वर्ग खोल्यांची स्वच्छता व सुशोभीकरण केले. तसेच ग्रामस्वच्छता केली.
**सत्र पहिले-** या सत्रात विद्यार्थी स्वयंसेवकांना डायरेक्ट सेलिंग या विषयावर श्री. कैलास पाटील यांनी मार्गदर्शन केले. डायरेक्ट सेलिंग साठी कोणत्याही कापणीची वस्तू ती आपण वापरावी व आपल्यास आवडल्यास इतरांना वापरण्यास सांगावे. या साठी जास्त शिक्षण, पैसा यापेक्षा जास्तीत जास्त वेळ समाजात देत राहिल्यास त्याचा फायदा होतो असे मत व्यक्त केले.

**सत्र दुसरे-** श्री गणेश दुर्गुडे,मॅनेजर स्टेट बँक ऑफ इंडिया, धरणगाव शाखा यांनी 'ऑनलाइन बँकिंग' या विषयावर मार्गदर्शन करून कॅश टू कॅशलेस याचे महत्त्व विशद केले. आधुनिक काळात ऑनलाईन बँकिंग चे व्यवहार करताना प्रत्येकाने काळजी घेणे आवश्यक आहे. त्यासाठी डिजिटल साक्षरता वाढविणे काळाची गरज आहे. आणि NSS च्या माध्यमातून स्वयंसेवकांनी अशा डिजिटल व्यवहारांसाठी समाजात जागरूकता निर्माण करावी. याव्यतिरिक्त SBI द्वारे झिरो बॅलन्स सेविंग अकाउंट विद्यार्थ्यांना काढण्यासाठी प्रोत्साहित केले व जास्तीत जास्त विद्यार्थ्यांनी योनो ऍप चा वापर करावा असे सांगितले. आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निकिता पाटील तर आभारप्रदर्शन डिंपल चौधरी हिने केले.

**गट चर्चासत्र-** ताणतणाव व्यवस्थापन व द्वारे मानसिक आरोग्यावर होणारे परिणाम या विषयांवर डॉ. विजयानंद वारडे, डॉ.गजानन जाधव, प्रा. राहुल केदार यांनी उपस्थित स्वयंसेवकांशी चर्चा केली. योगा द्वारे मानसिक आरोग्य कश्या पद्धतीने चांगले राहील व विविध प्रकारचे कामांचे व्यवस्थित नियोजन केले तर कामाचा ताण कसा कमी करता येईल या बद्दल स्वयंसेवकांशी चर्चा केली.

**दि.**8 **फेब्रुवारी** 2024

सकाळ सत्रात विद्यार्थी स्वयंसेवकांनी प्रभात फेरी काढली व समाजातील ज्वलंत विषय हुंडाबळी, अंधश्रद्धा निर्मूलन, वाहन चालवताना मोबाईलचा वापर टाळा, स्त्री शिक्षण, मतदान जनजागृती यासारख्या विषयांवर


विशेष हिवाळी
श्रमसंस्कार शिबीर









विद्यार्थी स्वयंसेवकामार्फत पथनाट्य गावातील विविध चौकामध्ये सादर करून समाजामुळे जनजागृती करण्यात आली. यानंतर डॉ. स्वप्नील खरे यांनी माती परीक्षण शिबीर गावकर्यांसाठी गावातील मारोतीचा पार येथे घेतले, जागतिक स्तरावर वाढलेली लोकसंख्या आणि त्यामुळे वाढलेली अन्नधान्य मागणी यामुळे सातत्याने रासायनिक खते, बियाणे यांचा वापर प्रचंड मोठया प्रमाणावर आहे. जरी या हरितक्रांतीने उत्पन्न वाढले असले तरी त्याचा विपरीत परिणाम जमिनीवर होत असल्याने मृदा गुणवत्ता टिकविण्याची गरज निर्माण झाली आहे. आणि याचसाठी वर्षातून किमान एकदा माती परीक्षण करणे काळाची गरज बनली आहे. या सत्रात डॉ. खरे यांनी विद्यार्थ्यांना माती परीक्षणाचे प्रात्यक्षिक करून दाखवले. व त्या आधारे कोणते पीक या जमिनीत घेतल्यास अधिक उत्पन्न मिळविता येईल याची माहिती त्यांनी दिली.या शिबिराला गावकर्यांनि चांगला प्रतिसाद दिला.

**सत्र पहिले**- या सत्रात धरणगाव पोलीस सस्टेशन चे पोलीस इनिस्पेक्टर श्री उद्धव डमाले यांनी सामाजिक सुरक्षा या विषयावर मार्गदर्शन केले. या मध्ये त्यांनी सोशल मीडियामध्ये मधील विवध एप्स जेसे की फेसबुक , इन्स्टाग्राम , व्हाटसअप यांचा वापर जपून करा. आपले फोटो , आपण कुठे जात आहोत याची माहिती टाकू नका, अनोळखी व्यक्तीची मैत्री करू नका, चूकीची माहिती सोशल मिडीयावर आली तर ती पुढे पाठवू नका अथवा तिचे समर्थन करू नका या मुळे सामाजिक सुरक्षा धोक्यात येणार नाही याची काळजी घ्या असे मत व्यक्त केले.

**सत्र दुसरे**- दुसऱ्या सत्रात श्री विवेक सैंदाणे,DIC जिल्हा प्रशिक्षण केंद्र, जळगाव यांनी उद्योगामध्ये असलेलेल्या संधी , उद्योग करण्यसाठी प्रशिक्षण, भांडवल यासाठी जिल्हा उद्योग् केंद्र जळगाव यांच्या वेगवेगळ्या स्कीम आहेत याची माहिती उपस्थित विद्यार्थ्यांना दिली.

**गट चर्चासत्र**- महिला सबलीकर या विषयावर डॉ. कांचन महाजन यांनी विविध उदाहरणे देऊन महिला स्वयंसेवकांशी चर्चा केली. स्त्री हि अबला नसून सबला आहे , आज देशाच्या राष्ट्रपतीपदी , अर्थमंत्रीपदी स्त्रिया असून त्या आपले काम जबाबदारीने पार पाडीत आहेत असेच काम आपण केले पाहिजे अशी आशा व्यक्त केली. चोपडा रा.से.यो. विभागाचे विभागीय समन्वयक दिलीप गिऱ्हे यांनी सायंकालीन सत्रात उपस्थित विद्यार्थी स्वयंसेवकाना मार्गदर्शन केले. या मध्ये विशेष हिवाळी श्रम संस्कार शिबिराचे विद्यार्थी दशेत व भविष्यात त्याचा विद्यार्थी जीवनावर होणारा परिणाम, रासेंयो मधून विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होणारी शिस्त याबद्दल आपली भावना व्यक्त केली. रात्रीच्या वेळी राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ सचिनजी नांद्रे, प्राचार्य संजयजी शिंगाणे , रासेंयो सल्लागार समिती सदस्य श्री विलास कोळी यांनी उपस्थित स्वयंसेवकांची संवाद साधला. त्यात राष्ट्रीय सेवा






योजना, त्याचे बोधचिन्ह, त्याचे घोषवाक्य, त्याचे गीत आणि एकूणच या शिबिरातून स्वयंसेवक काय शिकलेत याविषयी त्यांनी चर्चा केली.

**दि**.9 **फेब्रुवारी** 2024

**गट चर्चासत्र**- प्रा.धाम्म्जोत गायकवाड, प्रा.डी. बि. चव्हाण यांनी नोकरी करण्या पेक्षा व्यवसाय करा, स्वयंरोजगार संधी आणि गरज या विषयांवर उपस्थित स्वयंसेवकांशी चर्चा केली. स्वयंरोजगारातून गावाची प्रगती होईल व प्रत्यक ग्रामस्थाला जर रोजगार मिळ लातर गावातील लोकांचे स्थलांतर थाबेल आशी आहा व्यक्त केली. विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबिराचे समारोप दि.9 फेब्रुवारी 2024रोजी करण्यात आला या समारोप प्रसंगी अध्यक्षस्थानी प.रा. हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष श्री अरुणजी कुलकर्णी हे होते. अध्यक्षीय समारोपात त्यांनी राष्ट्रीय सेवा योजना मुळे विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास कशा पद्धतीने होतो , याचे विविध उदाहरणे देऊन त्यांनी उपस्थित शिबिरार्थींना मार्गदर्शन केले. तसेच या शिबिरातूनच उदयाचे सुसंस्कृत नागरिक व नेतृत्व निर्माण होते. यामुळे प्रत्येक महाविद्यालयाने राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांना जास्तीत जास्त प्रमाणात स्टेज उपलब्ध करून द्यावे, असे त्यांनी आपल्या मार्गदर्शनातून व्यक्त केले.

या कार्यक्रम प्रसंगी प. रा. हायस्कूल सोसायटीचे मानद सचिव मिलिंदजी डहाळे, संचालिका निनाताई पाटील, संचालक अजयशेटजी पगारिया, जिल्हा समन्वयक (रा.से.यो.) डॉ. दिनेश पाटील, चोपडा रा.से.यो. विभागाचे विभागीय समन्वयक दिलीप गिऱ्हे , महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. संजय शिंगाणे, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. बी.एल. खोंडे, कै.बि.जे. महाजन शाळेचे अध्यक्ष रमेश खंडू महाजन, उपाध्यक्ष मधुकर नाना देशमुख मान्यवरांनी मार्गदर्शन केले. याप्रसंगी सुधा मूर्ती गट उत्कृष्ट गट म्हणून निवडण्यात आला तसेच उत्कृष्ट स्वयंसेवक जीवन अहिरे ,उत्कृष्ट स्वयंसेविका प्रज्ञा सोनवणे यांची निवड करण्यात आली.

या समारोप कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. गौरव महाजन, प्रास्ताविक डॉ. अभिजीत जोशी यांनी केले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ.अरुण वळवी, प्रा. राजू केंद्रे, डॉ. विजायनंद वारडे, डॉ. दीपक बोंडे, प्रा.संदीप पालखे, डॉ.कांचन महाजन, प्रा. विश्वजित वळवी, डॉ. स्वप्नील खरे, प्रा.राहुल केदार, डॉ.ज्योती महाजन, प्रा.पूर्वा कुलकर्णी, प्रा.योगेश पाटील,दुर्गेश कोळी महाविद्यालयीन प्राध्यापक वर्ग शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी स्वयंसेवक यांचे सहकार्य लाभले.

डॉ. अभिजित जोशी डॉ संजय शिंगाणे








# विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर




















# विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर

आविष्कार 2023 -24



विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीरात जमलेले समस्त विदयार्थी कवायत व श्रमदान करतांना.
















# विशेष हिवाळी श्रमसंस्कार शिबीर
















Day (8th Feb 2024)

# Commerce Department





# वाणिज्य विभाग

वाणिज्य विभागाचा २०२३-२४ चा वार्षिक अहवाल सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे. या वर्षात वाणिज्य विभागामार्फत अनेक विद्यार्थी केंद्रीत कार्यक्रम, कार्यशाळा आणि विविध उपक्रम राबविले. विद्यार्थ्यांमध्ये कौशल्ये विकसित व्हावीत या हेतूने सेमिनार, गट चर्चा या द्वारे शैक्षणिक कौशल्ये वाढविण्याचा प्रयत्न करण्यात आला. तर प्रात्यक्षिक अनुभव मिळावा यासाठी सहल, सहल आधारित प्रकल्प अहवाल तयार करण्यास प्रवृत करण्यात आले. तसेच विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना व्यासपीठ मिळावे यासाठी पोस्टर निर्मिती, नाट्य सादरीकरण कविता निर्मिती व वाचन अशा विविध स्पर्धेत सहभागी होण्यास प्रेरित केले गेले. त्याचा तपशील पुढीलप्रमाणे -

कोर्ट भेट -

२८ जुलै २०२३ रोजी विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी शिक्षण मिळू नये या उद्देशाने वाणिज्य विभागातर्फे द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गात शिकणाऱ्या सर्व विद्यार्थ्यांना मा. न्यायालय धरणगाव येथे शैक्षणिक उपक्रम अंतर्गत भेट घडवून आणली गेली. प्रा. प्रशांत क्षत्रिय यांनी या उपक्रमाचे समन्वयक म्हणून जबाबदारी पार पाडली. सदर भेटीमध्ये मा. न्यायाधीश महोदय यांनी विद्यार्थ्यांशी विविध घडामोडीवर चर्चा केली. न्यायालयाचे कामकाज कशा पद्धतीने चालते याबाबत थोडक्यात माहिती दिली.





**अजिंठा सिका कंपनी ट्रीप -**

१२ ऑगस्ट २०२३ रोजी पर्यटन व्यवस्थापन विषय अंतर्गत शैक्षणिक सहल अजिंठा येथील **जग प्रसिद्ध लेणी** येथे नेण्यात आली. सदर सहलीचे समन्वयक डॉ. हर्षवर्धन भालेराव व प्रा. प्रशांत क्षत्रिय होते. तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाचे सर्व विद्यार्थी या उपक्रमात सहभागी झाले. या उपक्रमवर विद्यार्थ्यांनी प्रकल्प अहवाल सादर केले.

तसेच दुसर्या सत्रात नशिराबाद येथील सिका एनर्जी प्रा. लिमिटेड या कंपनीला भेट देण्यात आली. एकूणच कंपनीचे कामकाज कसे चालते, उत्पादन , विपणन , वित व्यवस्थापन कसे कार्यरत असते याबाबत कंपनीचे संचालक मा. श्री. श्रीराम पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**Study Tour**




**Industrial Visit – Seeka Industry**




### स्वागत समारंभ -

२०२३ - २४ या शैक्षणिक वर्षात प्रवेशित नवीन विद्यार्थ्यांचे स्वागत आणि संस्थेबाबत ओळख व्हावी या हेतूने अर्थ वाणिज्य मंडळ विभागाद्वारे "Roobaroo २०२३" या कार्यक्रमाचे आयोजन दिनांक २२ सप्टेंबर २०२३ ला करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयचे प्राचार्य डॉ. ए.डी. वळवी हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून प्रा. आर.एम.कैंद्रे, डॉ. पी.एस.बोरसे उपस्थित होते. या वर्षी तृतीय वर्ष वाणिज्य वर्गात असणार्या सर्व विद्यार्थीनी या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.





### कॉम्प्युटर workshop - २६ व २७ सप्टेंबर २०२४

Softaid Computer जळगाव येथील श्री. मिलिंद सूर्यवंशी यांनी advanced Excel आणि Tally Prime यावर विद्यार्थी, प्राध्यापक आणि शिक्षकेतर कर्मचारी यांना मार्गदर्शन केले. कार्यशाळेचे उद्घाटन कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे IQAC समन्वयक प्रा. संदीप पालखे होते. सदर कार्यशाळेला एकूण ७५ विद्यार्थी उपस्थित होते.







**BIAP गुंतवणूकदार मार्गदर्शन कार्यशाळा - ९ जानेवारी २०२४**

विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यामध्ये गुंतवणुकीबाबत जागृती निर्माण व्हावी या हेतूने धरणगाव महाविद्यालय आणि BSE NSE आणि kria foundation यांच्या सहकार्याने ऑनलाईन कार्यशाळा आयोजित करण्यात आली. शेअर बाजाराशी संबंधित सर्व संकल्पनावर सविस्तर पद्धतीने मार्गदर्शन करण्यात आले.







**अमळनेर साहित्य संमेलन भेट - ०२ फेब्रुवारी २०२४**

विद्यार्थ्यांमध्ये वाचनाप्रती आवड निर्माण व्हावी या उद्देशाने अमळनेर येथे आयोजित अखिल भारतीय साहित्य संमेलनाला भेट देण्यात आली. सदर उपक्रमचे समन्वयक डॉ. हर्षवर्धन भालेराव डॉ. सुषमा तायडे, प्रा. सुलताना पटेल या होत्या.

### Guest Lecture - Romeo Mascarenhas - १२ फेब्रुवारी २०२४

मुंबई येथील विद्यापीठात NEP समन्वय समिती सदस्य आणि डहाणू महाविद्यालयातील सेवा निवृत्त प्रा. डॉ. रोमियो मस्कारान्हास यांचे Soft Skills Development या विषयावर व्याख्यान आयोजित करण्यात आले. अनेक छोटे छोटे उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांनी आत्मविश्वासाने प्रत्येक संकटाना सामोरे जायला हवे तोच यशस्वी होण्याचा सोपा मार्ग असल्याचे त्यांनी प्रतिपादन केले. डॉ. हर्षवर्धन भालेराव यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला तर प्रा. प्रशांत क्षत्रिय यांनी आभार मानलेत.




### गटचर्चा

प्रत्येक वर्गातील विद्यार्थ्यांमध्ये इतरांसमोर बोलण्याचे कौशल्ये निर्माण व्हावे या उद्देशाने या वर्षापासून गट चर्चा सुरु करण्यात आली. विद्यार्थ्यांना ठराविक विषय देऊन 15 मिनिटे त्यावर चर्चा केली गेली. विचार करणे, केलेला विचार समोरच्या व्यक्तीला समजावून सांगणे हे कौशल्ये याद्वारे निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला.






### प्रकल्प

केवळ पुस्तकी अभ्यास न करता प्रत्यक्ष व्यावसायिक जगताचा अनुभव घ्यावा या उद्देशाने असेप्रकल्प देण्यात आले. शैक्षणिक सहलीवर आधारीत पर्यटन व्यवस्थापन, धरणगाव तालुक्यातील पतसंस्थाचा वार्षिक

अहवालाचा तुलनात्मक अभ्यास, बचत गट अभ्यास, न्यायालय भेटीतून कार्यालय कामकाज , छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित त्यांच्या संपूर्ण चरित्राचा व्यवस्थापनाचा अभ्यास करण्यास प्रेरित केले गेले.

**ICT lectures**

प्रथम आणि द्वितीय वर्ष वर्गातील विद्यार्थ्यांना कॉम्प्युटर आधरित assignments दिल्या गेल्यात. शिक्षकांनी zoom, whats app, youtube द्वारे व्याख्यान घेऊन ICT तंत्रज्ञानाचा उपयोग करण्यात आला. वाणिज्य विभागामार्फत

**महापुरुष जयंतीनिमित राबविलेले उपक्रम -**

२० ऑगस्ट २०२३ सद्भावना दिन निमित तृतीय वर्ष वाणिज्य वर्गाच्या विद्यार्थ्यांनी भारतीय एकात्मता आणि युवक या विषयावर गट चर्चा केली.

३ जानेवारी २०२४ क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित वाणिज्य विभागातील विद्यार्थिनींच्या वतीने "मी सावित्री बोलतेय" असा एकपात्री नाट्य सादर केले गेले. तृतीय वर्ष वाणिज्य वर्गातील रोशनी भाटीया हिने सावित्रीबाईच्या कार्याला उजाळा दिला.

१२ जानेवारी २०२४ राजमाता जिजाऊ आणि स्वामी विवेकानंद जयंतीनिमित द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गाच्या विद्यार्थ्यांनी ऑनलाईन प्रश्न मंजुषा आयोजित केली. सदर स्पर्धेत महाविद्यालयातील विद्यार्थी प्राध्यापक यांनी सहभाग नोंदवला. १९ फेब्रुवारी २०२४ छत्रपती शिवाजी महाराज जयंतीनिमित वाणिज्य विभागातील सर्व वर्गातील विद्यार्थ्यांकडून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या चरित्राचा अभ्यास करण्यात आला. आणि त्यांचे व्यवस्थापन, युद्ध कौशल्ये, गड किल्ले, बाल पण , स्वराज्य निर्मिती, वैवाहिक जीवन या वेगवेगळ्या पैलूंवर निबंधलेख स्वीकारण्यात आले.

**उद्योजकता कौशल्य विकास कार्यक्रम -**

२४ जानेवारी २०२४ रोजी इंद्रधनुष्य समेंलनमध्ये आनंदमेळावा या उपक्रमात वाणिज्य विभागातील विद्यार्थ्यांद्वारे विविध वस्तू विक्रीचे स्टॉल उभारण्यात आले. या द्वारे विद्यार्थ्यांमध्ये उद्योजकता गुण निर्माण करण्याचा प्रयत्न केला गेला. जवळपास १८ विद्यार्थ्यांनी यात सहभाग नोंदवला.

**विविध स्पर्धामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग -**

१४ फेब्रुवारी २०२४ रोजी जळगाव येथील एम.जे. कॉलेज येथे राष्ट्रीय पातळीवरील **MAESTRO** स्पर्धेत द्वितीय वर्ष वाणिज्य वर्गातील रोहित पटूने, तुषार महाजन, आणि चेतन पाटील यांनी सहभाग नोंदवला. विभागामार्फत विद्यार्थ्यांना परीक्षेची तयारी व्हावी या दृष्टीने सर्व विषयांच्या सराव परीक्षा आयोजित करण्यात आल्यात.

**पर्यावरण व पर्यटन व्यवस्थापन जागृती - शैक्षणिक सहल -**

१६ मार्च २०२४ - पर्यटन व पर्यावरण व्यवस्थापन समजण्यासाठी चाळीसगाव तालुक्यातील पाटणादेवी येथे शैक्षणिक सहल आयोजित करण्यात आली. तेथील पर्यटन समस्या, दुकानदारांच्या समस्या विद्यार्थ्यांनी जाणून घेतल्या.

**निरोप समारंभ -**

दिनांक ०१ एप्रिल २०२४ रोजी महाविद्यालयातील तृतीय वर्ष वाणिज्य आणि एम कॉम वर्गातील विद्यार्थ्यांना भविष्यासाठी शुभेच्छा समारंभ आयोजित केला गेला.

**राष्ट्रीय परिषद सहभाग व संशोधन पेपर प्रकाशन**

प्रताप महाविद्यालय अमळनेर येथे RUSA Sponsored National Conference on Role of Commerce,Management and Technology in Modern Era या राष्ट्रीय परिषदेत वाणिज्य विभागातील प्राध्यापकांनी सहभाग नोंदवला.

- डॉ. गौरव गणेश महाजन यांनी "A Study of Stock Market Investment Awareness Among Salaried Employees in Jalgaon District" या विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केला. प्रा. प्रशांत क्षत्रिय यांनी "Negotiable Instruments: A Comprehensive Analysis" यांनी या विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केला.

धरणगाव येथे आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत डॉ. हर्षवर्धन भालेराव आणि डॉ. गौरव महाजन यांनी " Viksit Bharat @ 2047 : A Roadmap to Developed Nation" या विषयावर संशोधन पेपर प्रकाशित केला. तसेच डॉ. हर्षवर्धन भालेराव यांचे एम. कॉम बी. कॉम वर्गासाठी Modern Retail Management, Marketing Management या विषयावर एकूण तीन पुस्तके प्रकाशित झालेली आहेत.

या शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण प्रगतीसाठी विभागातील सर्वच सहकाऱ्यांनी सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे. सदर कार्यक्रम यशस्वीतेसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य, उपप्राचार्य, IQAC समन्वयक, सर्व प्राध्यापक बंधू भगिनी, शिक्षकेतर बंधू आणि वाणिज्य विभागातील विद्यार्थी यांचे सहकार्य लाभले.

डॉ. हर्षवर्धन अशोक भालेराव

डॉ. गौरव गणेश महाजन

वाणिज्य विभाग
कला वाणिज्य विज्ञान महाविद्यालय, धरणगाव




आविष्कार
2023 -24

प. रा. हायस्कुल सोसायटीचे

# कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय,

## धरणगांव, जि.जळगांव

# विद्यार्थी विकास अहवाल

२०२३-२४

# विद्यार्थी विकास विभाग अहवाल २०२३-२४




**शैक्षणिक वर्ष २०२३-२४ या कालावधीत आपल्या महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाने लक्षवेधी कामगिरी केली. विद्यापीठ स्तरावरील तीन महत्वाच्या पारितोषिकांवर या वर्षात विभागाने महाविद्यालयाचे नाव सन्मानाने कोरले. त्याचा संक्षिप्त वृत्तांत खालील प्रमाणे.**

१. कबचौ उमवी जळगाव व मु.जे.महाविद्यालय जळगाव यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विद्यापीठ स्तरीय युवारंग २०२३-२४ स्पर्धेत या वर्षी आपल्या महाविद्यालयाच्या ३२ सदस्सीय संघाने एकूण १५ कला-प्रकारात सहभाग नोंदविला. अतिउच्च काठिण्य पातळी असलेल्या या स्पर्धेत संघाने नेत्रदीपक कामगिरी करत ललित कला-प्रकारात कोलाज या उपकलाप्रकारात कुमारी सपना प्रवीण माळी या विद्यार्थिनीने रौप्य पदक तर नाट्य कला प्रकारातील मिमिक्री (नक्कल) या उपकला प्रकारात कु.यशोधर विठ्ठलदास भाटिया या विद्यार्थ्याने कास्य पदक जिंकत महाविद्यालयाच्या लौकिकात भर घातली.





२. २रे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलन २०२३-२४: कबचौ उमवी जळगाव च्या विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत प्रताप तत्वज्ञान केंद्र अमळनेर येथे दि. ३ फेब्रुवारी २०२४ रोजी आयोजित २रे बहिणाबाई विद्यार्थी साहित्य संमेलनात महाविद्यालयाच्या एकुण ६ सदस्सीय संघाने सहभाग नोंदविला. सदर संमेलनात बोलीभाषा सादरीकरण प्रकारात कु.मालती चौधरी या विद्यार्थिनीने पहिल्या क्रमांकाच्या पारितोषिक महाविद्यालयाचे नाव कोरले.

३. कमवा आणि शिका योजना: शैक्षणिक वर्ष २०२३-२४ साठी कबचौ उमवी जळगाव च्या विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत महाविद्यालयाला "कर्मवीर भाऊराव पाटील कमवा आणि शिका योजना" मिळाली. सदर योजनेचा महाविद्यालयातील विविध आर्थिक, सामाजिक स्तरातील १६ होतकरू विद्यार्थ्यांना लाभ मिळाला

४. PR ' सिंगर ऑफ दि इअर २०२३-२४: विद्यार्थी विकास विभागामार्फत महाविद्यालयातील गायकांना व्यासपीठ मिळवून देण्याच्या उद्देशाने या वर्षी जानेवारी महिन्यात PR ' सिंगर ऑफ दि इअर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले.

महाविद्यालयाच्या एकूण १२ गायकांनी सदर स्पर्धेत सहभागी होत महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी आपल्या आवडत्या गायकांना मतदान करत जिंकवून दिले. स्पर्धा ग्रँड फिनाले सहित एकूण ४ फेरींमध्ये घेण्यात आली.

**४. ग्रँड सॅल्यूट टू इसरो :** चांद्रयान ३ च्या यशस्वी मोहिमेनंतर इसरो च्या वैज्ञानिकांसाठी ग्रँड सॅल्यूट टू इसरो या कार्यक्रमाचे आयोजन कबचौ उमवी जळगाव च्या विद्यार्थी विकास विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली दि २९ ऑगस्ट २०२३ रोजी १५० विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत करण्यात आले. सदर कार्यक्रमात माननीय कुलगुरू महोदयांच्या उपस्थितीत एकाच वेळेस इतर महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांसोबत दृक्श्राव्य माध्यमातून विद्यार्थ्यांनी इसरोच्या वैज्ञानिकांना अभिवादन केले.

**५ अग्नीवर भरतीपूर्व प्रशिक्षण अभियान कार्यक्रम:** महाविद्यालयाच्या विद्यार्थी विकास विभागाने व युवती सभा विभागाच्या सहकार्याने दि. १५ ते २२ मार्च २०२४ दरम्यान विद्यार्थ्यांसाठी आयोजन केले.

**६. नवतंत्रज्ञ आणि कौशल्य विकास कार्यशाळा:** विद्यार्थी विकास विभागाअंतर्गत दि. २६ मार्च २०२४ रोजी विद्यार्थ्यांसाठी विद्यापिठाच्या KCIIL व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने विद्यर्थ्यांसाठी एकदिवसीय नवतंत्रज्ञ आणि कौशल्य विकास कार्यशाळा आयोजित करण्यात आली. सदर कार्यशाळेत महाविद्यातील एकूण ५८ विद्यार्थी सहभागी झाले.

**७. शिबीर:** वर्षभरात महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी विद्यार्थी विकास विभागा मार्फत वेगवेगळ्या शिबिरांमध्ये सहभाग नोंदविला.

| अनु. क्र. | शिबीर | तारीख | आयोजक महाविद्यालय | सहभागी विद्यार्थी |
|---|---|---|---|---|
| १. | विद्यापीठ स्तरीय कार्यशाळा | दि १९ ते २१ मार्च २०२४ | विद्यावर्धिनी सभेचे कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालय,धुळे | १.रोहित मनोज पटने S.Y.B.Com<br>२.चेतन विठ्ठल पाटील S.Y.B.Com<br>३.शुभम कैलास चौधरी F.Y.B.Sc.<br>४.प्रणिता रमेश सोनावणे T.Y.B.A.<br>५.गायत्री विनायक पाटील T.Y.B.A. |
| २. | श्रमसंस्कार, व्यक्तिमत्व विकास कार्यशाळा | दि २३ ते २५ फेब्रुवारी २०२४ | सि.गो.पाटील कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, साक्री, जिल्हा धुळे. | १.रोकडे दिनेश ज्ञानेश्वर T.Y.B.Com<br>२.चौधरी शुभम कैलास F.Y.B.Sc.<br>३. खैरनार भारत रवींद्र, S.Y.B.Com |

वर्षभर विद्यार्थी विकासामार्फत वेगवेगळ्या कार्यशाळा व कार्यक्रमांचे आयोजन विद्यार्थी विकास विभागा अंतर्गत करण्यात आले.










# जिमखाना विभाग 2023-24





जिमखाना विभाग 2023-24



# जिमखाना विभाग

आविष्कार 2023-24

धरणगाव, जि. जळगाव



## विभाग स्तर व विद्यापीठ स्तर खेळाडू 2023-24


चि. दिनेश रोकडे
बॉक्सिंग ऑल इंडिया
हरियाणा


कु. साक्षी राजु माळी
बॉक्सिंग विभाग
S.Y.B.Sc. Comp.


कु. मोहिनी पाटील
बॉक्सिंग विभाग
F.Y.B.Sc. Comp.


कु. मयुरी सावंत
बॉक्सिंग विभाग
F.Y.B.Sc. Comp.


कु. मानसी चौधरी
बॉक्सिंग विभाग
F.Y.B.Sc. Comp.


चि. निलकेश वारुळे
बॉक्सिंग,बुध्दीबळ
F.Y.B.Sc.


चि. ऋषीकेश पाटील
बॉक्सिंग विभाग
S.Y.B.Sc. Comp.


चि. हितेश नन्नावरे
बॉक्सिंग विभाग
S.Y.B.Sc. Comp.


चि. शुभम रामोशी
बॉक्सिंग विभाग
F.Y.B.Sc. Comp.


चि. स्वप्निल चौधरी
व्हॉलीबॉल विभाग
S.Y.B.Sc. Comp.


चि. विशाल महाजन
बॉक्सिंग विभाग
S.Y.B.Sc. Comp.


चि. अंकित माळी
बॉक्सिंग विभाग
T.Y.B.A





कु. अनन्या पाटील
व्हॉलीबॉल विभाग
S.Y.B.Sc.


कु. भाग्यश्री पाटील
तिहेरी उडी
F.Y.B.A.



# जिमखाना विभाग (वरिष्ठ महाविद्यालय)

## अहवाल २०२३-२४

सन २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात आपल्या महाविद्यालयाचे विविध संघांनी एरंडोल विभाग अंतर्गत महाविद्यालयातील स्पर्धेत सहभाग घेतला याचा तपशीलवार तक्ता खालील प्रमाणे

| अ.क्रं. | स्पर्धेचे नाव व ठिकाण | आंतर महा सहभाग | प्लेस | गृप | युनि. | क्रिडा महोत्सव |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | बुध्दीबळ (मुले) अमळनेर (०३/१०/२०२३) | ०२ | – | १ | – | – – |
| २ | व्हॉलीबॉल (मुली) बांभोरी (१२/१०/२०२३) | १२ | - | १ | – | – – |
| ३ | व्हॉलीबॉल (मुले) बांभोरी (१२/१०/२०२३) | १२ | - | १ | – | – – |
| ४ | स्विमींग (मुले) चोपडा (१३/१०/२०२३) | ०२ | – | – | — | – – |
| ५ | ज्युडो (मुले) अमळनेर (१३/१२/२०२३) | ०२ | – | १ | — | – |
| ६ | कबड्डी (मुले) पारोळा (२०/१०/२०२३) | १२ | — | – | — | – – |
| ७ | क्रॉस - कंट्री (मुले) अमळनेर (२२/१०/२०२३) | ०२ | — | – | — | – – |
| ८ | बॉक्सिंग (मुली) धरणगांव (२९/१०/२०२३) | ०६ | Ist Place | ०६ | — | – – |
| ९ | बॉक्सिंग (मुले) धरणगांव (२९/१०/२०२३) | ०४ | Ist Place | १४ | १ | – – |
| १० | कुस्ती (मुले) एरंडोल (१९/११/२०२३) | ०२ | -- | -- | — | – – |
| ११ | कुस्ती (मुली) एरंडोल (०४/०१/२०२२) | ०१ | -- | -- | — | – – |
| १२ | मैदानी (मुली) चाळीसगांव (१४-१५/१२/२०२३) | ०५ | -- | ०१ | — | – – |
| १३ | मैदानी (मुले) चाळीसगांव (१४-१५/१२/२०२३) | ०५ | -- | ०१ | — | – – |
| | एकुण | ८० | – – | २६ | १ | – – |

शै. वर्ष २०२३-२४ मध्ये आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत आपल्या महाविद्यालयाच्या एकूण ८० खेडाळूंनी १३ विविध संघातून सहभाग नोंदविला पैकी २६ खेडाळू आंतर विभागीय संघात निवड झाली, तर ०१ खेडाळू आंतर विद्यापीठ स्पर्धेत ऑल इंडिया इंटर युनिव्हसिटी स्पर्धेत महाविद्यालयाचे व कबचौ उमवी जळगांव चे प्रतिनिधित्व केले.

एरंडोल विभाग अंतर्गत होणाऱ्या या आंतर महाविद्यालयीन स्पर्धेत उल्लेखनीय बाब म्हणजे आपल्या महाविद्यालयाचे बॉक्सिंग (मुले , मुली) संघ प्रथम स्थान प्राप्त करून विजयी झाले. विद्यापीठ व विभागीय संघात निवड झालेले खेडाळूंची यादी खालील प्रमाणे -

| अ.क्र. | खेळाडूचे नांव | खेळ | विभाग | विद्यापीठ |
|---|---|---|---|---|
| १. | चि. रोकडे दिनेश ज्ञानेश्वर | बॉक्सिंग | विभाग | विद्यापीठ |
| २. | चि. दर्शन रमेश ठाकरे | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ३. | चि. विशाल किशोर महाजन | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ४. | चि. अंकित रमेश माळी | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ५. | चि. पवन राजेंद्र पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ६. | चि. निलकेश कैलाश वारंडे | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ७. | चि. हितेश सुनील नन्नवरे | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ८. | चि. ऋषिकेश किशोर पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ९. | चि. ललित अरुण पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १०. | चि. शुभम शशिकांत रामोशी | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| ११. | चि. ईश्वर गोविंद मोरे | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १२. | चि. प्रशांत गुलाब फुलपगारे | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १३. | चि. रोहित माधवराव पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १४. | चि. हरीष अरुण महाजन | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १५. | कु. सोनाली उदय पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १६. | कु. मोहिनी रोहिदास पाटील | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १७. | कु. मानसी अशोक चौधरी | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १८. | कु.. मयुरी भगवान सावंत | बॉक्सिंग | विभाग | -"- |
| १९. | कु.. साक्षी राजु माळी | बॉक्सिंग | विभाग | -"- |

| अ.क्र. | खेळाडूचे नांव | खेळ | विभाग | विद्यापीठ |
|---|---|---|---|---|
| २०. | कु. कोमल रामचंद्र पाटील | बॉक्सिंग | विभाग | विद्यापीठ |
| २१. | चि.ऋषीकेश किशोर पाटील | हातोडा फेक | विभाग | _''_ |
| २२. | कु.भाग्यश्री रविंद्र पाटील | तिहेरी उडी | विभाग | _''_ |
| २३. | चि. निलकेश कैलास वारुळे | बुध्दीबळ | विभाग | _''_ |
| २४. | चि. गोपाल सचिन चौधरी | ज्युडो | विभाग | _''_ |
| २५. | चि. अनन्या रामचंद्र पाटील | व्हॉलिबॉल | विभाग | _''_ |
| २६. | चि. स्वप्निल संजय चौधरी | व्हॉलिबॉल | विभाग | _''_ |

वरील सर्व विद्यापीठ व विभागीय खेळाडूंचे दि. १४ जाने. २०२४ रोजीच्या वार्षिक स्नेह संमेलनात प्रमुख अतिथी डॉ. चाकणे सर ( टी. जे. कॉलेज मुंबई ) यांच्या हस्ते व प. रा. हायस्कूल सो. स. चे अध्यक्ष आदरणीय बापूसो. अरुणजी कुलकर्णी, सचिव दादासो. डॉ. मिलिंदजी डहाळे, आदरणीय संचालक मा. अजयजी पगारिया, प्रभारी प्राचार्य डॉ. संजयजी शिंगाणे, उपप्राचार्य मा. श्री. पंकज देशमुख, माजी प्रभारी प्राचार्य मेजर डॉ. अरुण वाळवी  व वरिष्ठ महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद या सर्वांच्या हस्ते मोमेंटो देवून गुणगौरव करण्यात आला.

सन २०२३-२४ या शै. वर्षात एरंडोल विभागाच्या विविध विभागीय निवड समितीवर व विद्यापीठाच्या विविध खेळांच्या निवड समितीवर, तसेच ऑल इंडिया बॉक्सिंग मुलींचा संघ व्यवस्थापक रोहतक, हरियाणा येथे महाविद्यालयाचे शा. शि. संचालक श्री. दीपक पाटील यांनी काम पाहिले.

आपल्या महाविद्यालयाच्या जिमखाना कमिटीचे सर्व सदस्य, कनिष्ठ महाविद्यालयचे क्रीडा संचालक श्री. जितेंद्र ओस्तवाल, श्री. जितेंद्र बयस, वरिष्ठ व कनिष्ठ महाविद्यालयचे सर्व प्राध्यापक वृंद, शिक्षकेतर कर्मचारी व माजी व आजी खेडाळूंचे अनमोल सहकार्य व विशेष मार्गदर्शन लाभले. जिमखाना विभाग आपले सर्वांचे आभारी आहे.

प्रा. दीपक नारायण पाटील
जिमखाना प्रमुख वरिष्ठ महाविद्यालय
धरणगांव

# राष्ट्रीय छात्र सेना अहवाल ( एन. सी. सी.)

सन 2023-24 या शैक्षणिक वर्षाचा अहवाल सादर करतांना विशेष आनंद होत आहे. राष्ट्रीय छात्र सेनेत एकूण 65 कॅडेटचे युनिट आहे. 18 महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. जळगांव अंतर्गत छात्र सैनिकांना पूर्ण वर्षभरात सैनिकी प्रशिक्षण देण्यात येते.

एन. सी. सी. कॅडेटमध्ये राष्ट्रप्रेम, आत्मविश्वास, धाडस, आर्मीमध्ये सेवा करण्यास प्रोत्साहान व प्रेरणा निर्माण करणे, उत्तम नागरीक तयार करणे इ. उद्देश डोळ्यासमोर ठेवून एकुण वर्षभरात विविध कार्यक्रम व विविध ठिकाणी एन. सी. सी. कॅम्पचे आयोजन करण्यात आले व छात्र सेनेच्या प्रत्येक कॅडेटला आर्मीचे उत्तम प्रशिक्षण देण्यात आले. एकुण वर्षभराचा अहवाल पुढील प्रमाणे

१) प्रवेश प्रक्रिया :- 18 महाराष्ट्र बटालियनचे कमांडीग ऑफीसर कर्नल अभिजित महाजन आणि AO पवन कुमार यांच्या मार्गदर्शनाने छात्रसेनेत भरतीसाठी आलेल्या सर्व विद्यार्थ्यांची लेखी, शारिरीक व बौध्दीक चाचणी घेवून काही निवडक विद्यार्थ्यांना एन. सी. सी. विभागात प्रवेश देण्यात आला.

२) वृक्षारोपण कार्यक्रम :- महाविद्यालयाचे प्राचार्य आणि NCC चे प्रमुख मेजर डॉ. ए.डी. वळवी यांच्या मार्गदर्शनाने कॉलेजच्या आवारात वृक्षारोपणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. मा. प्राचार्य साहेबांनी सर्व कॅडेटला पर्यावरणाचे महत्व पटवून दिले व ग्लोबल वार्मिंग सारखे भविष्यातील संभाव्य धोके टाळायचे असतील तर पर्यावरणाकडे दुर्लक्ष करुन चालणार नाही. कॅडेटसमध्ये पर्यावरणाबद्दल आवड निर्माण केली.

३) Pri-R.D.C. Camp :- एन. सी. सी. कॅडेटस्ची भरती झाल्यांनतर बटालियनच्या आदेशानुसार नवी दिल्ली येथील प्रजासत्ताक दिनाच्या परेडसाठी कॅडेटची निवड करयात आली. त्यात महाविद्यालयातल एकुण ०५ कॅडेटची निवड करुन अमरावती येथे पूर्व प्रजासत्ताक प्रशिक्षण कॅम्पसाठी पाठविण्यात आले. त्यात सिनियर अंडर ऑफिसर निलेश माळी, कल्पेश महाजन, व इतर कॅडेटनी महत्वपूर्ण कामगिरी पार पाडली.

४) सद्भावना दिवस :- ऑगस्ट महिन्यात स्वर्गीय राजीव गांधी यांच्या स्मृती दिनानिमित्त विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले त्यात एन. सी. सी. छात्र सैनिकांनी सर्व धर्म सद्भावनेची शपथ घेवून राष्ट्रीय एकात्मता जोपासण्यासाठी प्रतिज्ञा घेतली.

५) स्वातंत्र्य दिन :- भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने यावेळी छात्र सैनिकांनी राष्ट्रीय झेंडयाला सलामी दिली.

६) स्त्रीभृण हत्या एक सामाजिक समस्या - १८ महाराष्ट्र बटालियन एन. सी. सी. च्या आदेशानुसार स्त्रीभृण हत्या एक सामाजिक समस्या या विषयावर मार्गदर्शनाचे आयोजन करण्यात आले. सर्व छात्र सैनिकांनी उत्साहाने भाग घेतला.

७) Annual Training NMU :- अमरावती येथे दहा दिवशीय वार्षिक प्रशिक्षण शिबीर आयोजीत करण्यात आले. त्यात महाविद्यायलाचे एकुण ०६ छात्र सैनिकांनी प्रशिक्षण प्राप्त केले.

८) आपातकालीन व्यवस्थापन :- महाविद्यालयात सर्व छात्र सैनिकांनी आपातकालीन व्यवस्थापन मार्गदर्शन करण्यात आले.

याप्रसंगी डॉ. ए.डी.वळवी यांनी नैसर्गिक व मानवनिर्मित आपत्तीत न घाबरता धैर्याने तोंड दिले पाहिजे असे सांगून विविध मानवनिर्मित व नैसर्गिक आपत्तीची उदाहरणे देवून उत्कृष्ट मार्गदर्शन केले.

९) एन. सी. सी. दिवस :- २७ नोव्हेंबर २०२३ रोजी प.रा. हायस्कूल सोसायटीच्या प्रांगणात मोठ्या उत्साहाने एन.सी.सी. दिवस साजरा करण्यात आला. या कार्यक्रमासाठी सिनियर कॅडेट नितीन पाटील, रुषिकेश पाटील, रोहीत सपकाळे, श्रीराम पाटील यांनी महत्वपुर्ण योगदान देऊन कार्यक्रम यशस्वी केला.

१०) प्रजासत्ताक दिन :- २६ जानेवारी २०२४ रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात मा. श्री डॉ. अरुणजी कुळकणी यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. या वेळी एन. सी. सी. विभागातील सर्व छात्र सैनिकांनी राष्ट्रीय झेंडयाला सलामी दिली.

११) एन. सी. सी. बी. आणि सी. प्रमाणपत्र परिक्षा :- एन. सी. सी. मधील कॅडेटस्ला एकुण वर्षभरात विविध सामाजिक व शिस्तीचे धडे देवून ड्रिल, विपन, ट्रेनिंग, फायरिंग परिश्रम, मॅप रिडींग इत्यादी विषयाचे आर्मीचे प्रशिक्षण देण्यात येते याचे फलित म्हणून बी. आणि सी या परिक्षांचे आयोजन १८ महाराष्ट्र बटालियन मध्ये करण्यात येते. या परिक्षेस २५ कॅडेट बी प्रमाणपत्र परिक्षेला बसले आहे. तर १० कॅडेट सी प्रमाणपत्र परिक्षेला बसले आहे.

Celebration of " No Tobacco Day " ३१ मे २०२३







Celebration of Rally on " Environment Day " ०१ जून २०२३






## Celebration of " Vijay Diwas " १६ डिसेंबर २०२३





अशाप्रकारे संपूर्ण वर्षभरात आमच्या एन. सी. सी. छात्र सैनिकांनी भारत देशात विविध ठिकाणी जावून महाविद्यालयाचे नांव शिखरावर नेले.

प. रा. हायस्कूल सोसायटीचे अध्यक्ष मा. डॉ. अरुणजी कुळकर्णी, उपाध्यक्ष मा. वसंत गालापुरे, सचिव मा. डॉ. मिलींदजी डहाळे मा. संचालक अजयशेठ पगारीया व इतर मान्यवरांच्या आर्शिवादाने महाविद्यालयाच्या सर्व सन्माननीय प्राध्यापक बंधू भगिनी आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे आभार मानुन हा अहवाल पूर्ण करतो.
धन्यवाद!

मेजर ए. डी. वळवी
(एन. सी. सी. ऑफीसर )